साप्ताहिक
# माणूस
५ मार्च / १९८३
दोन रुपये



# आसाम

## आसामने रक्ताने दिलेला कौल

शरणागती फुलनची की अर्जुनसिंगाची?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : अडतीस

¤

५ मार्च १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# इथून – तिथून

## दोनास एक ?

आपल्या संविधानानुसार कायद्यासमोर स्त्री–पुरुष समान आहे; पण इस्लामचा कायदा वेगळीच वाट चालतो.

पाकिस्तानात अलीकडेच मांडण्यात आलेल्या 'लॉ ऑफ एव्हिडन्स'च्या नवीन विधेयकानुसार दोन स्त्रियांच्या जबाबाच्या पुराव्याला एका पुरुषाच्या जबाबाच्या पुराव्याची किंमत देण्यात आली आहे.

स्त्री–पुरुष–समानतेच्या या तर्क–विसंगत–स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखणाऱ्या या विधेयकाविरुद्ध कराचीत स्त्रियांनी शांततापूर्ण निदर्शने केली, तर लाहोरला या विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या धार्मिक युवकांनी खास 'पाठिंबा–निदर्शने' केली. त्यांना चार तास अटक करून नंतर सोडून देण्यात आले.

## स्वामीविरुद्ध हेगडे

आणीबाणीत आणि नंतरच्या काळात वेगवेगळ्या कारणांनी गाजलेले जनतापार्टीचे खासदार सुब्रह्मण्यमस्वामी यांनी आता कर्नाटकचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडेविरुद्ध लढाऊ पवित्रा घेतला. या कामी गॉडफादर मोरारजी देसाईंचा आशीर्वादही त्यांनी घेतला!

या वेळी रामकृष्ण हेगडे यांच्या भ्रष्टाचाराची आणि गैरवतणुकीची भली मोठी यादी स्वामींनी तयार केलीय. या महिनाअखेरीस होणाऱ्या जनता पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत हे आरोपपत्र स्वामी मांडणार आहेत. 'तुम्ही मला संपवा नाही तर मी तुम्हाला संपवितो' अशी स्वामींची भूमिका आहे का ?

## लाचार ! लाचार !!

नवीन मंत्र्यांचा शपथविधी राष्ट्रपतिभवनात पार पडला त्याची गंमत. बहुतेक सगळ्या मंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर राष्ट्रपती झैलसिंगांशी हस्तांदोलन केले व इंदिरा मायचे उपकार स्मरण्यासाठी दोन्ही हात बांधून अभिवादन केले.

पण कल्पनाथ रॉयने एक पाऊल पुढे टाकले. शपथविधीनंतर राष्ट्रपतींशी हस्तांदोलन करून हा बाईकडे गेला. तो नुसतेच हात मिळवायला विसरला नाही तर केलेल्या उपकाराच्या ओझ्याखाली गाडला गेल्याने स्वतःचा मान–अभिमान विसरून लोटांगण घालता झाला !

मागच्या वर्षीही, जेव्हा त्याला मंत्रिमंडळात घेतले तेव्हाही न चुकता त्याने पाया पडण्याचे काम केले. म्हणून तर त्याला ही बढती मिळाली असावी का?–असो. पंतप्रधान इंदिरा गांधींनी हसून त्याचा नमस्कार स्वीकारला !

## बहुगुणा परत तिकडे ?

एच. एन. बहुगुणा हे आपला लोकशाही समाजवादीपक्ष सोडून परत 'आपल्या घरी' इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाण्यास उत्सुक असल्याबाबत अलाहाबादमध्ये बोलले जातेय. राजनारायण आणि उत्तरप्रदेशचे भूतपूर्व माजी मुख्यमंत्री बनारसीदास हेही बहुगुणांचा पक्ष सोडत असल्याची वार्ता आहे.

उत्तरप्रदेशातल्या राजकारणातील कमलापती त्रिपाठी आणि बहुगुणा ही एके काळची प्रसिद्ध जोडी आहे. कमलापती त्रिपाठी यांना सध्या देण्यात आलेले महत्त्व पहाता बहुगुणांचा आयमध्ये प्रवेश अशक्य नाही हेच खरं !

## 'प्रसादाचा' चमत्कार !

केरळ प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी आणि केरळचे एमपी विजयराघवन, यांना पक्षश्रेष्ठींशी भेट घेण्यास 'प्रसादा'शिवाय दुसरा कुठला मार्ग सापडला नाही !

विजयराघवन पक्षाच्या काही कामाबाबत चर्चा करण्यास नुकतेच दिल्लीला गेले होते. त्यांनी कमलापती त्रिपाठी यांची भेट घेतली; परंतु त्यांच्या केरळी उच्चारांचा प्रभाव असलेल्या मोडक्या–तोडक्या इंग्रजीमुळे कमलापती त्रिपाठींनी त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. राघवनने दुसऱ्यांदा भेट घेण्याचा प्रयत्न

केला; पण तोही अयशस्वी झाला. मग त्यांनी पंतप्रधानांची भेट घेण्याचा प्रयत्न केला तोही फसला.

राघवननी मग एक युक्ती केली. कमलापतींच्या घरी फोन लावला व सांगितले–'मी केरळमधल्या गुरु वायूर मंदिरातून पंडितजींसाठी प्रसाद आणला', हे सांगितल्याबरोबर त्यांना ताबडतोब अपॉइंटमेंट मिळाली व त्यांचे गान्हाणेदेखील जातीने ऐकले गेले. पंतप्रधानांच्या कार्यालयातही हाच चमत्कार झाला!

तुम्हाला कोणाला, पंतप्रधानांची अथवा त्रिपाठींची भेट घ्यावयाची असली तर पंढरपूरच्या विठोबाचा लाह्या–बत्ताशांचा 'प्रसाद' बरोबर घेऊन जायला विसरू नका!

## फर्नांडिसांची नवी चाल

खा. जॉर्ज फर्नांडिस परत एकदा रेल्वेचा देशव्यापी संप घडवून आणण्याच्या तयारीत आहेत.

अखिल भारतीय रेल्वे मजदूर युनियनचे ते अध्यक्ष आहेत. येत्या जून ८३ पर्यंत रेल्वेचा संप घडवून आणण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न बिकानेरला ८० मध्ये भरलेल्या कार्यकारिणीच्या बैठकीपासून चालू आहेत.

कामगारमंत्री म्हणून दुसऱ्या कुठल्याच बाबतीत यशस्वी न झाल्याने, खा. जॉर्ज फर्नांडिस इंदिरा गांधींशी हातमिळवणी करून, रेल्वे मजदूर संघाची युनियन फोडण्याच्या प्रयत्नात आहेत–असा आरोप मात्र अखिल भारतीय मजदूर संघाचे सेक्रेटरी तोलाराम यांनी केलाय.

– रिकामटेकडा

## सप्रेम नमस्कार

◻ आपला झेलम अंक फारच उशीराने वाचण्यात आला. इंदापूर मुक्कामी मला तो पोस्टाने मागवून घ्यावा लागला. काश्मिरचा स्वतंत्र दर्जा, शेख पिता–पुत्रांचे मनोगत, पुनर्वसन–विधेयक इ. बाबींवर आपण विदारक प्रकाश टाकला आहे. खरे तर झेलम अंक म्हणजे झणझणीत अंजन आहे. सर्व प्रांतांतील भारतीयांना डोळ्यात घालण्यासाठी ते मिळाले पाहिजे. केवळ हिंदी-इंग्रजीच नव्हे तर सर्व भारतीय भाषांतून या अंकाची भाषांतरे त्या त्या प्रांतवासियांना मिळाली तर निश्चितच काश्मिर प्रश्नाविषयीचे लोकमत विशाल प्रमाणात जागृत होईल. अत्यंत उपयुक्त अंक काढल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन!

तसेच ५ फेब्रुवारीच्या अंकातील बेधडक दैनंदिनी, नामांतर आंदोलनाचे नेतृत्व नि आंदोलनवादी याविषयी बरेच काही सांगून गेली आहे. त्यातील तरुणांचा पिल्लरपणा आणि त्यांनी उधळलेली मुक्ताफळे त्यांच्या प्रवृत्तीस साजेशीच आहेत. नामांतराशी संबंधित नसलेल्या अंधारातील बऱ्याच गोष्टी लेखकाने प्रकाशात आणल्या आहेत. वास्तवाचे उघडे–नागडे दर्शन घडविणाऱ्या या दैनंदिनीस एकही नकार मिळायला नको होता. आपण चौथा नकार टाळल्याबद्दल धन्यवाद!

२० फेब्रुवारी ८३ **ज्ञानकुमार आर्य,**
लातूर

◻ श्री. राजा दीक्षित यांचा 'अंबेजोगाई ५७' च्या संदर्भातला लेख वाचला.

या संमेलनात 'रसिक' या नात्याने मी सहभागी झालो होतो.

हे संमेलन मुंबई–पुणेकरांना काहीही न देणारे वाटले, तरी परिसरातील ग्रामीण रसिकास फार मोठा आनंद देणारे ठरले. महाविद्यालयीन शिक्षण घेऊन मातीची सेवा करणारी तरुण शेतकरी मुले मराठवाड्यात खूप आहेत. या सुशिक्षित मुलांच्याकडे आजवर कुणाचे लक्ष गेले होते? श्री. दीक्षित यांनी संपूर्ण परिसर पाहिला असेलच. तळ्याजवळ सुटलेल्या ४०–४५ बैलगाड्या, त्यातून आलेले सुजाण स्त्री–पुरुष... ज्यांनी तीन दिवसांच्या दशम्या बांधून आणल्या होत्या, हे सारे राजाभाऊंना दिसले का?

'काय बेकार नाटकं हाय! त्यात निळू फुले बी नाय की अमिताभ बी नाय!' अशी काही बायकांनी कॉमेंट केली असे कुणा पुणेरी बाईंनी राजा दीक्षितांना सांगितले. संमेलनाला आलेल्या बहुजन समाजाच्या स्त्रियांबद्दलचे हे भाकित अत्यंत खोटे आणि म्हणूनच लाजिरवाणे आहे. आमच्या इथल्या डोक्यावर भाकरी घेऊन जाणाऱ्या स्त्रियाही सुजाण आणि सुशिक्षित असतात हे दीक्षितांना माहीत आहे का? आमचं गाव लहान असूनही हा एवढा मोठा घाट घातला याचे कारण एकच. आदरणीय कुरुंदकरांच्या स्मृतीसाठी घेतले जागारे संमेलन नामांतराच्या प्रश्नावर न उधळता व्हावे यासाठी व हे सामर्थ्य फक्त अंबाजोगाईतच आहे याची खात्री महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांना होती. 'नामांतर हवे' असे स्पष्टपणे सांगणारी मंडळी साहित्यसंमेलनाच्या यशस्वितेसाठी राबराब राबली. ती 'समाजवादी' होती की, 'संघवादी' होती याला आम्ही महत्त्व देत नाही. तसले खवचट वाद शहरी-मंडळींनी घालावेत!

ग्रंथपालखीही संमेलनानेच आयोजित केली होती. आमचे गावच नव्हे तर आसपासची खेडीही या संमेलनाच्या संयोजनात सहभागी होती. राजाभाऊंनी उत्साहाने पार पडलेल्या ग्रंथदिंडीच्या यशाला असे आडबाजूला का नेले? ग्रंथपालखीचे संयोजन ग्रंथपालांच्या नेतृत्वाखालीच झाले होते. पाटलांची गाडी विनंती करून मागवली होती. पालखी देवीच्या देवळातली होती. देवीचे प्रमुख पुजारी श्री. अरुण पुजारी हे संमेलनासाठी पधरा दिवसांपासून खपत होते, काम करत होते. दीक्षितांनी मात्र स्वत:च्या लेखणीचा चपटपटितपणा दाखविण्यासाठी असल्याला वेठीस धरणे बरे नव्हे.

कविसंमेलनाबद्दल. ते लांबले हे खरेच. त्याचे अगदी खरे कारण राजाभाऊंना माहीत का नाही? थोरामोठ्यांचे बोट धरून कविसंमेलनात वर्णी लावून घेणारे कमी का असतात?

इथला प्रत्येक परिसंवाद प्रेक्षकांना खूप काही देऊन गेला. परिसंवादाचे विषय पुणे–मुंबईकरांना नवे नसले तरी येथील रसिकांना नवे होते. त्यांना कार्यक्रमात नाविन्य वाटले नसते तर प्रेक्षक शेवटपर्यंत बसून राहिले नसते.

या संमेलनातील प्रचंड गर्दीवरून खरे तर हे लक्षात घ्यायला हवे की, ग्रामीण भागातील रसिक अशा कार्यक्रमासाठी किती आसुसलेले आहेत. ग्रामीण भागातील सुशिक्षित स्त्री–पुरुषांची बौद्धिक भूक किती दुर्लक्षिली जाते याची नोंद आपल्यासारख्या साहित्यिकांनी घ्यायला हवी. अशी संमेलने शहरातील विद्याविभूषित साचेबंद गर्दीपासून दूर ग्रामीण भागातील नवशिक्षित रसिकांसाठी अधून–मधून तरी होणे आवश्यक आहे.

२१ फेब्रुवारी ८३ **दिलीप बेळूरकर,**
अंबेजोगाई

## पुणेवार्ता

# विषमतेचा पुरस्कर्ता–मनू ?

आपल्या व्यवहारी आयुष्यात आपण अनेक रूढी, परंपरा, संकेत मनात ठेवून जगत असतो. आपण ते तसेच का जगतो असं जर कोणी विचारलं तर तुम्ही काय उत्तर द्याल? एक तर त्याचं उत्तर पूर्णपणे व्यक्तिगत पातळीवर देता येईल किंवा त्याला काही सामाजिक संदर्भ असेल. तरीसुद्धा आपण तसे जगतो याचं कारण मनूने सांगितलं, मनुस्मृतीत तसं लिहून ठेवलं म्हणून, असं उत्तर नक्कीच कोणी देणार नाही आणि म्हणूनच आजच्या समाजव्यवस्थेतल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषमतेचं मूळ म्हणून जर कोणी सरधोपटपणे त्या मनूकडे बोट दाखवलं आणि मनुस्मृतीचा हिरीरीने निषेध केला, अगदी ती जाळून टाकली तरी मूळ प्रश्न शिल्लक रहातोच.

हे असं मनात यायचं कारण म्हणजे नुकताच, २६ तारखेला दोन चांगल्या पुस्तकांचा प्रकाशनसमारंभ पार पडला. दोन्ही पुस्तकं सुगावा प्रकाशनाची आहेत. एक आहे 'विषमतेचा पुरस्कर्ता मनू' आणि दुसरं–'समाजपरिवर्तनासाठी आंतरजातीय विवाह.' पहिल्या पुस्तकात मनूला ज्या समाजव्यवस्थेचं तत्त्वज्ञान मांडावं लागलं त्या विषम समाजव्यवस्थेचं चित्र आहे, तर दुसऱ्या पुस्तकात ही विषम चौकट (किंवा व्यवस्था !) मोडण्यासाठी जालीम उपाय सांगितला आहे आंतरजातीय विवाह. म्हणूनच या दोन्ही पुस्तकांच्या एकत्र प्रकाशनाला एक संदर्भ आहे.

'विषमतेचा पुरस्कर्ता मनू' या पुस्तकाचे लेखक आहेत डॉ. प्रदीप गोखले. 'अस्मितादर्श'च्या १९८१ च्या दिवाळी अंकासाठी यापूर्वी गोखल्यांनी मनुपुरस्कृत स्त्री–पुरुषविषमतेसंबंधी लिहिले होते. या पुस्तकात मनुपुरस्कृत 'समग्र' विषमता डॉ. गोखले यांनी वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मनुस्मृतीत ज्या ज्या श्लोकांत कोणत्याही प्रकारच्या विषमतेचं तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे त्या श्लोकाचा डॉ. गोखले यांनी सरळ अर्थ देऊन त्याला सविस्तर टीपा जोडल्या आहेत.

प्रकाशन–कार्यक्रमापूर्वी पुस्तकामागच्या भूमिकेबद्दल डॉ. गोखले जे बोलले ते महत्त्वाचं आहे. ते म्हणाले, मी कोण आहे, मी कसा आहे यापेक्षा मी कसं असावं ? हा मानवसमूह कसा असावा असा विचार मला पडतो. याचा विचार करताना न्याय आणि नीती यांचाही विचार मला करावासा वाटतो. त्याचमुळे काही विशिष्ट व्यक्तिसमूहांना मला ज्या सुखसुविधा सहजपणे मिळू शकतात, त्या जन्मापासूनच नाकारल्या जातात हे मला अनीतीचं वाटतं. म्हणूनच मनुपुरस्कृत समाजव्यवस्था मला अन्यायवादी, मानवताविरोधी वाटते.

आजची हिंदूसंस्कृती आणि मनुस्मृती यांच्यातलं नातं कोणतं आहे ? गोखले म्हणाले, 'जाती ईश्वराने तयार केल्या आहेत, आंतरजातीय विवाह टाळले पाहिजेत, मानवी श्रेष्ठत्व जन्मसिद्ध जातींप्रमाणे ठरते ही मनूची विचारसरणी हिंदूसंस्कृती चालवत आहे. काही परंपरावादी प्रश्न विचारतील हे नको, ते नको मग तुम्हाला नेमकं काय हवं आहे ? तर मनुपुरस्कृत समाजव्यवस्थेला (जी विषम पायावर उभी आहे) छेद देणारी एक नवी पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करायला हवी. ती मानवतावादाला धरून असेल. सत्य आणि अहिंसा ही जर इहवादी निरंतर मूल्ये मानली तर या दोन्ही मूल्यांचा अव्हेर मनुस्मृतीत आहे. म्हणजे स्त्रिया आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना शिक्षणापासून सत्य कळण्यापासून वंचित ठेवणे आणि या गटांचा छळ, दडपशाही, पिळवणूक करणे. या प्रकारे ही निरंतर मूल्येच मनूनं नाकारली आहेत.

आता प्रश्न असा पडतो की, ही मानवतावादी पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आधीच एखादा ग्रंथ, तत्त्वज्ञान मांडायला हवं का ?

गोखले त्यांची भूमिका सांगताना म्हणाले, जर एखाद्या कृतीची उपपत्ती कार्यकारणभावानुसार ठरवायची असेल तर प्रत्येक कृती मानवी ठरते. म्हणून तसा तिचा विचार करून चालणार नाही.

डॉ. गोखल्यांची भूमिका त्यांच्या पुस्तकासारखीच स्पष्ट आहे. ते संस्कृतचे आणि तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी आहेत म्हणून या पुस्तकाचं महत्त्व अधिक आहे. ज्यांनी मनुस्मृती मुळातून वाचलेली नाही आणि मनू नेमकं काय म्हणतो हेच ज्यांना माहीत नाही असे अनेक लोक त्याची भक्ती किंवा निषेध करतात. अशांसाठी हे पुस्तक फारच उपयुक्त ठरणार आहे. पुस्तक एकूण आठ प्रकरणांत विभागलं आहे. चातुर्वर्ण्य या पहिल्या प्रकरणात चतुर्वर्ण ब्रह्मदेवाने निर्माण केले आहेत, तो जन्माधारितच आहे, ब्राह्मणांचं जन्मजात श्रेष्ठत्व आणि मरणोत्तर चातुर्वर्ण्य यासंबंधात मनूने लिहिलेले श्लोक आणि त्यांचा अर्थ सविस्तर दिला आहे. याच पद्धतीने व्यावसायिक विषमता, आर्थिक विषमता, कायद्यासमोर विषमता (ब्राह्मणांना कमीत कमीत शिक्षा, एकाच गुन्ह्याबद्दल वेगवेगळ्या शिक्षा) रोटी–बेटी–बंदी, ब्राह्मण, शूद्रादिक आणि अस्पृश्यता, स्त्री–पुरुष–विषमता आणि सामाजिक, सांस्कृतिक व इतर विषमता अशा प्रकारे मनुस्मृतीच्या तत्त्वज्ञानातील विषमतेचे लेखकाने आठ भागांत सविस्तर वर्णन केले आहे.

याच पुस्तकाच्या निमित्तानं बोलताना रावसाहेब कसबे म्हणाले, 'सगळे धर्मग्रंथ देवांच्या भाषेत आहेत ते माणसांना कळत नाहीत. कारण संस्कृत किती जणांना येतं ? (ज्यांना हे धर्मग्रंथ जाणून घ्यायची इच्छा आहे. ते संस्कृत का शिकत नाहीत ?) वेदांचं भाषांतर सामान्यांच्या भाषेत हवं. मनुस्मृतीचं तत्त्वज्ञान प्राकृतात आलं तर तरुणांच्या भ्रमाचा भोपळा फुटेल !'

कसब्यांच्या बोलण्यातला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मनूचं तत्त्वज्ञान ज्या कालखंडात प्रस्थापित झालं त्या वेळची परिस्थिती कशी होती हे पहायला हवं. कारण तत्त्वज्ञान हे काही आभाळातून पडत नाही. तत्त्वज्ञान हा परिस्थितीचा परिणाम आहे. मनूचं तत्त्वज्ञान प्रस्थापित झालं. कारण त्या समाजात जातिव्यवस्था रूढ झाली होती, स्त्रीदास्य निर्माण झालं होतं, सामाजिक, राजकीय व्यवस्था विषमतेचीच होती आणि या सत्ताधाऱ्यांना, या परिस्थितीला तात्त्विक पातळीवर नेऊन

ठेवणारा माणूस हवा होता आणि मनूनं हे काम केलं. आयडिअलायझेशन ऑफ रिअल आणि रिअलायझेशन ऑफ आयडिअल या चक्रातून हे तत्त्वज्ञान फिरवलं गेलं.

त्याहीपेक्षा महत्त्वाचं ते हे की, जी मूल्ये घेऊन पुढं जायचं त्यासाठी तसा समाजदेह निर्माण होणं महत्त्वाचं असतं. व्यक्तिगत पातळीवर हे मानवतावादी तत्त्वज्ञान माहीत असून उपयोग होणार नाही.

## नवी कुंडली

हा समाजदेह निर्माण होण्यासाठी कसबे म्हणतात त्याप्रमाणे संपूर्ण व्यवस्था बदलण्याचं सामर्थ्य राजकीय सत्तेकडे आहे का? प्रबोधनात्मक चळवळ चालू असतानाच राष्ट्रीय सत्ता आपल्या हातात घेणं सध्याच्या समाजव्यवस्थेत शक्य आहे का, याचाही विचार करायला हवा.

समाजपरिवर्तनासाठी आंतरजातीय विवाह या पुस्तकाच्या संपादनात प्रा. प्रदीप गोखले आणि प्रा. विद्यासागर यांनी काम केलं आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर एक आधुनिक कुंडली मांडली आहे. या कुंडलीप्रमाणे विवाहेच्छु मुला-मुलींनी काय पहावं? ग्रहस्थिती? अजिबात नाही. तर वजन, उंची, सुदृढता, सवयी-व्यसने, आवडी-निवडी, स्वभाव, तो/ती मानवतावादी आहे का, रक्तगट, अनुवंशिक रोग आहे का, तो/ती हुंडाविरोधी आहे का असे दहा गुण पहावेत. असा विवाह, मग तो आंतरजातीय असला तरी नक्कीच यशस्वी होईल. यापाठीमागचा शास्त्रीय दृष्टिकोन या पुस्तकात मांडला आहे. आंतरजातीय विवाहातून निर्माण होणारी संतती चांगली असते. कारण त्यामुळे 'डिफेक्टिव-जीन' नेहमीच 'रिसेसिव्ह' असतो आणि चांगला जीन 'डॉमिनंट' असतो.

आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वा. सावरकर, म. गांधी, दयानंदसरस्वती, स्वामी विवेकानंद, जयप्रकाश नारायण यांचे विचार उद्धृत केले आहेत. तसंच यशस्वी आंतरजातीय विवाह केलेल्या काही प्रसिद्ध व्यक्तींची छायाचित्रेही प्रसिद्ध केली आहेत.

प्रा. विद्यासागर या पुस्तिकेबद्दल बोलताना म्हणाले, 'ही पुस्तिका वाचून जर कोणी विचाराला प्रवृत्त झाले तर ते या पुस्तिकेचं यश आहे असं मी समजेन!' त्यां दृष्टीनं ही पुस्तिका नक्कीच यशस्वी ठरेल.

नंतर डॉ. भालचंद्र फडके बोलले. 'आंतरजातीय शब्दाऐवजी जातिनाशक विवाह या एका भयाण शब्दाची त्यांनी ओळख करून दिली. फडके म्हणाले– आंतरजातीय विवाह हे विषमतानिर्मूलनाचे एकमेव साधन आहे, असं कोणी समजू नये. अनेक पातळ्यांवर त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.'

'डॉ. फडक्यांनी सांगितलेला मुद्दा नवीन नाही. आंतरजातीय विवाह हा जर विषमता-निर्मूलनातला एकमेव उपाय असता तर आतापर्यंत होऊन गेलेल्या समता आंदोलकांनी आंतरजातीय विवाहच केले नसते का? पण तो एकमेव उपाय नाही हेच खरं!

सध्याच्या विषमताविरोधी चळवळीतलं एक महत्त्वाचं वैचारिक शस्त्र म्हणून या दोन पुस्तकांचा उल्लेख करायला हवा. रावसाहेब कसबे यांना अभिप्रेत असलेला समाजदेह अशा प्रबोधनात्मक पाऊलखुणांवरूनच पुढे जाईल. तशा प्रकारचं वातावरण हळूहळू तयार होत आहे.

दोन महिन्यांपूर्वी मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करण्यासाठी एक 'अस्पृश्यता-निवारण डायरी' काही तरुण मुला-मुलींनी चांगल्या प्रकारे, बराच अभ्यास करून प्रसिद्ध केली.

लग्नासाठी मांडलेली 'आधुनिक कुंडली' सुशिक्षित, सुसंस्कारित तरुण मुला-मुलींना फारशी नवीन नाही. 'शुभं करोति' सारख्या विवाहेच्छूंच्या मेळाव्यांना मिळणारा वाढता प्रतिसाद हेच दाखवतो.

या नवीन कुंडलीप्रमाणे लग्न करणाऱ्यांची संख्याही काही अगदीच निराशाजनक नाही. आणि या तरुण मुला-मुलींना आपल्याच संस्कृतीत कोणी एक मनू होऊन गेला हे कदाचित माहीतही नाही!

मनूनं विषमतेवर आधारित समाज-व्यवस्था निर्माण केली नाही तर त्या व्यवस्थेचं फक्त तत्त्वज्ञान मांडलं हे जरी आपण साऱ्यांनी मान्य केलं तर ते खूपच आशादायक नाही का?

—मेधा राजहंस

---

## साप्ताहिक माणूस

मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन
(अधिनियम ४, व नियम ८ अन्वये)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : पुणे |
| २. प्रकाशन काल | : साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. |
| ४. नागरिकत्व | : भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या मालकांचे नाव व पत्ता | : राजहंस प्रकाशन श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.
दिनांक १ मार्च १९८३

प्रकाशकाची सही
श्री. ग. माजगावकर

## मुंबई महापालिका

# पत्रकारांच्या गळचेपीचा प्रयत्न पुनः एकदा फसला!

कपिल पाटील

पत्रकारांवर बंधने घालण्याचा मुंबई–महानगरपालिकेचा प्रयत्न पुरता फसला आहे. महापालिकेचे वृत्त घेणाऱ्या पत्रकारांनी काय छापावं, काय छापू नये हे सांगणारी नियमावली तयार करण्याचा प्रयत्न पालिका–प्रशासनाने चालविला होता; परंतु नियमावली पालिकेच्या बैठकीत मंजूर होण्यापूर्वीच वृत्तपत्रांतून झालेल्या टीकेमुळे त्यासंबंधीचे टिपण मागे घेण्यात आलं आहे.

मुंबई महानगरपालिकेचेचिटणीस कमलाकर कोल्हटकर यांनी तयार केलेलं हे टिपण बिहार वृत्तपत्र विधेयकाची छोटी आवृत्तीच होतं. पालिकेतील पत्रकारांच्या प्रवेशावर नियंत्रण करण्याच्या उद्देशाने दहा जानेवारी रोजी श्री. कोल्हटकर यांनी हे टिपण तयार केले होते. पालिकेच्या बैठकीपुढे विचारार्थ मांडण्यात येणारे हे टिपण महिन्यापूर्वी पालिकेतील पक्षनेत्यांना देण्यात आले होते; परंतु याबाबचे वृत्त महिनाभराने मुंबईच्या 'डेली' या इंग्रजी वृत्तपत्रात प्रथम आले. तोवर या गटनेत्यांनी या टिपणास कोणताही विरोध दर्शविला नव्हता, हे विशेष आणि इथेच खरी गोम आहे!

पत्रकारांवर बंधने लादण्याची ही कल्पना केवळ पालिका–चिटणिसांची नव्हे हे उघड आहे. मुंबईच्या महापौरांना आणि नगरसेवकांनाही वृत्तपत्रे खुपू लागली आहेत. त्या साऱ्यांचा अप्रत्यक्ष–प्रत्यक्ष आशीर्वादच या प्रस्तावाला होता. महापौर डॉ. प्रभाकर पै (भाजप) यांचा तर या प्रस्तावास उघड पाठिंबा असल्याचे आधीच स्पष्ट झाले आहे. (महापौरांनी याबाबत खुलासा केला आहे; पण ही नंतरची मखलाशी!) केरळ आणि गोवा यांच्या अर्थसंकल्पाच्या बेरजेइतका मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार आता चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. गेल्या वर्षभरात अनेक प्रकरणं मुंबईच्या मराठी, गुजराथी व इंग्रजी वृत्तपत्रांमधून येत राहिली. पालिकेतला भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार एकट्या–दुकट्याचा कधीच नसतो! छोट्या कर्मचाऱ्यापासून नगरसेवकांपर्यंत अशा अनेकांच्या तंगड्या एकमेकांत अडकलेल्या असतात. त्यामुळे अशी प्रकरणे अभावानेच प्रबळ पुराव्यासह बाहेर येतात; परंतु गेल्या वर्षदोन वर्षांत वृत्तपत्रांनी महापौर आणि प्रशासन यांना बरीच डोकेदुखी दिल्याने पत्रकरांवर बंधने लादण्याचा विचार प्रशासनाने केला हे स्पष्ट आहे.

### आम्ही सांगू तेच छापा!

हे टिपण आहे काय? पालिकेच्या बैठकींचे वृत्त घेण्यासाठी येणाऱ्या पत्रकारांच्या संख्येवर मर्यादा घालण्याच्या उद्देशाने हे टिपण तयार करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आलं होतं. अनेक साप्ताहिक आणि पाक्षिकांनीही आपल्या प्रतिनिधींना पालिकेच्या पत्रकारकक्षेत बसू देण्याची विनंती केल्याने काही नियम करण्याची गरज प्रशासनाला वाटते, असे ९ फेब्रुवारी रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत पालिका चिटणिसांनी सांगितले. 'पालिकेतील पत्रकारांच्या प्रवेशाबाबत कोणतेही नियम अस्तित्वात नसल्याने' प्रशासनास अनेक अडचणी येत असल्याचे, या टिपणाच्या सुरुवातीलाच म्हटलंय. याबाबत काही नियम तयार करण्याच्या उद्देशाने पालिकेने विधानसभा सचिवालयातून पत्रकारांच्या प्रवेशाबाबत असलेली मार्गदर्शक तत्त्वे मागविली, असंही टिपणात स्पष्ट करण्यात आलं होतं.

एक गोष्ट खरी आहे की, पत्रकार म्हणून महापालिकेच्या पत्रकारकक्षेत शिरणाऱ्या 'घुसखोरांची' च संख्या वाढली आहे, ज्यांचा वृत्तपत्रांशी काही संबंध नाही अशी माणसं तेथे येतात. अर्थात त्यांच्या हितसंबंधांसाठी. त्यांना रोखणं जरुरीचं आहे आणि त्याबाबत कोणाही अधिकृत पत्रकाराची ना नाही. (हे 'घुसखोर' कोणाच्या आशीर्वादाने तिथे येतात हे वेगळं सांगायला नको.) मान्यताप्राप्त पत्रकारांनाच प्रवेश दिला जाईल या नियमास आक्षेप घेण्याचे कारण नाही; पण त्यापुढे जी बंधने सुचविण्यात आली आहेत ती थेट बिहार वृत्तपत्र–विधेयकाच्या धर्तीची. 'आम्ही सांगू तेच छापा, त्यापलीकडे काही छापता येणार नाही!' असा एकंदर सूर या टिपणात आहे.

### महापौरांना सर्वाधिकार

महापौरांच्या आदेशानुसार पालिकाचिटणीस पत्रकारांना प्रवेशिका देतील आणि त्यात दैनिके आणि वृत्तसंस्था यांना अग्रक्रम असेल हा यातील पहिला नियम. त्याला आक्षेप असण्याचं कारण नाही; परंतु त्यापुढचे काही नियम, नियमक्रमांक ५, ६, ९, १० आणि ११ हे मात्र जाचकच नव्हेत, सरळ अन्याय करणारे होते. वृत्तपत्रांनी पालिकेचे कोणते वृत्त छापावे आणि काय छापू नये याबाबतचे सर्व अधिकारच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे महापौरांच्या हातात हे नियम देतात. यातील पहिला, प्रवेशाच्या संख्येबाबतचा नियम कायम ठेवून बाकी टिपण मागे घेण्यात आलेलं असलं तरी महापालिकेच्या प्रशासनाकडून ज्या छुप्या हेतूने असे नियम करण्याचा प्रयत्न झाला तो पाहण्यासाठी हे नियम माहीत करून घ्यायला हवेत. दुर्दैवाने मराठीतील कोणत्याही दैनिकाने आधी आणि नंतरही याबाबत पुरते

तोंड उघडले नव्हते.

**मान्यताप्राप्त पत्रकार योग्य आणि चांगला वृत्तांत देतील हे पाहूनच त्यांना प्रवेशिका दिल्या जातील, असे पाचवा नियम** सांगतो. आता पत्रकाराने **'चांगला आणि योग्य' वृत्तांत दिला हे कोण ठरवणार ?** आणि कोणत्या निकषाच्या आधारावर ? **याचा कोणताही खुलासा या टिपणात** नव्हता. शेवटचे दोन नियम तर महापौरांना सर्वाधिकारच देऊन टाकतात. या टिपणाव्यतिरिक्त अन्य नियम करण्याचे सर्व अधिकार तर महापौरांना मिळतातच; पण **कोणत्याही पत्रकाराची प्रवेशिका महापौर केव्हाही रद्दबातल करू शकतात.** याचा सरळ अर्थच असा आहे की, महापौरांची हांजी हांजी करणाऱ्या किंवा प्रशासनातील गैरव्यवहारांकडे सरळ डोळेझाक करणाऱ्या पत्रकारांनाच महापालिकेत प्रवेश मिळणार आहे.

## अजब सेन्सॉरशिप

नियम क्रमांक सहाखाली पत्रकारांना कोणकोणता मजकूर प्रसिद्ध करता येणार नाही याचे पाच उपनियम दिलेत. ही प्रसिद्धिपूर्व नियंत्रणे अशी–

१) पालिका बैठकीत फेटाळण्यात आलेले हरकतीचे मुद्दे किंवा प्रश्न.

२) महापौरांनी दाखल करून घेण्यापूर्वीचे प्रस्ताव.

३) पालिकेपुढे किंवा संबंधित समिती. पुढे मांडण्यापूर्वी अर्थसंकल्प किंवा त्यातील भाग.

४) वृत्तपत्रांना वितरित करण्यात न आलेल्या गोपनीय बाबी किंवा गोपनीय चर्चा (बंद खोलीतील)

५) सार्वजनिक प्रसिद्धीसाठी नसलेल्या बाबी वृत्तपत्रांना प्रसिद्ध करता येणार नाहीत. ही पाच बंधने भंग करणाऱ्या पत्रकाराची प्रवेशिका काढून घेतली जाईल असा नववा नियम आहे. ही तर अजब सेन्सॉरशिप झाली !

## इतिहास

बिहार वृत्तपत्रविधेयकाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांची आघाडी सत्तेवर असलेल्या मुंबईमहापालिकेत पत्रकारांवर ही अशा प्रकारची सेन्सॉरशीप लादण्याचा प्रयत्न व्हावा ही उद्वेगजनक गोष्ट आहे. वृत्तपत्रांतून ओरड होईस्तोवर पालिकेतील सर्वच पक्षांच्या गटनेत्यांनी पाळलेलं मौन सूचक आहे. पालिकेतील या सर्वच पक्षांना (अपवाद फक्त काही नगरसेवकांचा) आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना या प्रसिद्धिपूर्व नियंत्रणाची गरज का भासावी ? अधिकाऱ्यांपासून नगर सेवकांपर्यंत कोणाचेच 'व्यवहार' आता गुपचुप रहात नाहीत. पालिकेच्या खर्चाने होणारे परदेशदौरे, पार्ट्या यांचा गुपचुप व्यवहार गेल्या वर्षभरात चांगलेच चव्हाट्यावर आले. **सर्वांत महत्त्वाचं प्रकरण म्हणजे कोरियन पोलाद पत्र्यांच्या खरेदीचा करार. संबंधित कंपनीचं नाव काळ्या यादीत असूनही पालिकेने हा करार केला. या व्यवहारात पालिकेतील पक्षांना १७ लाख रुपये प्रत्येकी मिळाल्याचे बोलले जाते. ज्या 'सेल' या प्राधिकरणामार्फत हा व्यवहार झाला त्या प्राधिकरणावर मुंबई जनता पक्षाचे अध्यक्ष शांती पटेल आहेत. तर सॅमसुंग डॉक्सन या त्या कोरियन कंपनीच्या येथील शाखेच्या व्यवस्थापनात मुंबई इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष मुरली देवरा यांचा मेव्हणा संतोष मस्कार प्रमुखपदी असल्याचे समजते. केन्द्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनीही या व्यवहारात बराच रस घेतल्याचे पालिका गोटातून कळते.**

या नाट्यागोट्यांचा संदर्भ इथे महत्त्वाचा आहे. वृत्तपत्रांतून या करारावर बरीच ओरड झाल्यानंतर स्थायी समितीच्या बैठकीत या कराराला मंजुरी देण्याच्या वेळी भाजपचे प्रेमकुमार शर्मा आणि जनता पक्षाचे एकनाथ कोपर्डे यांनी विरोधाचं नाटक चांगलंच रंगवलं; परंतु या कराराला मंजुरी देण्याबाबत सर्वच पक्षांचे स्पष्ट आदेश होते. शांती पटेलांनी तर व्हीपच काढला होता, असं सांगण्यात येतं.

महापालिकेतील व्यवहार कसे चालतात आणि त्यात सर्वांचेच पाय कसे अडकलेले असतात हे सांगण्यासाठीच थोडे विषयांतर करून हा तपशील दिला. खरं तर पत्रकारांचा धसका पालिकेने यामुळेच घेतला. आणखी एक – महापौरांची बेताल वक्तव्ये काही हुशार पत्रकारांनी उचलल्याने ती महापौरांना आणि भाजपला एक डोकेदुखीच होऊन बसली होती. महापौरांच्या सूचनेवरून तयार करण्यात आलेल्या या टिपणीमागे असा इतिहास आहे.

पत्रकारांवर बंधने घालण्याच्या या प्रयत्नांवर वृत्तपत्रांतून टीका होताच नगरसेवक जागे झाले. त्यानंतर स्थायी समितीच्या बैठकीत प्रशासनाच्या या टिपणीवर जोरदार टीका करून त्याची सारी जबाबदारी त्यांनी प्रशासनावर झटकून टाकली. महिनाभर मौन पाळून असलेले हे गटनेते त्या दिवशी एकदम वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या नावाने गळा काढू लागले. नगरसेवकांना नाटकं चांगली करता येतात. कोरियन पोलाद पत्र्यांच्या कराराच्या वेळीही असाच खोटा विरोध त्यांनी केला होता !

## शरमेची गोष्ट

पालिका चिटणिसांनी तयार केलेलं हे टिपण वेळीच वृत्तपत्रांतून टीका झाली नसती तर मंजूरही झालं असतं; पण असा प्रयत्न होत असल्याचे कळताच पत्रकारांनी तरी एक होऊन त्यावर विरोध नोंदवला काय ? उत्तर आहे, 'नाही !' शरमेची गोष्ट म्हणजे एकाही मराठी वृत्तपत्रांतून यावर ओरड झाली नाही ! फक्त 'डेली' या इंग्रजी दैनिकाच्या अंबरीष मिश्रा या तरुण पत्रकाराने त्याला प्रथम तोंड फोडलं. स्थायी समितीच्या बैठकीत या टिपणाला झालेल्या विरोधाचं वृत्त मात्र लोकसत्तेनं ठळकपणे प्रसिद्ध केलं. बाकीची वृत्तपत्रे काय झोपली होती ? घोडं पेंड इथेच खात होतं. **शरमेची गोष्ट म्हणजे पालिका चिटणिसांनी पालिकेतील एका तथाकथित 'श्रेष्ठ' पत्रकाराच्या मदतीनेच हे टिपण तयार केल्याचं समजतं.** यावर मल्लिनाथी न करणं बरं !

पण याहून उद्वेगजनक प्रकार दुसराच आहे. पालिका प्रशासनास डोकेदुखी झालेल्या एका गुजराथी पत्रकारास आणि एका इंग्रजी पत्रकारास त्यांच्या संपादकांकडून तंबी मिळाली! या दोहोंकडील पालिकेचे वृत्त घेण्याची जबाबदारी काढून घेण्यात आली आणि त्यांच्यावर दुसरी कामे सोपविण्यात आली. यापैकी एका संपादकाच्या घरचा तुंबलेला संडास, आयुक्तांनी स्वतः त्या भागाची तपासणी घेऊन, दुरुस्त करण्याचा आदेश दिल्याचे समजते. यानंतर संबंधित पत्रकारावर वरील कारवाई झाली !

पत्रकारांवर बंधने लादण्याचा मुंबई पालिका प्रशासनाचा प्रयत्न पुरता फसला आहे; परंतु त्या निमित्ताने अनेक प्रश्न समोर आलेत. पालिकेतील पक्षनेत्यांचं मौन बरंच काही बोलून गेलं. पत्रकारांतही एकवाक्यता नसल्याचं अधिक दुःख ! तिकडे बिहारचे मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा यांनी बिहार वृत्तपत्रविधेयक मृतवत झाल्याची घोषणा केली असतानाच पालिका प्रशासनाने पत्रकारांवर बंधने टाकण्यासाठी तयार केलेलं टिपण मागे घेतल्याचं वृत्त हाती आलंय ! □

# उध्वस्त आसाम सरकार कसे सावरणार ?

**वा. दा. रानडे**

आसामच्या निवडणुकांनी आपल्या लोकशाहीपुढे काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांची योग्य उत्तरे आपण शोधली नाहीत तर देशाच्या राजकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. लोकविरोधास डावलून या निवडणुका केंद्र सरकारने हट्टाने पुऱ्या केल्या आणि तेथे आपल्या पक्षाचे सरकार सत्तेवर आणण्याची मनीषा पूर्ण केली; पण त्यासाठी केवढी जबर किंमत द्यावी लागली? पोलीस-गोळीबारात आणि हिंसाचारात तेथे एक हजार लोक ठार झाले असा आकडा केंद्रीय गृहमंत्री प्रकाशचंद्र सेठी यांनी लोकसभेतील चर्चेत सांगितला; पण आसामच्या एका खासदाराच्या अंदाजानुसार ही हानी तीन हजारांच्या घरात जाईल! मालमत्तेची हानी निराळीच! निवडणुकीच्या निकालांचे आकडे आकाशवाणीवर सांगितले जात होते, वृत्तपत्रात येत होते. इंदिरा काँग्रेस जवळजवळ सर्व जागा जिंकणार हे त्यावरून उघड दिसत होतेच. 'काँग्रेस (आय)ची विजयाकडे घोडदौड' असे शीर्षक एका वृत्तपत्राने बातमीस दिले होते; पण लोकांना या निवडणुकीत रस नव्हता. त्यांना दिसत होते या लादलेल्या निवडणुकीमुळे आसाममध्ये लोकक्षोभातून झालेली जीवित व मालमत्तेची मोठ्या प्रमाणावरील हानी धुमसत असता आसाम कसा शांत होईल? केव्हा शांत होईल? ही चिंता लोकांपुढे होती व आहे. या साऱ्या परिस्थितीला जबाबदार कोण? हे सारे टाळता आले नसते का? हे प्रश्न लोकांपुढे आहेत.

घटनात्मक जबाबदारी म्हणून या निवडणुका घेण्याशिवाय दुसरा पर्यायच सरकारपुढे नव्हता. शांत व खुल्या वातावरणात या निवडणुका होणार नाहीत हे सरकारलाही स्पष्ट दिसत होते; पण त्याचा दोष सरकारकडे येत नाही. घटनात्मक जबाबदारी आम्हाला पार पाडायलाच हवी. ही परिस्थिती निर्माण होण्यास विरोधी पक्षच जबाबदार आहेत. घटनादुरुस्ती करून राष्ट्रपती राजवटीची मुदत वाढविण्यास आमची तयारी होती. विरोधी पक्षनेत्यांपुढे आम्ही ही सूचना मांडली त्या वेळी त्यांनी तिला पाठिंबा दिला नाही. त्यामुळे निवडणुका घेण्याशिवाय दुसरा मार्ग आमच्यापुढे राहिला नाही असे समर्थन आसाममधील निवडणूक-दौऱ्यातल्या भाषणात पंतप्रधान इंदिरा गांधींनी केले; पण विरोधी पक्षाच्या भूमिकेचा हा चक्क विपर्यास कसा होता हे अटलबिहारी वाजपेयी आणि मधु दंडवते या विरोधी पक्षनेत्यांनी निदर्शनास आणलेच आहे. आसामी नेत्यांबरोबर वाटाघाटींची ठरलेली फेरी होऊ द्या, त्यात तोडगा निघाला तर ठीकच आहे. तो निघाला नाही तर संसदेची खास बैठक बोलावून घटनादुरुस्ती मंजूर करून घेता येईल अशी सूचना विरोधी-नेत्यांनी केली होती. राष्ट्रपती राजवटीची ही मुदतवाढ केवळ आसामपुरतीच असावी. इतर राज्यात राष्ट्रपती राजवटीची मुदत वाढविण्यासाठी तिचा उपयोग केला जाऊ नये अशी अट त्यांनी घातली होती; पण पंतप्रधानांनी ते मान्य केले नाही. आसाम-नेत्यांशी ४ व ५ जानेवारीला बोलणी अयशस्वी झाल्यानंतर सरकारने लागलीच दुसऱ्या दिवशी निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. एवढी घाई करण्याची काय आवश्यकता होती? विरोधी पक्षांच्या सूचनेप्रमाणे संसदेची खास बैठक बोलावून घटनादुरुस्ती मंजूर करून घेण्यास सरकारला वेळ होता; पण त्याने तसे न करता आसामी जनतेवर तिच्या इच्छेविरुद्ध निवडणुका लादल्या! त्यामागे आपल्या पक्षाला सत्तेवर आणण्याची घाईच इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना झाली होती हे उघड आहे!

## आयोगाने काय केले ?

घटनादुरुस्ती न करता निवडणुका जाहीर केल्या ही पहिली चूक; पण त्या रद्द करून ती दुरुस्त करता आली नसती का? तसेही सरकारने केले नाही. राष्ट्रपती राजवटीची मुदत संपण्यापूर्वी निवडणुका घ्यायलाच हव्या होत्या. घटनेनेच ती जबाबदारी सरकारवर टाकली होती, असे सरकारचे म्हणणे. निवडणुका रद्द करणे शक्य नव्हते. मतदारयाद्या तयार करणे, उमेदवारीचे अर्ज भरणे वगैरे निवडणूकप्रक्रिया एकदा सुरू झाल्यावर ती मध्येच थांबविता येत नाही अशी या प्रश्नावर सरकारची भूमिका होती. सर्वोच्च न्यायालयानेही हीच भूमिका घेऊन निवडणुकांना हरकत घेणारे अर्ज फेटाळून लावले! निवडणुका झाल्यानंतर हे प्रश्न उपस्थित करता येतील असा अभिप्राय न्यायालयाने व्यक्त केला. आता तसे अर्ज केले जातील आणि निवडणुका रद्द ठरण्याचाही संभव आहे; पण आसाममध्ये जीवित व मालमत्तेची जी मोठी हानी झाली तिचे काय? ती थोडीच भरून येणार आहे?

निवडणुका म्हणजे शांत व खुल्या वातावरणातील निवडणुका. तशा त्या होत नाहीत हे स्पष्ट झाल्यावर त्या रद्दच करायला हव्यात. निवडणूक-आयोगानेच त्या रद्द करायला हव्या होत्या. शांत व खुल्या वातावरणाने निवडणुका झाल्या पाहिजेत हे पाहण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. निवडणुकांसाठी योग्य वातावरण आहे याची आपल्या निरीक्षकांमार्फत स्वतंत्रपणे पाहणी करून आयोगाने याबाबतीत निर्णय का घेतला नाही? आयोग असे निर्णय घेऊ शकत नसेल तर ते स्वायत्त आहे असे म्हणण्यात काय अर्थ? ते पूर्णपणे स्वायत्त नाही, हेच यावरून दिसून येते. निवडणूक-आयोगाच्या आणि निवडणूक-व्यवस्थेच्या यंत्रणेतच सुधारणा करायला हव्यात. मुख्य निवडणूक-आयुक्त त्रिवेदींनी काही उणीवांकडे यापूर्वीच लक्ष वेधून त्यात सुधारणा यापूर्वीच सुचविल्या आहेत. एक मुख्य उणीव म्हणजे राज्याचा मुख्य निवडणूक अधिकारी हा सरकारने नेमलेलाच अधिकारी असतो. राज्यातील निवडणुकांसंबंधी अंतिम निर्णय त्याच्या अहवालाच्या आधारेच घेतले जातात; पण हा सरकारी अधिकारी असल्याने तो स्वतंत्रपणे निर्णय न घेता सरकारी धोरणानुसारच निर्णय घेण्याचा संभव असतो. आसाममध्ये तसेच घडले. निवडणुका रद्द करण्याची शिफारस काही या अधिकाऱ्याने केली नाही आणि केंद्र सरकारला तर निवडणुका हव्याच होत्या. राज्याचा मुख्यनिवडणूक अधिकारी हा सरकारी अधिकारी असू

पृष्ठ ३२ वर

या ना त्या निमित्ताने...

# ऐरावत व श्याम

फिरोझ रानडे

'तुमचे पण एखाद दिवस असेच रेखा-चित्र येईल नाही ?'

रविवारच्या दुपारची काही तरी साडे-तीन-चारची वेळ होती. श्याम कॉटवर डोळे मिटून पहुडला होता. म्हणजे झोपला होता असे नाही. नुसता पहुडला होता. राधा बाजूच्या खुर्चीवर काही तरी मासिक वाचत होती.

'तुमचे पण एक दिवस असेच रेखा-चित्र येईल असे म्हणत होते मी.' राधाने परत एकदा आपले म्हणणे म्हटले. पहिल्या म्हणण्यावर श्यामची काहीच प्रतिक्रिया तिला दिसली नव्हती.

ह्या दुसऱ्या म्हणण्याने मात्र श्याम हलवला गेला. त्याने डोळे उघडले व पडल्या-पडल्याच डोळे किलकिले करून राधाकडे पाहिले. राधाच्या हातात इंग्रजीत ज्याला smart म्हणतात तसे स्मार्ट कव्हर असलेले काही मासिक होते.

राधा कोणा स्मार्ट मासिकातले काही रेखा-चित्र बघून आपलेही तसे चित्र येईल असे म्हणते आहे हे बघून श्यामची उत्सुकता चाळवली गेली. तो तडातडी उठला व राधाच्या जवळ गेला. तिच्या हातातल्या मासिकाचे कव्हर पाहून म्हणाला, 'हात तेरी की. आपले नेहमीचे साप्ताहिक होय. मला वाटले की काही नवीन आहे. मी एकदम ओळखलंच नाही !'

झाले होते तसेच. त्या नेहमीच्या साप्ताहिकाचे मुखपृष्ठ आतापर्यंत अगदी साधं असायचे. गेल्या तीन-चार अंकांपासून ते मोठे रंगी-बेरंगी व टापटिपेचे झाले होते. एखादी नाशिक-खानदेशकडली मुलगी मुंबईला चार-सहा महिने राहिली की कशी स्मार्ट दिसते ? थोडी रंगी-बेरंगी साडी-त्यावर मॅचिंग-पणाचे पोलके व दोन्ही अगदी नवीन पद्धतीने नेसलेले अशी जर आपल्यासमोर आली तर आपण तिला चटकन ओळखू ? श्यामचे. त्या साप्ताहिकाबाबत तसेच झाले.

साप्ताहिकाच्या कोणतेपणाबाबतची उत्सुकता निमताच श्यामला राधाच्या 'तुमचे पण असेच रेखा-चित्र येईल नाही ?' ह्या प्रश्नामागच्या कारणाची उत्सुकता लागली. त्याने राधा पहात असलेल्या साप्ताहिकात डोके खुपसले.

महाराष्ट्रातल्या कोणा एक-दोन संस्थांतर्फे पुण्याला 'मराठी-विनोद' ह्या विषयावर काही प्रसिद्ध वक्त्यांची तितक्याच किंबहुना कांकणभर जास्तच प्रसिद्ध विनोदी लेखकांवर एक व्याख्यानमाला आयोजित झाली होती. कोणी तरी मोठ्या तत्परतेने ती भाषण फीत बंद केली होती व तेव्हढ्याच तत्परतेने कोणी तरी ती संकलन केली होती. दर हप्त्याला एक ह्याप्रमाणे ती प्रसिद्ध व्हावयाची होती.

ह्या हप्त्याच्या लेखांकावर नव्या-जुन्या अतिरथी–महारथी विनोदी लेखकांची छानपैकी रेखा-चित्रे दिली होती. त्यात 'मास्तर' होते, 'आचार्य' होतेच; पण हसवण्याचा धंदा करणारे 'शेटजी' पण होते.

श्याम गेले वर्ष-दीड वर्ष त्याच्या समजुतीने विनोदी असे लिहू लागला होता. त्याला उद्देशूनच राधा त्याला म्हणाली होती, 'एक दिवस तुमचे पण असेच रेखा-चित्र येईल नाही ?'

'किती राधा भोळी आहे नाही ? ह्या रथी-महारथींनी खरोखरच आपले आयुष्य साहित्याच्या रणांगणावर घालवले होते. ३०–३०, ४०–४० वर्ष ह्या लोकांनी महाराष्ट्राला हसवले होते. केव्हढी बुद्धिमत्ता त्यांची–केवढी तपश्चर्या ! त्यांच्यासारखे माझे रेखा-चित्र कसले येते खाक ! असा सर्व सारासार विचार करून श्याम राधाला म्हणाला,

'अग ' कुठे हे इन्द्राचे ऐरावत आणि कुठे माझी श्याम–भटाची तट्टाणी !'

श्यामला आपल्या श्याम ह्या नावाबद्दल आयुष्यात प्रथमच वाईट वाटले. ह्या म्हणीच्या निर्मात्याला तट्टाणीच्या मालकाकरता श्याम-भटाशिवाय कोणी दुसरा भट सापडू नये ना, श्यामच्या मनात विषाद आला.

अर्थात राधाचे श्यामच्या विषादाकडे बिलकुल लक्ष नव्हते. ती श्यामकडे त्याचे रेखाचित्र कोणत्या angle ने जास्त विनोदी येईल ह्याचा विचार करत पहात होती. तसे पाहून झाल्यावर तिने परत त्या छापलेल्या रेखा-चित्रांकडे पाहिले व म्हणाली, 'आहेत खरंच एक एक जण ऐरावत !' श्यामने राधाकडे चमकून पाहिले. तिच्या म्हणण्यात विनोदाचा भाग किती होता हे काही तिच्या चेहऱ्यावरून कळले नाही.

'बरं ते ऐरावत राहू देत बाजूला. चांगला फर्मास चहा कर पाहू !'

बाकी इतर वेळी राधाने परत चहा करायला थोडी का–कू केली असती. पण आपल्या नवऱ्याचे रेखा-चित्र येणार ह्या कल्पनेने ती अशी भारावून गेली होती की श्यामचा अर्ध्या तासापूर्वीच चहा झाला आहे हे ती विसरूनच गेली होती.

राधा उठून गेली व श्याम तिच्या खुर्चीवर बसला. फक्कड चहा वगैरे झाला की वाचू मग तो 'मराठी-विनोदा'वरचा लेख ह्या विचाराने तो ते साप्ताहिक चाळू लागला. त्यात पुस्तकांच्या प्रेमाबाबत होते, पंजाबबद्दल चिंता होती, चिपकोबाबत कौतुक होते, अगदी सारिका ह्या गुणी नटीबद्दल हळहळ सुद्धा होती. ते सगळे वाचेपर्यंत राधा नुसता चहाच नाही तर खमंगपैकी काही खाण्याचे पण घेऊन आली.

'ह्या व्याख्यानमालेत ह्या विनोदी लेखकांच्या बायकांनी खमंग खायला देऊन उत्तेजन दिल्याबाबत काही असेल का ?' श्यामच्या मनात एक प्रश्न डोकावला.

श्याम खमंग–बशी खाऊ लागला. राधाने ते साप्ताहिक उघडून वाचायला सुरुवात केली.

'अहो, एक नाही दोन नाही, चांगली दहा व्याख्याने आहेत ह्या एका विषयावर ! एका अंकात एक ह्याप्रमाणे दहा अंकात ती भाषणे देणार आहेत !'

राग आला की दहा अंक मोजावेत असे शहाणीसुरती माणसे म्हणतात म्हणजे तो शमतो म्हणे; पण विनोद शमण्याकरतासुद्धा मोजून दहा अंक काढावे लागतात ना ? श्यामने मनात आलेले विचार बाजूला केले व विचारले,

'कोण कोण आहेत ग व्याख्याते ?'

'बहुतेक सगळी प्राध्यापकमंडळीच आहेत व तीही टीकाकारच ! तसे आहेत एक जनरल गोष्टी लिहिणारे व एक विनोदी लेखक पण तेही प्राध्यापकच. काय सुळसुळाट झाला आहे ह्या प्राध्यापक टीकाकारांचा !'

'मग त्याला काय हरकत आहे ?' शांत श्याम.

‘अरे पण ह्यांना विनोदावर बोलायला दहा विनोदी लेखक मिळू नयेत ? विषय ‘विरोध’ असो वा ‘विनोद’ असो–हे टीकाकार–प्राध्यापक आपले बोलायला तयार !’

राधा चिडली म्हणजे जाम चिडते. त्या जामपणाची खूण म्हणजे आजचा खमंग पदार्थ कसा झाला आहे हे तिने विचारले सुद्धा नाही. त्या अवघड प्रश्नातून आपली सुटका झाली ह्याचा श्यामला आनंद झाला. त्या आनंदात व पोट भरल्याच्या आनंदात तो म्हणाला,

‘अग, ह्या प्राध्यापक लोकांना आणणे मोठे सोयीचे असते. विशेष तयारी न करता त्यांना महाविद्यालयात चाळीस–पंचेचाळीस मिनिटे बोलायची सवय असते. त्यामुळे कोणत्याही विषयावर थोडी तयारी केली की बाजी मारता येते. त्यामुळे एखाद्या साडीत जसा काही गुण नसतो; पण रंग पक्क्याची गॅरेंटी असते तसे प्राध्यापकाचे भाषण पक्के होणार ह्याची गॅरेंटी असते !’

‘तुम्ही काही म्हणा, मला काही पटत नाही ते !’ राधा रिकाम्या कप–बश्या घेऊन स्वैंपाकघरात गेली.

श्यामचे पोट भरले होते. दूदवर अति–भिकार चित्रपट होता. पूर्वी फक्त भिकार चित्रपट लागत; पण आता ‘राष्ट्रीय’ झाल्यापासून अति–भिकार दाखवले जाऊ लागले होते. त्यामुळे घाई–घाईने दूद लावण्याची गरज नव्हती. श्यामने शांतपणे वाचायला सुरुवात केली.

पहिले भाषण अर्थातच श्रीपाद कृष्णांवर होते. तेही एका मोठ्या अधिकारी व्यक्तीचे. त्यात श्रीपाद कृष्णांच्या लिखाणातले बारकावे दाखवले गेले होते. त्यांच्या लिखाणातल्या काही त्रुटी पण दाखवल्या गेल्या होत्या; पण एकंदरीत श्रीपाद कृष्णांचा विनोद म्हणजे काय विचारता महाराज ? ह्या धर्तीचे होते. विनोदी लिहिणे एक वेळ सोपे आहे; पण त्याचे विश्लेषण वगैरे करणे फार अवघड आहे हे श्यामच्या पहिल्या फटक्यालाच लक्षात आले.

¤

आता श्याम व राधा दर आठवड्याचे शनिवारी त्या स्मार्ट मुखपृष्ठ असलेल्या साप्ताहिकाची वाट पाहू लागली. आता ते चिपको वा सारिकाबद्दल न वाचता ते तडक मराठी–विनोदाच्या व्याख्यानमालेकडे वळू लागले. ह्या वेळचे भाषण होते गडकऱ्यांवरचे व तेही पहिल्याइतक्याच अधिकारी व्यक्तीचे, तितकेच अभ्यासपूर्ण; पण त्यातही गडकऱ्यांचा एकंदर जळजळीत क्रूर विनोद म्हणजे काय विचारता महाराजा? अशा कौतुकवृत्तीचे

‘बघ, माझ्या मनात जो प्रश्न अगदी पहिल्या दिवशी आला होता तो ह्या प्राध्यापकांनी विचारला आहे.’ श्याम त्या दिवशीचा लेख वाचत म्हणाला,

‘कोणता प्रश्न ?’ राधा.

‘हाच की जुन्या आणि नव्या दहा विनोदकारांवर भाषणे आहेत; पण त्यात एकही स्त्री–विनोदकार नाही !’ व्याख्यात्याचे मत सांगून श्याम पुढे म्हणाला, ‘मी नेहमी म्हणतो तेच खरे. बायकांना विनोदबुद्धी नाही !’

‘ह्याचा अर्थ तसा नाही. ह्याचा अर्थ समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे स्त्रिया टवाळ नाहीत, त्यांना कुचाळक्या करता येत नाहीत असा आहे !’

‘राधा. हे तू बोलावंस ? एका बाईने ?’

हे ऐकून राधा ओशाळली. राधाच नव्हे तर श्यामच्या नात्यातल्या व गोत्यातल्या बायका इतर बायकांना कुचाळकी–रसात अगदी बुडवून काढत असतात हे श्यामला माहीत होतं तसं राधाला पण. म्हणून राधाचा खजिलपणा !

‘बरं ते राहू दे; पण खरंच काय कारण असेल हो, स्त्रिया चांगल्या विनोदी लेखिका न होण्याचं ? कोणी ह्याचा गंभीरपणे विचार कसा केला नाही? ह्या प्राध्यापकांनी फक्त प्रश्न विचारला आहे–उत्तर दिले नाही आहे!’

प्राध्यापक फक्त प्रश्नच विचारतात, ते उत्तरे कधी देतात ? श्याम मनाशी म्हणाला; पण राधाची समजूत काढण्याच्या आवाजात म्हणाला, ‘एकदम प्रगती कशी होईल ? ह्या दहा वक्त्यांत एका स्त्री–प्राध्यापिकेचे भाषण आहे. एका बाईने त्याचे संकलन व लेखन केले आहे. असा विनोदाशी संबंध येता येता होतील स्त्री–विनोदी लेखिका तयार !’ श्यामच्या अंगात विनोदी लेखकांचे बाकी काही गुण नसले तरी अति आवश्यक असा खडूसपणा भरपूर प्रमाणात होता.

‘गंभीरपणे बोलायचे काय घ्याल हो ? खरेच का नाही आम्ही बायका चांगले विनोदी लिखाण करत ?’ व आपल्या प्रश्नाचे आपणच पुढे उत्तर देत म्हणाली, ‘मला वाटते आम्हा स्त्रियांची दुय्यम स्थिती आहे ते त्याचे कारण असावे. बायका विनोदी लेखिका नाहीत तसे दलित विनोदी लेखक कुठे आहेत ?...कदाचित् विनोदी लिहिण्याकरता जे धारिष्टच लागते ते आमच्यात नाही ! गडकऱ्यांनी इंदू-बिंदूच्या संदर्भात काळ्या दिसणाऱ्या बायकांच्यावर जो जीवघेणा विनोद केला आहे तसा कोणी स्त्री–लेखिकेने त्यांच्या भाजी–मास्तर असण्यावर विनोद–टवाळी केली असती म्हणजे मग जहरी–विखारी ‘ब्लॅक’ विनोद म्हणजे काय हे गडकऱ्यांना जाणवले असते !’

राधा कोणत्याही तऱ्हेची प्राध्यापक नसूनसुद्धा आपले म्हणणे ठोसपणे मांडते हे बघून श्यामला बरे वाटले.

‘अग, आतापर्यंत ह्या प्रश्नाचे उत्तर भल्याभल्यांना सुचले नाही ते आपल्याला कसे सुचणार ? पण इंग्रजी वाङ्मयात असे होत नाही. तुला आठवतं ती मार्गारेट का कोणा इंग्रज बाईचे पुस्तक ?’

‘चांगले आठवते आहे, म्हणून तर वाटते की आपल्याकडे का तसले लिखाण होऊ नये?’

काही महिन्यांपूर्वी श्यामने Margaret Powell ह्या इंग्रजी बाईच्या विनोदी लेखांचे पुस्तक आणले होते. ती बाई म्हणजे ‘चार–वुमन’ म्हणजे घरगड्याच्या हाताखाली काम करणारी, नवरा घरोघर दुधाच्या बाटल्या पोहोचवणारा ! वेगवेगळ्या घरमालकांच्या, मालकिणींच्या, इतर घरगड्यांच्या किती तरी गंमती–जमती त्या बाईने इतक्या छानपणे लिहिल्या होत्या ! त्याचे BBC च्या दूदवर रूपांतरपण झाले होते.

आपल्याकडल्या स्त्रिया विनोदी लिहोत वा पुरुष लिहोत, त्याचा सगळा थाट आपला मध्यमवर्गीय–ब्राह्मणी !

¤

असेच चार-सहा आठवडे गेले. श्याम व राधा पहिल्या कौतुकानेच ती व्याख्यानमाला वाचत होते. एक दिवस श्याम संध्याकाळचा घरी आला तर राधा त्याला मोठ्या उत्साहात सांगू लागली, ‘अहो, ह्या वेळचे भाषण ‘भाई’ वरचे आहे. काय कौतुक केलं आहे ‘भाई’ च्या लिखाणाचे !’

आता ‘भाई’ म्हणजे कोण हे श्यामला समजून सांगण्याची गरज नव्हती. महाराष्ट्रातल्या हजारो वाचकांप्रमाणे श्याम पण ‘भाई’ चहाता होता. त्यांच्याविषयी त्याला आदर होता, प्रेम होतं !

‘अच्छा ! वाचायलाच पाहिजे लगोलग !’

श्याम ‘भाई’ चा नुसता चहाताच नव्हता तर महाराष्ट्रातल्या असंख्य नवोदित विनोदी लेखकांप्रमाणे आपण पण ‘भाई’ सारखे लिहावे, त्यांच्यासारखी वाहवा मिळवावी अशी श्यामची सुप्त इच्छा होती. आपण पण सगळ्यांचे ‘भाई’ व्हावे ही कल्पना आता परत आली; पण. एकदम त्याचे अंग शहारले.

‘पण जर त्यांना सगळे मराठी–बंधु-भगिनी ‘भाई’ मानत असतील तर त्यांचे आयुष्य विनोदी झाले तरी अंमळ ‘अळणी’ नसेल का झाले ?’

श्यामचे अंग शहारले. कारण त्याला सगळे ‘भाऊ’ म्हणत असत ! □

# शरणागती–
# फूलनची की अर्जुनसिंगाची?

रक्तपात आणि प्रियकर यांच्याबद्दल विशेष ख्याती असलेल्या पुतळाबाई ह्या स्त्री दरोडेखोरानंतर उत्तरप्रदेशात खून, दरोडे, अपहरण इत्यादी ६२ गुन्ह्यांबाबत गंभीर आरोप असणारी, देशभरच्या विविध वर्तमानपत्रांतून–साप्ताहिकांतून गाजलेली दस्यसुंदरी फूलनदेवी अखेर मध्यप्रदेशातील ग्वाल्हेरपासून वीस कि. मीटर असलेल्या 'भिंड 'या गावी मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांच्या उपस्थितीत, एका राजेशाही सोहळ्यात अगदी थाटामाटात शरण आली!

फूलनदेवी कोण होती? कुठली होती? ती दिसते कशी? एक स्त्री असूनही ती या भयंकर अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या मार्गाकडे का वळली? प्रामुख्यानं उत्तरप्रदेशात तिने पुष्कळसे गुन्हे केले असताना, ती मध्यप्रदेशातच का शरण आली? मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांनी त्यासाठी खास प्रयत्न का केले? इत्यादी प्रश्न या निमित्ताने मनात येतात.

शरणागती योग्य की अयोग्य हा वादाचा प्रश्न आहे. खरं तर डाकूंची मोठ्या प्रमाणावर शरणागती पत्करण्यास सुरुवात केली विनोबांच्या प्रेरणेने. नंतर ७२ मध्ये काही डाकूंनी, जयप्रकाश नारायण यांच्यासमोर शस्त्रे खाली ठेवली आणि बरोबर दहा वर्षांनी अर्जुनसिंग या मालिकेत जाऊन बसले! मागील वर्षी प्रचंड लोकांच्या उपस्थितीत मलखानसिंग आपल्या साथीदारांसमवेत अर्जुनसिंगांना शरण आला. मलखानसिंगच्या मागोमाग उत्तरप्रदेशात दोन वर्षे थैमान घालणाऱ्या दस्यसुंदरी–फूलनने आता शरणागती पत्करली.

फूलनदेवीच्या शरणागतीच्या सोहळ्याआधी आणि प्रत्यक्ष सोहळ्यानंतर घडलेल्या घटना लक्षात घेतल्या तर मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांनी यासाठी बरेच श्रम घेतल्याचे कुणाच्याही लक्षात येईल. घडलेल्या घटनांकडे जर बारकाईने पाहिले तर शरणागती फूलनने स्वीकारण्याऐवजी ती अर्जुनसिंगांनी स्वीकारली असेच कुणालाही वाटेल.

तिने व तिचा प्रियकर मानसिंग यांनी घातलेल्या २७ अटी ज्या पद्धतीने आणि तडकाफडकी मान्य केल्या गेल्या त्या संदर्भात थोडा बारकाईने विचार केला पाहिजे.

फाशीची शिक्षा देऊ नये, त्यांना स्वरक्षणार्थ बंदुकीचे परवाने द्यावेत, सगळ्या गुन्ह्यांबाबतचे खटले मध्यप्रदेशात एकाच जागी चालवावेत, त्यांना त्यासाठी विशेष न्यायालय असावे, त्यांना उत्तरप्रदेशात पाठवू नये, खुला तुरुंग असावा, तुरुंगात 'अ ' दर्जाची वागणूक मिळावी, जप्त झालेली रोख रक्कम परत मिळावी, सर्व नातेवाइकांना जमीन मिळावी, मध्यप्रदेश सरकारने त्यांना घरे बांधून द्यावीत, शरण येण्यापूर्वी वडिलांच्या हिश्याची जमीन फूलनच्या भावाला मिळावी, त्यास नोकरी, तिच्या नातेवाइकांना संरक्षण, सर्वांना शिक्षण व व्यवसाय–उद्योग सुरू करण्यास मदत आणि मुख्य म्हणजे शस्त्रास्त्रे कोठून मिळत याबद्दल विचारू नये! अशा काही अटी पोलिसांनी मान्य केल्यानंतरच तिने शरणागती पत्करली!

मध्यप्रदेशात फक्त सहाच गुन्हे तिच्या नावावर नोंदलेले असताना तिच्या ह्या अटी मान्य करून 'शरणागती ' पत्करण्यास लावण्यास उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री अर्जुनसिंग ह्यांचा कोणता हेतू होता ते कळत नाही. साऱ्या देशाचे लक्ष वेधणाऱ्या फूलनदेवीने आपल्यासमोर समर्पण केले तर त्याचा उपयोग प्रसिद्धीसाठी करून घेता येईल यासाठी अर्जुनसिंग यांनी पुष्कळ परिश्रम घेतले यात आता शंका उरली नाही. घडलेल्या घटनांचा मागोवा घेतला तर हे कुणाच्याही लक्षात येईल.



फूलन–मानसिंग – दरोडेखोरीची अखेर!

फूलनदेवी खरं तर ९ फेब्रुवारीसच शरण येणार होती; पण तिचे आणि तिच्या प्रियकराचे मानसिंहचे सर्व नातेवाईक उत्तरप्रदेशातून मध्यप्रदेशात आणण्याची अट तिने म. प्र. पोलिसांना घातली होती. म. प्र. पोलीस उत्तर प्रदेशातल्या जालौन जिल्ह्यातील शेखपुरबुढा या गावातून फूलनच्या कुटुंबियांना भिंड येथे आणण्यात यशस्वी झाले. नंतर उत्तरप्रदेश पोलिसांनी 'फूलनच्या कुटुंबाचे अपहरण ' असा आरोप पोलीस-अधीक्षक चतुर्वेदींवर लावला व त्याबद्दल खटलाही भरला!

मानसिंगच्या कुटुंबियांच्या वेळी मात्र या गोष्टीचा सुगावा उत्तरप्रदेश पोलिसांना लागला. मानसिंगचे कुटुंबियांना आणण्यास गेलेल्या भिंडच्या उपनिरीक्षक मंगलसिंग आणि त्याच्यासमवेत असणाऱ्या सहा पोलीस शिपायांना शस्त्रे, जीपसहित अटक केली. ह्या प्रकरणी मध्यप्रदेशाचे आय. जी. पी. दुबे यांनी तातडीने पावले उचलली व सहा पोलीस कर्मचाऱ्यांची सुटका केली. तसेच मानसिंगच्या कुटुंबियांचे संरक्षण करण्याची हमीही मिळविली आणि त्यानंतर फूलन–मानसिंग–घनश्याम शरणागतीस तयार झाले!

फूलनदेवीने शरणागती पत्करावी यासाठी जुलै १९८२ मध्ये पहिला प्रयत्न करण्यात आला. मलखानसिंगने तिच्याशी व इतर डाकूंशी संवाद साधावा यासाठी त्याला खास सोयी-सवलती देऊन पॅरोलवर सोडले होते.

घनश्याम ऊर्फ घंसा याच्याबरोबर मलखानसिंगचे तितकेसे चांगले संबंध नसल्याने व न पटल्याने घंसाने शरण येण्यास नकार दिला !

१८ नोव्हेंबरला उत्तरप्रदेश पोलिसांना जालौन जिल्ह्यातील रामपुरा येथे शरणागती पत्करण्याचा घनश्याम डाकूचा प्रयत्न फसल्यावर त्याने भिंडचे पोलीसअधीक्षक राजेंद्र चतुर्वेदी यांच्याशी संपर्क साधला. २० डिसेंबरला मुस्लीम या दुसऱ्या डाकूबरोबर शरणागतीबाबत बोलणी झाली. जानेवारीच्या सुरुवातीस मुस्लीम आपल्या साथीदारांसमवेत उमरीकडे वळला, तर फूलन आपल्या टोळीबरोबर नायगाव विभागातच होती.

उत्तरप्रदेश पोलिसांचे मात्र डाकूंच्या हालचालींबरोबर पोलिसांच्या हालचालीवरही बारीक लक्ष होते. २६ जानेवारीला उ. प्र. पोलिसांनी उमरी विभागात आपले जाळे घट्ट विणले. त्या वेळी त्यांची आणि मुस्लीम डाकूबरोबर चकमक उडाली. त्या चकमकीत मुस्लीम जखमी झाला आणि तो पळून गेला ! लगेच त्याने चतुर्वेदीशी संपर्क साधला. चतुर्वेदीने तातडीने पावले उचलून त्याच्यावर भिंडला उपचार करण्याची व्यवस्था केली.

पोलिसांच्या सतत पाठलागाने दमछाक झालेली फूलन व घनश्याम आपल्या साथीदारांसमवेत तेव्हा दातीया जिल्ह्यात लपून राहिली होती. त्याच वेळी 'शरणागती पत्करायची असेल तर ती दहा फेब्रुवारीपर्यंत पत्करायला पाहिजे, आधीच खूप उशीर झाला!' अशा अर्थाचा संदेश भोपाळमधून पाठविला गेला. जिवाची पर्वा न करता पोलीस अधीक्षक राजेंद्र चतुर्वेदी नि:शस्त्र होऊन घनश्याम व फूलनशी संपर्क साधण्यास दऱ्या-खोऱ्यात गेले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात मुस्लीम चुकून मारला गेल्याचे त्यांना पटवून दिल्यानंतर ते चतुर्वेदीशी बोलणी करण्यात यशस्वी झाले.

६ फेब्रुवारीस, एकाएकी मध्यप्रदेशच्या पोलिसांनी घनश्याम शरण येण्याची वाट पहातोय हे माहीत असूनसुद्धा सिंदियाच्या दऱ्याखोऱ्यात घट्ट जाळे विणले. घनश्याम खरं तर त्याच दिवशी मारला गेला असता; पण ही बातमी वर गेल्याने ही उचललेली



## फूलनची कैफियत

मी माझ्या वयाच्या ११ व्या वर्षीच ३० वर्षांच्या विधुराशी लग्न केले. त्याची पहिली बायको माझी पुतणी होती. मी लहान असल्याने स्वयंपाक कसा करावा हे मला कळत नव्हते. त्यामुळे माझा नवरा मला मारहाण करायचा.

मला माझ्या घरी पाठविण्यात आल्यानंतर गावातील गुंड मला त्रास देऊ लागले. माझा भाऊ लहान असल्याने हे थांबविण्यास कोणी नव्हते.

माझे वडील आणि पुतण्यांमध्ये जमिनीबाबत वाद होते. चाळीस बिघा जमिनीबाबतचा वाद. आम्ही स्थानिक पातळीवर दोनदा केस जिंकूनही आम्हाला इतरांच्या शेतांवर राबावे लागले. घरी आल्यावर पुरेसे जेवणही आम्हास मिळत नव्हते.

नंतर माझ्या आईने माझ्या दुसऱ्या लग्नासाठी प्रयत्न चालू केले; परंतु मी घरातून पळाले तेव्हा माझ्या नवऱ्याने तिसऱ्यांदा लग्न केले होते. त्याने मला घरात घेण्यास नकार दिला. त्यानंतर मी माझ्या काकाकडे गेले. तिथेसुद्धा त्यांच्या घराचे दरवाजे माझ्याकरिता बंद झाले. माझी आई येऊन घेऊन जाईपर्यंत मी भटकतच होते.

त्यानंतर माझ्या काकाच्या घरावर दरोडा पडला आणि मलाच त्या दरोड्याच्या आरोपाखाली पोलीसठाण्यावर नेण्यात आले. जेलमध्ये एक महिना राहिल्यानंतर गावातल्या एका अनोळख्या ठाकुराने माझी सुटका केली. जेलमधून बाहेर पडल्यानंतर पोलिसांनी मला त्रास द्यावयास सुरुवात केली. ते रोज मला पोलीसठाण्यावर बोलावीत आणि प्रश्नांचा भडिमार करीत. ते फार भयंकर होते !

मायादीनने मला पळवून ठार मारण्यासाठी विक्रम मल्लाह यास दहा हजार रुपये दिले होते. त्यात बाबू गुजरचा भाग होता. नंतर एके दिवशी रात्री त्यांनी मला पळवून नेले. ते पोलिसांच्या वेशात होते. माझ्या आईचीसुद्धा तीच समजूत झाली होती. दुसरे दिवशी पोलीसठाण्यावर जाऊन तिने माझी चौकशीसुद्धा केली.

मल्लाह आणि मी एकाच जातीचे असल्याने त्याला माझ्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली होती. त्याने तीन दिवसांतच गुजरला ठार मारले !

मल्लाहच्या ताब्यात असतानासुद्धा मी माझ्या कुटुंबाकडे जाण्याचे प्रयत्न केले. जवळजवळ सहा महिने त्यांनी मला बांधून ठेवले होते. नंतर मग सोडण्यात आले. मल्लाह मला म्हणाला—'हे बघ फूलन, मी तुझे प्राण वाचविले आहेत. त्यावरच समाधान मान. नाही तर आतापर्यंत तू जिवंत राहू शकली नसतीस !' त्यातच पोलिसांनी माझा शोध सुरू केला होता.

त्यानंतर मल्लाहचा खून रात्री झोपेत असतानाच लालाराम आणि श्रीराम या साथीदारांनीच केला. त्यांनी हे व्यक्तिगत दुश्मनीतून अथवा पोलिसांच्या सांगण्यानुसार केले असावे. लालाराम आणि श्रीराम यांनी मला परत बंदिस्त केले. 'मुझसे क्या दुश्मनी है—असे म्हटल्यावर व मला जाऊ देण्यास विनविल्यानंतरच ते बेहमाईकडे घेऊन गेले. तिथे मला त्यांनी भरपूर शारीरिक व मानसिक त्रास दिला; परंतु त्यांनी माझ्यावर बळजबरी अथवा बलात्कार केला नाही ! कुसुम नयन नावाची माझ्यापेक्षा सुंदर स्त्री त्या दोघांमध्ये समाईक होती. शेवटी दुसरे काही डाकू मला त्यांच्यापासून घेऊन गेले.

नंतर मी 'मुस्नाकीमच्या टोळीत सामील झाले आणि तिथेच मला मानसिंग—माझा प्रियकर ' भेटला. मानसिंगने स्वतंत्र टोळी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मी त्याच्याबरोबर गेले.

बेहमाई इथे घडलेले ठाकुराचे हत्याकांड मी केलेले नाही. मी तिथे गेलेसुद्धा नाही. आम्ही फक्त पाचजणच असताना एकाच वेळी त्या सगळ्यांना कसे ठार करू ? विमर-मल्लाहचा भाऊ राम अवतार मल्लाह घुक्र' नाथ आणि रम्पूचे हे काम आहे !

पावले मागे घेण्याचा आदेश त्यांना देण्यात आला. हा आदेश भोपाळमधून मुख्यमंत्र्यांच्या सेक्रेटरीएटमार्फत दिला गेला.

फूलनने शरणागतीच्या अगोदर काही दिवस स्वतःला मध्यप्रदेश पोलिसांच्या हवाली केल्यानंतर तिच्या शरणागतीच्या खास समारंभासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने पावले उचलली.

प्रत्यक्ष शरणागतीच्या वेळी जेव्हा डाकू महात्मा गांधींच्या आणि दुर्गामातेच्या फोटोला अभिवादन करून शस्त्रे खाली ठेवत होते, तेव्हा जमलेल्या नागरिकांनी, विरोधी पक्षांनी खूपच गोंधळ केला.

युवा लोकदलाचे सेक्रेटरी बुईयासिंग जाधुअन यांनी व्यासपीठावर प्रवेश करून माईकचा तावा घेतला आणि ही शरणागती फूलनने घेतली नसून ती उत्तरप्रदेश शासनाने घेतल्याचा आरोप केला. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले व दूर नेलं.

फूलनला पाहून लोक प्रक्षुब्ध झाले–'गोलीका बदला गोली ! डाकू को हिरो बनाते हो, चूडियाँ पहन के बैठो !' अशा घोषणाही जमावाने दिल्या.

अतिशय घाईघाईत अवघ्या तासाभरात संपलेल्या या शरणागतीच्या समारंभानंतर दिवसभरात त्या दिवशी शहरात ठिकठिकाणी दगडफेक झाली. पोलीस–व्हॅनच्या काचा फोडण्यात आल्या. इतकंच नव्हे तर दोन–तीन पोलीसठाण्यांवरही दगडफेक करण्यात आली.

आता तुम्हीच सांगा शरणागती कोणी पत्करली ?

–चारुदत्त बागुल

## 'शरणागती'मागचे राजकारण

हातावर तुरी देऊन मध्यप्रदेशात शरणागती पत्करल्याने उत्तरप्रदेश पोलिसांचा पचका झाला तर मध्यप्रदेश पोलिसांची मान या प्रकरणामुळे उंचावल्यासारखी वाटते !

वास्तविक याअगोदरचे मुख्यमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी दरोडेखोरांच्या विरुद्ध उघडलेल्या मोहिमेस अपयश आल्याने त्यांनी राजिनामा दिला. सध्याचे मुख्यमंत्री श्रीपत मिश्रा यांचाही दरोडेखोरांना मऊ वागणूक देण्यास विरोध आहे. फूलनने मध्यप्रदेशात शरणागती पत्करल्याने त्याचे पडसाद विधानसभेतही उठले !

काही सभासद म्हणतात– ही घटना उत्तरप्रदेश पोलिसांच्या तोंडात मारणारी आहे, तर एकाने– उत्तरप्रदेश पोलीसअधिकारी फूलनकडून हप्ते घेत होते असाही आरोप केलाय ! फूलन स्वतःही ही गोष्ट नाकबूल करीत नाही. ते काही असले तरी फूलनदेवीच्या शरणागती–सोहळ्यामागे केंद्राचासुद्धा भाग असावा असे उत्तरप्रदेश शासनाला वाटते. कारण मागील वर्षीदेखील मलखानसिंगच्या शरणागतीच्या सोहळ्याच्या वेळी मलखानसिंगचे अभिनंदन करणारा राजीव गांधींचा खास संदेश अर्जुनसिंगांनी वाचून दाखविला होता. आपल्या व आपल्या साथीदारांना उत्तरप्रदेशात पाठवू नये या व इतर फूलनच्या अटींबावत अर्जुनसिंगांनी वर बोलणे केले असावे. ह्याबाबत तोंडी आश्वासन बहुधा तिला देण्यात आले असावे.

आपल्या अटींच्या संमतीदाखल राजीव गांधींची हमी असावी ह्या फूलनच्या मागणीकडे बारकाईने पाहिले तर ह्यामागे निश्चितच दुसऱ्या कोणाचा मेंदू काम करत असावा ह्यात शंका उरत नाही. आपल्या शरणागतीनंतर आपल्याला उत्तरप्रदेशात पाठविले जाईल अशी भीती वाटल्याने आपणास जर राजीव गांधींचे वैयक्तिक संरक्षण मिळाले तरच आपली ह्यातून सुटका होईल ह्या विचाराने आपण ही मागणी केल्याचे फूलन म्हणते.



## 'फूलन'चे व्यक्तिमत्त्व

शरणागतीच्या सोहळ्याबद्दल आणि फूलनच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल लोकांना अतिशय उत्सुकता होती. तिच्या गुन्हेगारी इतिहासामुळे ती एखाद्या चपळ वाघिणीसारखी दिसत असावी असे लोकांना वाटायचे. पोलिसांकडेही तिचे छायाचित्र आणि तिच्याबद्दलची फारशी माहिती उपलब्ध नव्हती.

४ फूट १० इंच उंचीची, निस्तेज चेहऱ्याची, काळपट रंगाची, बसक्या नाकाची आणि अतिशय साधारण देहयष्टी असलेल्या फूलनला पाहून मात्र लोकांची निराशा झाली.

फूलन दरोडेखोर असली तरी वृत्तीने धार्मिक आहे. ती आठवड्यातून चार वेळा उपास करते. ती भगवतीमातेला फार मानते. 'तिने मला सांगितले म्हणूनच मी शरणागती पत्करली' असे ती म्हणते !

शरणागतीला येताना वाटेतल्या गावात चालू असलेल्या यज्ञात भाग घेण्याची इच्छाही तिने व्यक्त केली.

एकदा तिला देवाची पूजा करायची इच्छा झाली. तिने पुजाऱ्यासकट देऊळ ताब्यात घेतले. मनाप्रमाणे पूजाअर्चा केल्यावर ती गेली. ती गेल्यानंतर पोलिसांना ही बातमी कळली. पोलीस रिकाम्या देवळात आले आणि हात हलवीत गेले !

सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे तिला दागिन्यांची आणि वस्त्रांची हौस आहे. इतर बायकांप्रमाणे तिला वस्त्राचे भान असते.

फूलन अशिक्षित असली तरी हजरजबाबी आहे– तुझी साथीदारांनी त्यांचा नेता म्हणून निवड का केली ? या पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना ती म्हणाली, 'तुम्ही इंदिरा गांधींना नेता म्हणून का मानता ?'

'तू सत्तावीस वर्षांची आहेस ना ?' असे विचारल्यावर ती म्हणाली, 'माझे वय फक्त वीस वर्षांचे आहे. ते माझ्या वयाबद्दल खोटं बोलतात.'

आपण उत्तरप्रदेशाऐवजी मध्यप्रदेशात शरणागती पत्करली याबद्दल बोलताना फूलन म्हणते, 'उत्तरप्रदेश पोलिसांवर माझा विश्वास नाही. ते रानटी आहेत !'




# पोलंडचा पुरुषोत्तम
# लेक वालेसा

रशियन रणगाडे पोलंडमध्ये घुसले अशी बातमी ऐकण्यासाठी मनाची तयारी करून बसलेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्या नेत्यांना पोलंडमध्ये लष्करी कायदा लागू झाला हे ऐकून जितका धक्का बसला तितकाच आनंदही झाला. जे घडलं ते अपेक्षेपेक्षा खूपच चांगलं घडलं होतं. रशियन रणगाडयांपेक्षा पोलिश रणगाडे पोलंडच्या दृष्टीनं खचितच किती तरी सौम्य ठरणार होते. पोलिश रणगाडयांच्या चाकांची करकर रशियन रणगाडयांच्या करकरीइतकी निश्चितच कर्णकर्कश ठरणार नव्हती. लाल सेनेच्या रशियन सैनिकांपेक्षा पोलिश सैनिक प्रत्येक गोळी उडविताना आपल्या देशबांधवांचा विचार करणार होते. निदान आज्ञा पाळताना क्रूरपणात ते काकणभर तरी कमी पडणार होते. पश्चिम युरोप आणि अमेरिकेच्या दृष्टीनं दुःखात सुख ते एवढंच होतं.

नाताळानिमित्त देशाला दिलेल्या संदेशात अमेरिकेचे अध्यक्ष रेनॉल्ड रीगन म्हणाले, ' पोलंडमध्ये अंधार पसरला आहे. काळोखाचं साम्राज्य सुरू झालं आहे. आपण आपल्या कृतीनं पोलिश जनतेला आशेचा किरण दाखविला पाहिजे. पोलंडमधील लष्करी कायद्याच्या निषेधार्थ प्रत्येक अमेरिकन माणसानं घराच्या खिडकीत एक वेगळी मेणबत्ती पेटवून ठेवावी. या लक्षावधी मेणबत्त्यांचा प्रकाश पोलंडमधला अंधार दूर करू शकेल !'

व्हाइट हाउसच्या दर्शनी खिडकीतदेखील एक मोठी मेणबत्ती पेटवून ठेवण्यात आली होती. यामागं थोडा मनोरंजक पण हृदयविदारक असा इतिहास होता. पोलंडमध्ये लष्करी कायदा लागू करण्यात आल्यामुळं लोकांच्या निषेधाचा सूर बंद पडला होता; पण चतुर पोलिश लोकांनी निषेध प्रकट करण्याची एक वेगळीच युक्ती शोधून काढली. संध्याकाळी प्रत्येक घराच्या दर्शनी खिडकीतून एकेक मेणबत्ती पेटवून ठेवण्यात आली. एवढयाशा टीचभर मेणबत्तीचा इवलासा प्रकाशसुद्धा लष्करी प्रशासकांना सूर्याच्या प्रकाशासारखा प्रखर वाटत होता. सरकारी अधिकारी सोडले तर पोलंडमध्ये असं एकही घर नव्हतं की, ज्याच्या दर्शनी खिडकीत अशी मेणबत्ती पेटली नव्हती. साऱ्या जगभर या प्रतीकात्मक निषेधाचे पडसाद उमटले होते. जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशाच्या घटनेत अशा तऱ्हेच्या निषेधाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद नव्हती. रशिया अन् इतर कम्युनिस्ट राष्ट्रंही या नव्या निषेधपद्धतीकडे हताश होऊन पहात राहिली. असं म्हणतात की, गेल्या नाताळात रशियातदेखील अशा अनेक मेणबत्त्या पेटलेल्या लोकांनी पाहिल्या आहेत.

ख्रिस्तधर्मीयांच्या व्हॅटिकन सिटीत पोप, दुसरे जॉन पॉल यांनी स्वहस्ते पेटवलेली मेणबत्ती आपल्या अभ्यासिकेच्या खिडकीत लावून ठेवली. टेलिव्हिजनवर हे दृश्य पाहून युरोपच काय, पण जगातल्या साऱ्या ख्रिश्चनांनी आपापल्या घराच्या दर्शनी खिडक्यांत मेणबत्त्या पेटवून ठेवल्या. एखाद्या दुर्दैवी देशातला काळोख दूर करण्यासाठी जगभर इतक्या मेणबत्त्या पेटण्याचा हा पहिलाच प्रसंग !

पोलंडमध्ये लष्करी कायदा जारी करण्यात आला आणि आठवडाभर ' काय करावं अन् काय करू नये ' या गोंधळातच अध्यक्ष रीगन सापडले होते. अखेरीस त्यांनी लॉरेन्स ईगल बर्जर–असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना युरोपीय दोस्त राष्ट्रांचा धावता दौरा करण्यास पाठविलं. पोलंडविरुद्ध पर्यायानं रशियाविरुद्ध कोणती संयुक्त कारवाई करण्यात यावी याचीच मसलत या दौऱ्यात ठरणार होती. त्याच सुमारास रोमॉल्ड स्पॅसोव्हॅस्की या पोलंडच्या अमेरिकेतील राजदूतानं अमेरिकन अध्यक्षांची खास भेट मागितली. भेटीत ते काय बोलणार आणि आपण त्यांना काय सुनवायचं या तयारीत रीगनसाहेब असताना स्पॅसोव्हॅस्कींनी त्यांना आश्चर्याचा धक्काच दिला! ' लोकांविरुद्ध लष्करी कायदा लादणाऱ्या देशाचा नागरिक म्हणून मला क्षणभरही रहायचं नाही. कृपा करून मला आपण अमेरिकेत राजकीय आसरा द्या !' रीगनसाहेबांनी आनंदानं ही विनंती मान्य केली. स्पॅसोव्हॅस्कीबरोबर त्यांची पत्नी वॅन्डा हिलाही राजकीय आसरा देण्यात आला. पोलंडच्या लष्करी राजवटीविरुद्ध उघडण्यात आलेल्या प्रचारमोहिमेला या गोष्टीमुळं चांगलाच उजाळा मिळणार होता.

स्पॅसोव्हॅस्कीचं व्हाइट हाउसमध्ये स्वागत करताना अमेरिकेच्या अध्यक्षांनी म्हटलं, ' लोकांच्या स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या जुलमी सत्तेविरुद्ध तुम्ही ताठ मानेनं उभे राहू पाहता याचा आम्हाला अभिमान वाटतो. स्वातंत्र्यावर प्रेम करणारा पोलंडचा प्रत्येक नागरिक तुमच्या या धैर्यशील कृत्याचं मनापासून कौतुक करेल !' स्पॅसोव्हॅस्की

**पोलंडमधे लष्करी कायदा जारी झाला.**
**त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष रोनॉल्ड रीगन नाताळचा संदेश देताना म्हणाले,**
**' पोलंडमधे अंधार पसरला आहे. आपल्या कृतीनं आपण त्याला आशेचा किरण दाखवायला पाहिजे.**
**त्याच काळोखात वालेसाला घेऊन चाललेली लष्करी जीप सुसाट वेगानं चालली होती.**
**त्याला खरंच कुठे नेत होते ?**
**लष्करी अधिकारी म्हणाले, ' हे पहा वालेसा, तुम्हाला कुठं आणि कशासाठी नेताहेत याची आम्हालाही नीटशी कल्पना नाही !'**

## लेखांक दुसरा : लेखक : श्रीकांत मुंदरगी

व त्यांची पत्नी यांच्याशी हस्तांदोलन करून अध्यक्षांनी आपल्या सहकाऱ्यांशी त्यांची ओळख करून देताना म्हटलं, ' मातृभूमीचा त्याग करण्याचं धैर्य दाखविणाऱ्या अशा नागरिकांमुळंच पोलंड गमावलेलं स्वातंत्र्य परत मिळवू शकेल !' या वेळी अध्यक्षांना मध्येच थांबवीत स्पॅसोव्हेंस्की म्हणाले, ' माझ्यासारख्या हजारो लोकांनी कसलाही त्याग करून जे साधणार नाही ते एकटा लेक वालेसा करू शकेल !'

अध्यक्षांनी हातातला शॅम्पेनचा ग्लास उंचावून स्पॅसोव्हेंस्कीच्या म्हणण्याला दुजोरा दिला, ' फॉर दी फ्रीडम ऑफ पोलंड अँन्ड टु दी हेल्थ ऑफ लेक वालेसा !'

पाठोपाठ अध्यक्षांनी असंही जाहीर केलं की, पोलंडच्या लष्करी राजवटीला धडा शिकवण्याच्या उद्देशानं अमेरिका पोलंडशी असलेल्या आर्थिक, सामाजिक व राजकीय संबंधावर अनेक निर्बंध घालणार आहे. या निर्बंधात आपल्या दोस्त राष्ट्रांनीही आपल्याला साथ द्यावी अशी इच्छा त्यांनी प्रकट केली

अमेरिकन अध्यक्षांच्या या आवाहनाला त्यांच्या दोस्त राष्ट्रांकडून मात्र हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. पोलंडमध्ये चाललेल्या नागरिकस्वातंत्र्याच्या मुस्कटदाबीचा सर्वांनी एकमुखानं निषेध केला; पण तेथील लष्करी राजवटीला धडा शिकवण्यासाठी काय उपाय-योजना करण्यात यावी याबाबतीत मात्र दोस्तराष्ट्रांच्या नेत्यांचे एकमत होईना.

अमेरिकेनं सुरुवातीला पोलंडवर सर्वच बाजूंनी बहिष्कार टाकण्याचं ठरविलं; पण विचारांती अमेरिकन नेत्यांच्या असं लक्षात आलं की, या गोष्टीचा परिणाम उलटाच होईल. पोलंडच्या राजकीय नेत्यांना मदतीसाठी रशियाकडं हात पसरावा लागेल आणि पोलंड सर्वस्वी रशियाच्या आधीन होईल, म्हणून काही नाममात्र निर्बंध पोलंडवर घालण्यात आले.

फ्रान्सचे अध्यक्ष फ्रॅन्कॉइस मितरॉन यांनी तेवढेही निर्बंध टाकण्यास हरकत घेतली. ते म्हणाले, ' पोलंडला जाणाऱ्या अन्नधान्याच्या बोटी अडवून आपला काय फायदा होणार आहे ? जे भुकेले आहेत ते राज्यकर्ते नसून त्यांच्याविरुद्ध उभी राहिलेली जनता आहे. त्या जनतेला आणखी उपाशी पाडून आपण काय साधणार ? उलट आपण पोलिश जनतेची आपल्याविषयी असलेली सहानुभूती मात्र गमावून बसू. कारण तेथील राज्यकर्ते या गोष्टीचा फायदा उठविल्याशिवाय राहणार नाहीत !'

पश्चिम जर्मनीनं तर नुसता निषेधाचा सूर काढण्यापलीकडं काहीच केलं नाही. पोलंडबरोबरच्या त्यांच्या व्यापारात त्यांनी पैचीही काटछाट केली नाही. जर्मन नेत्यांचं म्हणणं तर असं होतं की, जनरल यारूझेंस्कींनी लष्करी कायदा जारी करण्यात एक प्रकारचा शहाणपणाच दाखविला आहे. त्यांनी पोलंडमध्ये लष्करी राजवट आणली नसती तर रशियानं आपली राजवट तिथं चालू केली असती. चॅन्सलर स्मिट्च्या या म्हणण्याला ब्रिटननंही दुजोरा दिला.

पोप जॉन पॉल यांनी व्हॅटिकनच्या धर्मपीठावरून पोलंडच्या राज्यकर्त्यांना इशारा दिला, ' सत्याचा आवाज कधीही दडपला जाणार नाही ! सत्ता आणि सामर्थ्याच्या जोरावर गरीब जनतेवर दडपशाही करू पाहणाऱ्या राज्यकर्त्यांना ख्रिश्चन धर्माचा पाठिंबा मिळणार नाही. संगिनींच्या जोरावर स्वातंत्र्य, समता आणि शांतीचा बळी घेऊ इच्छिणाऱ्यांना माणुसकीवर विश्वास असणारा जगातला कोणताही माणूस क्षमा करणार नाही !' पोपनी दिलेला हा इशारा केवळ पोलंडच्या राज्यकर्त्यांना योग्य मार्ग दाखविण्यापुरताच मर्यादित नव्हता तर रशियन सत्ताधीशांनाही ही दटावणी होती. हा इशारा दुर्लक्षिण्याजोगा खासच नाही याची वार्सा अन् मास्कोलाही पूर्ण जाणीव होती.

¤

लेक वालेसा त्या लष्करी जीपमध्ये जाऊन बसला. त्याच्या दोन्ही बाजूंना दोन लष्करी अधिकारी येऊन बसले. ती जीप सुसाट वेगानं काळोख कापीत निघाली. जीपच्या मागं मशिनगन्स बसवलेल्या दोन भल्यामोठ्या ट्रक्स येत होत्या. जीपच्या पुढं चार मोटरसायकल्स धावत होत्या. एवढ्या प्रचंड बंदोबस्तात आपल्याला कुठं नेण्यात येत आहे हे वालेसाला कळेना. त्यानं शेजारच्या ऑफिसरला प्रश्न केला, ' आपण कुठं निघालो आहोत हे कळेल का ?' त्या ऑफिसरनं काहीच उत्तर दिलं नाही. वालेसानं हाच प्रश्न दुसऱ्या बाजूच्या ऑफिसरला वेगळ्या शब्दात विचारला, ' सद्गृहस्थ हो, एखाद्या

नागरिकाला कपडे घालण्याचाही अवधी न देता पहाटे तीन वाजता त्याला घरातून बाहेर ओढून नेण्यात येतं अन् त्याला कुठं नेण्यात येत आहे या साध्या प्रश्नाचं त्याला उत्तरही देण्यात येत नाही याचा अर्थ काय ? मी खून केला की बँका लुटल्या म्हणून तुम्ही मला असे मध्यरात्री ओढून नेताहात ? तुमच्यासारख्या सभ्य गृहस्थांनी एवढं सौजन्य दाखवलं तर या देशाचं फार मोठं नुकसान होणार नाही, असं मला वाटतं. '

ज्याला पहिल्यांदा प्रश्न विचारला होता त्यानं वालेसाला सांगितलं, ' हे पहा मिस्टर लेक वालेसा, तुम्हाला कुठं आणि कशासाठी नेण्यात येत आहे याची आम्हालाही निश्चित अशी काहीच माहिती नाही आणि ती असली तरी तुम्हाला सांगण्याचा आम्हाला हुकूम नाही. मात्र मला असं वाटतं की, तुम्हाला कुठं अन् कशासाठी नेण्यात येत आहे याची तुम्हाला बरोबर कल्पना असावी. ' एवढं बोलून तो ऑफिसर समोर पाहू लागला. या उत्तरावर वालेसा थोडासा हसला अन् गप्प बसला.

काही मिनिटं शांततेत गेली. फक्त वाहनांचे आवाज काय ते त्याच्या कानांवर येत होते. जीपच्या मागच्या भागात सर्व बाजूंनी पडदे सोडण्यात आल्यामुळं बाहेरचं काहीही दिसत नव्हतं. वालेसाला त्या शांततेचा विलक्षण कंटाळा आला. एखादी डुलकी घ्यावी तर झोपही येत नव्हती. म्हणून त्यानं कोटाच्या खिशात हात घातला. त्याचा हात खिशातून बाहेर येताच सावध अधिकाऱ्यांनी त्याच्या हातावर झडप घातली अन् चपळाईनं त्याच्या हातातली वस्तू काढून घेतली. तिथल्या अंधुक प्रकाशात काहीच स्पष्ट दिसत नव्हतं. वालेसाला जीपमध्ये बसण्यापूर्वी आपण त्याची झडती घेण्याचं विसरलो याचा त्या दोघांनाही पश्चात्ताप झाला. एका अधिकाऱ्यानं खिशातून छोटी टॉर्च काढून दुसऱ्याच्या हातात असलेल्या वालेसाकडून काढून घेतलेल्या वस्तूवर प्रकाश टाकला. तो वालेसाचा पाइप होता. ते पाहून दोन्ही अधिकारी खजील होऊन गेले. वालेसानं शांतपणे तो पाइप त्यांच्या हातातून घेतला अन् त्यात तंबाखू भरली.

'या देशात पाइप ओढायलाही बंदी आहे का ?' वालेसानं मिस्किलपणे त्यांना विचारलं.

' छे, छे ! तसं काही नाही. तुम्ही खुशाल पाइप ओढू शकता !' त्यातल्या एकानं उत्तर दिलं.

' तर मग एवढा पाइप पेटवून द्याल का ? मगासच्या गडबडीत मी काड्यापेटी घ्यायला विसरलो. ' वालेसानं असं म्हणताच मनात वरमलेल्या त्या दोघा अधिकाऱ्यांपैकी एकानं गडबडीनं खिशातली काड्यापेटी काढली अन् वालेसाचा पाइप पेटविला. दोन झुरके मारून तोंडातून धूर बाहेर सोडत वालेसा विचारता झाला, 'तुम्हाला माझी झडती घ्यायची असेल तर खुशाल घ्या; पण माझ्या शब्दावर विश्वास असेल तर खात्री बाळगा की माझ्याजवळ कसलंही शस्त्र नाही. कारण निःशस्त्र चळवळीवरच माझा संपूर्ण विश्वास आहे. हिंसा मला मुळीच मंजूर नाही ! '

वालेसाच्या या विधानानंतर त्याची झडती घेण्याचं धैर्य त्या अधिकाऱ्यांना झालं नाही.

एका विशिष्ट जागी येताच जीप थांबली. वालेसाला खाली उतरविण्यात आलं. वालेसानं आजुबाजूला पाहिलं. गडॅन्स्क शहराच्या बाहेरील वस्तीपासून दूर असा हा भाग होता. एक-दोन इमारतींखेरीज आसपास काहीच दिसत नव्हतं. दूरवर शहरातील दिवे लुकलुकत होते. त्या अधिकाऱ्यांनी त्याला तिथं उभ्या असलेल्या एका मोटारीत बसवलं. त्या मोटारीत मागच्या बाजूला तो बसताच जवळ उभे असलेले दोन वेगळेच अधिकारी त्याच्या दोन्ही बाजूंना येऊन गाडीत बसले. ती मोटार चालू होताच मघाच्या दोन्ही अधिकाऱ्यांनी, सुटकेचा निश्वास टाकला. त्यातील एकजण दुसऱ्याला म्हणाला, ' आजवर मी अनेक जोखमीची कामं केलीत; पण मनावर इतकं दडपण पूर्वी कधी आल्याचं मला आठवत नाही. '

' तुझं तर जाऊ दे. मला उद्या सकाळी डॉक्टरकडं जाऊन ब्लडप्रेशरच तपासून घ्यायला हवं. इतकं भयंकर टेन्शन आलंय माझ्यावर ' दुसरा म्हणाला.

' या कामात थोडीही गडबड झाली असती तर आपल्यावर आफतच ओढवली असती. वरिष्ठांनी आपल्याला तसं स्पष्टच बजावलं होतं की, या कामात थोडी जरी गफलत झाली तरी तुम्हाला कोर्ट मार्शलला तोंड द्यावं लागेल ! '

' पण एवढं असूनही त्याची झडती घेण्याचं धाडस काही झालं नाही आपल्याला ! '

'त्या माणसाचा रुबाबच तसा आहे. त्याला पाहिलं की मी मी म्हणणारे नामोहरम होऊन जातात म्हणे ! '

' मीही ऐकलंय खरं त्याच्याबद्दल. त्याच्या रिपोर्टात स्पष्ट म्हटलंय की साधी छडीही हाती न घेता पन्नास पन्नास हजारांचा क्राऊड तो कंट्रोल करू शकतो ! '

' पण चुकून जरी त्याच्याजवळ एखादं शस्त्र सापडलं तर आपली शंभरी भरलीच म्हणून समजा ! '

' तू काही काळजी करू नकोस. तो कधीही खोटं बोलत नाही असं म्हणतात. शिवाय त्याला शस्त्राची गरजच कधी भासत नाही. ' असं बोलत बोलत ते दोन्ही अधिकारी जीपमध्ये जाऊन बसले. जीप त्यांच्या मुक्कामाच्या दिशेनं धावू लागली.

¤

थोडा वेळ प्रवास केल्यानंतर ती मोटार उजवीकडे वळली. वालेसाच्या लक्षात आलं की, आपण विमानतळाकडे वळलो आहोत. त्याला सुरुवातीला वाटलं होतं की, आपल्याला गडॅन्स्कच्या तुरुंगाकडे नेण्यात येत आहे; पण आता त्याची खात्री झाली, त्याला बहुधा विमानातून वार्साकडं नेण्यात येत असावं. त्यानं शेजारच्या अधिकाऱ्याला काही प्रश्नही विचारले; पण त्याला एकाचंही उत्तर मिळू शकलं नाही. ते जणू मुके-बहिरे असावेत असंच वागत होते. त्यांच्या एकंदरीत वागणुकीवरून ते बऱ्याच वरच्या दर्जाचे अधिकारी असावेत असा अंदाज वालेसानं मनाशी बांधला. जीपमधले अधिकारी आताच्या मानानं खूपच सौजन्यशील अन् सौम्य वाटत होते. आपल्या अस्तित्वाचं त्यांच्यावर चांगलंच दडपण आलं आहे हेही त्याला जाणवलं होतं. आपली झडती घेण्याचंही धाडस त्यांना झालं नव्हतं हे पाहून मनातल्या मनात तो खूषच झाला होता; पण त्या तुलनेत हे अधिकारी जास्ती अनुभवी अन् मुरब्बी वाटत होते. वालेसाच्या अस्तित्वाची त्यांना जणू दखलच नव्हती. नाही म्हटलं तरी त्याचा अहंकार थोडासा डिवचला गेला. गेल्या दीड वर्षात त्याला इतका

मोठेपणा मिळाला होता, इतका मान मिळाला होता की, आपल्याकडं लोकांचं थोडं जरी दुर्लक्ष झालं तरी त्याला त्याचा त्रास होत असे.

'आपण आता विमानातून वार्साला जाणार आहोत का ?'

उत्तर नाही.

पुन्हा एकदा त्यानं तोच प्रश्न विचारला.

उत्तर नाही.

'जनरल यारुझॅस्कींनी तुम्हाला माझ्याशी एकही शब्द न बोलण्याची ताकीद दिली आहे का ?' जनरलसाहेबांचं नाव वालेसानं इतक्या सहजपणे उच्चारलेलं पाहून ते दोघंही चपापले. त्यातील एक जण त्याच्याकडे वळून पाहात त्याला गप्प बसण्याची खूण करू लागला. त्यांना बोलतं करण्यात आपण यशस्वी होणार नाही हे वालेसानं ओळखलं. त्यानं खिशात हात घालून शांतपणे पाइप काढला. नजरेच्या कोपऱ्यातून तो आळीपाळीनं त्या दोघांकडे पहात होता. ते सावध चित्तानं फक्त त्याच्या हालचाली निरखत होते. त्यानं पाइप पेटवण्यासाठी काड्यापेटी मागताच त्यातील एकानं त्याच्या हातातला पाइप काढून घेतला अन् आपल्या खिशात ठेवून टाकला. नाराज झालेला वालेसा वैतागून त्यांना काही तरी बोलणार तोच ती मोटार एका गेटपाशी थांबली.

ते दोघंही अधिकारी आपापल्या बाजूची दारं उघडून बाहेर पडले. त्यातील गेटजवळ उतरलेल्या अधिकाऱ्यानं वालेसाला बाहेर येण्याची खूण केली. तो बाहेर येताच त्या अधिकाऱ्यानं गाडीचं दार बंद केलं. गाडी सरकन् निघून गेली.

ते गेट उघडलं जात असतानाच ज्यानं वालेसाचा पाइप काढून घेतला होता तो अधिकारी वालेसाच्या जवळ येऊन हळूच कुजबुजला, 'महाशय, आपण नाराज झाला असाल. कारण आपल्या एकाही प्रश्नाचं उत्तर आम्ही दिलं नाही; पण तुम्हाला हे ठाऊक नव्हतं की, त्या गाडीत अत्यंत तीव्र शक्तीचे मायक्रोफोन्स बसविण्यात आले होते. तुमच्याशी बोलून आम्हाला आमची नोकरी वा जीव गमवायचा नव्हता !'

आश्चर्यानं पहात असलेल्या वालेसाच्या हातात त्याचा पाइप देत तो अधिकारी म्हणाला, 'तुमचा नाताळ सुखाचा जावो ! विसोव्हिक श्वॉन्त स्नेझियहयोगो 'एवढं बोलून ते दोघेही अधिकारी मागं वळून अंधारात दिसेनासे झाले. आपल्या शेजारी दुसरे दोन अधिकारी केव्हा येऊन उभे राहिले हे स्तिमित झालेल्या वालेसाच्या लक्षातच आलं नाही. त्यांनी खूण करताच तो त्यांच्याबरोबर चालू लागला.

वालेसा पायऱ्या चढून त्या विमानात आला. दाराशी उभ्या असलेल्या लष्करी गणवेशातल्या तरुण स्त्रीनं मान कळे न कळेशी झुकवून त्याला सस्मित अभिवादन केलं, 'झिन् दॉब्री.' ( How do you do ) त्या देखण्या अन् हसऱ्या चेहऱ्याच्या स्त्रीला पाहताच त्याला बरं वाटलं. बराच वेळ न बोलणाऱ्या, न हसणाऱ्या रुक्ष लष्करी अधिकाऱ्यांच्या संगतीत घालवल्यामुळं त्याची मनोवृत्ती काहीशी उदास बनली होती; पण इथल्या रम्य स्वागतामुळं तो थोडासा सुखावला.

त्या विमानात लष्करी अधिकाऱ्यांची गर्दी दिसत होती. वालेसाला पुढच्याच ओळीत एका रिकाम्या जागेवर बसविण्यात आलं. त्यांच्या-दोन्ही बाजूंना दोन उग्र चेहऱ्याचे लष्करी अधिकारी होतेच. तो जागेवर बसतो न बसतो तोच विमानातील एका कर्मचाऱ्यानं त्याच्यापुढं कॉफीचा ट्रे आणला. घरातून साखरझोपेतून उठवून आणलेल्या वालेसाला नाही तरी कॉफीची गरज होतीच. त्यातून थंडी मी म्हणत होती. गरम गरम वाफाळणाऱ्या कॉफीचा कप त्यानं चटकन् उचलला अन् तोंडाला लावला. एक घोट घेताच त्याला एकदम शेजाऱ्यांची आठवण झाली अन् तो वरमला. आपण शेजाऱ्यांची साधी चौकशी देखील न करता एकटेच कॉफी पिऊ लागलो याची त्याला खंत वाटली. क्षमा मागण्यासाठी प्रथम त्यानं डावीकडं नजर वळवली. तो अधिकारी चेहऱ्यावरची सुरकुतीदेखील न हलवता समोर कुठं तरी नजर लावून पुतळ्यासारखा स्तब्ध बसला होता. आपल्या शेजारी काय चाललंय याचा पत्तादेखील त्याला नसावा असं वाटत होतं. याच्याशी बोलण्यात काहीच अर्थ नाही असं वाटून वालेसानं उजवीकडं पाहिलं. तोही अधिकारी शून्यात नजर लावून असाच मुखस्तंभासारखा बसला होता. या लोकांशी बोलणं म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी घालण्यासारखं आहे हे ओळखून वालेसानं कॉफीच्या दुसऱ्या घोटाबरोबर क्षमायाचनेचे शब्दही गिळून टाकले !

ती विमानप्रवास अक्षरशः निःशब्दपणे चालला होता. जणू या विमानात आपल्याशिवाय दुसरं कोणीच नाही असं प्रत्येकाला वाटत असावं. त्या विमानात पस्तीस-चाळीस लोक आहेत हे कुणाला सांगूनदेखील खरं वाटलं नसतं. बंद काचांतून मंदपणे आत झिरपणारी विमानाची घरघरच काय ती त्या शांततेचा भंग करीत होती. एक कसलं तरी विलक्षण दडपण यावं तसं साऱ्यांचे चेहरे दिसत होते. या सगळ्यात मोकळेपणानं अन् आरामात बसला होता फक्त एकटा लेक वालेसा ! आपल्या देशावर तासाभरातच लष्करी कायद्याचा अंमल सुरू होणार आहे हे फक्त त्या साऱ्यांपैकी त्याला एकट्यालाच ठाऊक नव्हतं अन् म्हणूनच तो इतक्या आरामात बसू शकला होता.

राहून राहून त्याला एकाच गोष्टीचं आश्चर्य वाटत होतं की, आपल्याला इतक्या गुप्ततेनं अन् इतक्या बंदोबस्तानं का अन् कुठं नेण्यात येत असावं? यापूर्वीही त्याला अनेकदा पकडण्यात आलं होतं; पण त्या वेळी असा कडक बंदोबस्त त्यानं कुठंही पाहिला नव्हता. एका माणसाला कैद करून नेण्यासाठी इतकी प्रचंड यंत्रणा राबविण्यात यावी या गोष्टीचं त्याला विलक्षण कुतूहल वाटत होतं. सरकारी यंत्रणेनं आपल्याला इतकं महत्त्व द्यावं, इतका मोठेपणा द्यावा या कल्पनेनं त्याला क्षणभर अतिशय बरं वाटलं. हे सारं दानुतानं पाहिलं असतं तर ती भलतीच खूष होऊन गेली असती असं त्याच्या मनात आलं. ती जेव्हा भेटेल त्या वेळी हा सारा किस्सा तिला ऐकवायचा हे त्यानं मनात पक्कं ठरवून टाकलं. या साऱ्या प्रवासाची अद्‌भुत हकिगत मुलांनासुद्धा मोठी मनोरंजक वाटणार आहे याची त्याला खात्री होती. आपल्या सहाही पोरांचे चेहरे त्याच्या

**तासाभरातच देशात लष्करी अंमल सुरू होणार आहे हे फक्त त्यालाच माहीत होते !**



**पोप जॉन पॉलबरोबर वालेसा – स्वातंत्र्य, समता, शांतीसाठी...**

नजरेसमोर उभे राहिले. आपली पोरं आपल्याला केव्हा भेटतील याचा विचार मनात येताच तो अस्वस्थ झाला.

गेल्या दोन तासांत एखाद्या स्वप्नाप्रमाणं घडत गेलेल्या घटना चलत्‌चित्राप्रमाणं त्याच्या डोळ्यांसमोर तरळून गेल्या अन् विचार करता करता एक दुष्ट शंका त्याच्या मनात विजेप्रमाणं चमकून गेली...रशियानं पोलंडचा ताबा तर घेतला नसेल ना? या शंकेनं तो एकदम कावराबावरा झाला.

या एकाच गोष्टीला आपण विलक्षण भीत आलो आहोत. जी गोष्ट घडू नये म्हणून आपण आटोकाट प्रयत्न केले, अधिकाऱ्यांशी वारंवार तडजोड करण्याचा प्रयत्न केला, सॉलिडॅरिटीच्या भडक माथ्याच्या सहकाऱ्यांना प्रत्येक वेळी काबूत ठेवण्याचा प्रयत्न केला, कामगारांना आपल्या मागण्या योग्य तऱ्हेनं मांडण्याचा मार्ग दाखविला, चळवळीला हिंसक स्वरूप येऊ नये म्हणून अनेक वेळा आपण आपला जीव धोक्यात घातला अन् एवढं सगळं करूनही जर रशियानं पोलंडची सूत्रं आपल्या ताब्यात घेतली असली तर जनता आपल्याला कधीही क्षमा करणार नाही!

छे, छे! पण असं घडलं नसेल. सॉलिडॅरिटीच्या लोकप्रियतेला पायबंद बसावा म्हणून सरकारनं मुद्दामच आपल्या एकट्याला गजाआड डांबायचं ठरविलं असेल; पण मग त्यासाठी एवढा आटापिटा करायची सरकारला का गरज भासावी?

कदाचित जनरल यारुझेल्स्कींना पदच्युत करण्यात आलं असावं. कम्युनिस्ट सत्तेला आपण दिलेलं आव्हान अति डाव्या विचारसरणीच्या नेत्यांना आवडलं नसावं, म्हणूनच आपल्याला पोलिश जनतेपासून अलग करण्याचा हा डाव असावा.

त्या उलट-सुलट विचारांच्या आवर्तातून त्याला जाग आली ती त्या मघाच्या देखण्या हवाईसुंदरीच्या शब्दांनी. ती त्याला कॉफी हवी आहे का असं विचारत होती. त्यानं तिच्या चेहऱ्याकडं पाहिलं अन् त्याला नकार देववेना. तिच्या डोळ्यांतून त्याच्याविषयीचा आदर ओसंडून वाहात होता. 'मिनिटाभरात कॉफी आणते' असं म्हणून ती विमानाच्या मागच्या भागाकडे गेली. वालेसाला टॉयलेटला जायचं असल्यानं तो चटकन् उठून चालू लागला. त्याबरोबर त्याच्या दोन्ही बाजूंचे इतका वेळ स्तब्ध बसलेले लष्करी अधिकारी जादूची कांडी फिरताच पुतळ्यात जीव यावा तसे ताडकन् उठून त्याच्या शेजारून त्याला खेटून चालू लागले. त्यांनी हालचाल सुरू केल्याचं पाहून वालेसाला बरं वाटलं.

टॉयलेटच्या दाराजवळ वालेसा पोहोचला तरी ते दोघं त्याला खेटूनच उभे होते. तेही आपल्याबरोबर आत येणार की काय अशी शंका त्याच्या मनाला चाटून गेली. त्यानं टॉयलेटचं दार उघडलं अन् शेजारी उभ्या असणाऱ्या दोन्ही लष्करी अधिकाऱ्यांकडं पाहिलं. जणू त्याला विचारायचं होतं, अगोदर तुम्ही जाणार का मी जाऊ? ते काहीच हालचाल करत नाहीत हे पाहून तो चपळाईनं आत शिरला अन् त्यानं झटकन् दार बंद करून घेतलं.

तो बाहेर येताच ते दोघंही त्याच्या शेजारून चालू लागले अन् तिघेजण स्थानापन्न झाले. हवाईसुंदरी हातात कॉफीचा ट्रे घेऊन त्याची वाटच पहात होती.

कॉफीचा कप, हातात घेऊन वालेसानं तिला विचारलं, 'या विमानातल्या सर्व प्रवाशांत मी एकटाच बिगरलष्करी माणूस आहे का?'

उत्तरादाखल तिनं फक्त स्मित केलं. त्या लोभसवाण्या स्मितावर खुश होऊन वालेसानं दुसरा प्रश्न केला,

'तुझं नाव मला कळेल का?'

याही वेळी उत्तरादाखल ती फक्त हसली. हे पाहून तो विचारता झाला, 'तुला फक्त हसताच येतं का बोलतादेखील येतं?'

या प्रश्नालाही उत्तर म्हणून तिच्या लालचुटुक ओठांतून आणखी एक स्मितहास्यच बाहेर पडलं. तेव्हा वैतागून तो म्हणाला,

'हा प्रवास संपणार तरी कधी?' या प्रश्नाच्या उत्तरादाखल ती हसण्याच्या आधीच समोरच्या बोर्डावर शब्द चमकू लागले, 'विमान उतरत आहे. आपल्या कमरेभोवती पट्टे आवळा!'

वार्साच्या लष्करी विमानतळावर ते विमान उतरलं. अद्याप सर्वत्र अंधार असल्यामुळं काहीच नीट दिसत नव्हतं. वालेसा त्या दोघा सोबत्यांच्या (?) साथीनं खाली उतरला. समोर हिरव्या रंगाची लष्करी व्हॅन उभी होती. त्यात त्याला बसवण्यात आलं. त्या व्हॅनच्या आत मशीनगन्स घेतलेले सहा सैनिक होते. वालेसा व्हॅनमध्ये बसताच विमानात त्याच्यावर पहारा करणारे दोन्ही अधिकारी व्हॅनमधून उतरून निघून गेले.

वालेसानं त्या सैनिकांवर नजर टाकली अन् सहज सुरात अभिवादन करत म्हटलं, 'दो पुलुज्ञा!' (शुभ प्रभात) ते शस्त्रधारी सैनिक आपल्या अभिवादनाचा स्वीकार करतीलच याची त्याला शाश्वती नव्हती. त्या सर्वांनी माना झुकवून सहास्य मुद्रेनं त्याच्या अभिवादनाचा स्वीकार केला. एवढंच नव्हे तर त्याला उलट शुभे-

च्छाही दिल्या. या गोड अपेक्षाभंगामुळं त्याला मनापासून बरं वाटलं. हातात शस्त्रं असली तरी या सैनिकांच्या हृदयातला माणूस अजून झोपी गेलेला दिसत नाही, असं त्याच्या मनात आल्यावाचून राहिलं नाही.

वालेसानं सभोवताली नजर टाकली. त्या व्हॅनला आतून जाड पडदे खिडक्यांवर सोडण्यात आले होते. आतून बाहेरचं काहीही दिसत नव्हतं. वीस मिनिटांच्या प्रवासानंतर ती व्हॅन थांबली. तसा प्रवास निःशब्दच झाला असला तरी वालेसाला तो भलताच सुसह्य वाटला. कारण ते सारे सैनिक पुतळ्यासारखे हृदयशून्य दिसत नव्हते अन् सार्‍यांच्याच चेहर्‍यांवर हसरे भाव होते. मनाशी या सैनिकांची, घरातून निघाल्यापासून भेटलेल्या अधिकार्‍यांशी तुलना करता त्याच्या ध्यानात आलं की, हे सारे सैनिक पंचविशीच्या आतले कोवळे तरुण होते. त्यामुळंच त्यांची मनं अजून दगडासारखी घट्ट झाली नसावीत. काही पावसाळे अन् एखादं युद्ध पाहिलं की, यांचेही असेच निष्ठुर पुतळे बनल्याशिवाय राहणार नाहीत. वालेसा मनाशी म्हणाला, 'वय वाढलं की अनुभवानं माणसं शहाणी बनतात; पण हे सारं पाहिलं की वाटतं माणसं अनुभवांनी क्रूर आणि निष्ठुर बनतात!' त्या सैनिकांच्या पहार्‍यातून तो एका प्रशस्त अन् नेटक्या इमारतीत आला. याच इमारतीत तो काही दिवस राजकीय कैदी म्हणून राहणार होता.

□

ती गर्दी सारखी वाढतच होती. त्यात नवनव्या लोकांची भर पडत होती. लोक घोळक्या-घोळक्यानं येत होते. त्यात जसे तरुण स्त्री-पुरुष होते, लहान मुलं होती तसेच म्हातारे-कोतारेही होते. सायलेशियाच्या खाणीत काम करणारे खाणकामगार तेथे हजारोंच्या संख्येनं आले होते. त्यांच्या अंगावर लांब काळा कोट अन् चुणीदार झाका असा परंपरागत चालत आलेला सायलेशियाचा पेहराव होता. असे कपडे फक्त दुःखद प्रसंगीच वापरण्यात येतात. लुब्लीनचे रेल्वे-कामगार पांढर्‍या सदर्‍यावर काळ्या फिती लावून आले होते. पुलावेचे बसड्रायव्हर काळ्या टोप्या घालून आले होते. रस्त्यारस्त्यांतून लोकांची गर्दी मावत नव्हती. घरांच्या, चाळींच्या अन् बंगल्यांच्या बाल्कनी आणि गॅलर्‍या माणसांनी फुलून गेल्या होत्या. गडॅन्स्कचा प्रत्येक कानाकोपरा गजबजून गेला होता. या शहरानं अशी गर्दी पूर्वी कधी पाहिली नव्हती.

लाखोंच्या संख्येनं आलेले हे लोक निरनिराळ्या क्षेत्रांतले होते, वेगवेगळ्या व्यवसायांतले होते. ते लोक आले होते दहा वर्षांपूर्वी हौतात्म्य पत्करलेल्या कामगारांना श्रद्धांजली वाहण्यासाठी, त्यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकाचं अनावरण करण्यासाठी!

१३८ फूट उंचीचं हे स्मारक वर निमुळत्या होत जाणार्‍या तीन लोखंडी स्तंभांचं होतं. प्रत्येक स्तंभाच्या टोकावर एकेक क्रूस होता आणि त्यावर काळेभोर असे नावेचे नांगर अडकविण्यात आले होते. ते सर्व स्तंभ सिमेंटऐवजी लोखंडी बनविण्याचं कारण बहुतांशी कामगारांचं जीवन लोखंडाशी निगडित झालेलं असतं. त्यावरचे क्रूस हे त्यांच्या बलिदानाचं प्रतीक होतं. गडॅन्स्कच्या लेनिन बोटकारखान्यासमोर हे स्मारक उभं करण्यात आलं. कारण याच कारखान्यातील कामगारांनी आपलं जीवनमान सुधारावं म्हणून १९५६, १९७० आणि १९७६ साली सरकारविरोधी निदर्शनं केली. त्यात अनेक कामगारांचा बळी गेला. पोलंडची कामगार-चळवळ खर्‍या अर्थानं इथंच फोफावली आणि तिनं देशव्यापी स्वरूप धारण केलं. सर्व कम्युनिस्ट देशांत कामगार-चळवळीचं नाव या लेनिन बोटकारखान्याशी निगडित करण्यात आलं. म्हणूनच मुद्दाम या कारखान्याचं प्रतीक असा बोटीचा नांगर प्रत्येक स्तंभावर लटकावण्यात आला. कम्युनिझमच्या चौकटीत राहूनसुद्धा कामगाराला चळवळीचा हक्क बजावता येतो हेही या नांगरानं सर्व जगाला दाखवून दिलं. रशियन साम्राज्याला अप्रत्यक्ष आव्हान या लेनिन बोटकारखान्यातूनच देण्यात आलं.

हे स्मारक उभं करायला सरकारनं सहजासहजी परवानगी दिली नाही. कारण कम्युनिझममध्ये कामगारांची चळवळ अभिप्रेतच नाही. मार्क्स आणि लेनिनच्या तत्त्वानुसार कम्युनिस्ट राज्यं ही कामगारांच्या कल्याणासाठीच कामगारांनी उभी केलेली असतात. अशा राज्यात कामगारांच्या काही अडचणी असू शकतात, काही प्रश्न असू शकतात हेच मुळी या तत्त्वप्रणालीला मंजूर नसतं. कम्युनिस्ट राज्यं जरी असली तरी ती चालविणारे सारेच काही कामगार वा त्यांचे प्रतिनिधी नसतात आणि जरी समजा असले तरी एकदा ते राज्यकर्ते झाले की, त्यांच्यात आणि कामगारांच्यात सत्तेमुळं प्रचंड दरी निर्माण होते, विसंवाद सुरू होतो. नेमकी हीच गोष्ट राज्यकर्ते मंजूर करत नाहीत. हाच प्रकार पोलंडमध्ये झाला. बळी गेलेल्या कामगारांचं स्मारक उभं करण्यासाठी कामगारांना सतत दहा वर्षं झगडावं लागलं तेव्हा कुठं हे स्मारक उभं राहू शकलं!

दहा वर्षांपूर्वी बाल्टिकच्या या किनार्‍यावर हजारो कामगार जमले होते. त्यांना निदर्शनं करायची नव्हती, दंगाधोपा तर मुळीच करायचा नव्हता. आपल्याला दोन वेळा पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळावं एवढीच त्यांची माफक मागणी होती. पोलंडच्या सरकारनं त्यांच्या मागण्या सहृदयतेनं ऐकून घेण्याऐवजी त्यांच्यावर पोलीस आणि सैनिकांचे ताफे धाडले. त्या हुकुमाच्या ताबेदारांनी भाकरी आणि कपडा मागण्यासाठी आलेल्या या कामगारांच्या जमावावर बेमुर्वतखोरपणे बंदुका चालविल्या. पंचेचाळीस कामगारांचा बळी घेऊनच हा बेछूट गोळीबार थांबला. जमाव पांगला; पण जमावातली चळवळीची भावना जास्तच फोफावली. माणसं मारली गेली तरी कामगारांची मनं मरगळली नाहीत. आग तात्पुरती विझली; पण राखेखाली अंगार धुमसतच राहिला. ज्या ठिकाणी आपण कामगारांचे मुडदे पाडले त्याच ठिकाणी दहा वर्षांनंतर आपण त्यांचं स्मारक उभारायला येऊ हे पोलंड सरकारच्या स्वप्नातही आलं नसतं!

सूर्य अस्ताला जाऊ लागला. संध्याकाळचं आकाश लाल रंगानं न्हाऊन निघालं होतं. तो लाल रंग तिथं जमलेल्या लाखो लोकांना दहा वर्षांपूर्वी सांडण्यात आलेल्या कामगारांच्या रक्ताची आठवण

**पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळावं एवढीच त्यांची मागणी होती.**



लोकांच्या हृदयसिंहासनावर फक्त त्याचं एकट्याचं राज्य होतं !

करून देत होता. मध्यभागी उभारण्यात आलेल्या उंच व्यासपीठावर एकेक बडी मंडळी चढू लागली होती. सर्वप्रथम आले ते पोलंडचे प्रेसिडेंट हेन्रिक जॅब्लॉन्स्की. शुभ्र केसाच्या अंगावर काळा कोट चढविलेल्या आपल्या रुबाबदार अध्यक्षांना पाहून लोकांनी काही क्षण टाळ्या वाजविल्या. त्यांच्या पाठोपाठ आले क्रॅकोव्हचे कार्डिनल फ्रॅन्सिझेक मॅक्रॉस्की. अंगावर पिवळा झगा आणि डोक्यावर नारिंगी रंगाची टोपी असा त्यांचा वेष होता. या पोलंडच्या धर्मगुरूला पाहताच लोकांनी जवळजवळ मिनिटभर टाळ्या वाजविल्या. राज्यसत्तेपेक्षा धर्मसत्तेला लोक जास्त मानतात हेच यावरून दिसून येत होतं अन् सर्वांत शेवटी आला कामगारांचा लाडका नेता लेक वालेसा. मध्यम उंचीच्या, सर्वसाधारण व्यक्तिमत्त्वाच्या, अंगावर मळकट सूट घातलेल्या वालेसाला पाहताच लोकांनी टाळ्यांचा जो गगनभेदी कडकडाट सुरू केला तो काही काळ थांबेचना.! वालेसानं हात उंचावून जेव्हा लोकांच्या अभिवादनाचा स्वीकार केला तेव्हा कुठं हळूहळू तो कडकडाट कमी होत गेला. पोलंडवर राज्य होतं राज्यकर्त्यांचं, धर्मपीठावर सत्ता चालत होती धर्मगुरूंची; पण लोकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाला होता तो एकटा लेक वालेसा !

एक क्षणभर सगळीकडे नीरव अशी शांतता पसरली. त्यानंतर गडॅन्स्क शहरातील सर्व चर्चेसमधल्या घंटा जोरजोरानं वाजू लागल्या. त्या घंटानादानं वातावरणात एक विलक्षण रोमांचकारी भावना निर्माण झाली. त्याच वेळी बंदरात उभ्या असलेल्या सर्व बोटींनी आपले भोंगे वाजविण्यास सुरुवात केली. भोंग्यांतून बाहेर पडणारा कर्कश्य असा टिपेचा आवाज समुदायातील साऱ्यांच्या अंगांवर शहारे उमटवून गेला. आकाश दुमदुमून टाकणारं हे नादब्रह्म थांबल्यानंतर १९७० साली गडॅन्स्क आणि गडॅनिया येथे बळी गेलेल्या कामगारांची नावं एकामागोमाग एक वाचण्यात आली. प्रत्येक नावानंतर तेथे जमलेला समुदाय मोठमोठ्यानं त्याचं नाव घेऊन म्हणत असे, ' हो! तो आमच्यात आहे. अजूनही आमच्यात आहे. तो कायमचा अमर राहणार आहे !'

अध्यक्ष आणि धर्मगुरूंच्या भाषणानंतर वालेसा उठला अन् त्यानं हुतात्म्यांची ज्योत प्रज्वलित केली. त्या वेळी आकाशातून पावसाचा मंद शिडकावा होत होता. लोकांना वाटलं जणू ख्रिस्तच हुतात्म्यांसाठी अश्रू ढाळत आहे. त्या जलवर्षावातही वालेसानं पेटवलेली ज्योत प्रखरपणे पेटली. तिच्याकडं पाहून तो समुदायाला म्हणाला, ' या ज्योतीप्रमाणंच कामगारचळवळदेखील अडचणींवर मात करून तेजस्वीपणे पेटती राहील ! स्वातंत्र्य, न्याय आणि हक्क मिळविण्यासाठी आम्ही आमचा झगडा चालूच ठेवू. हे स्तंभ हुतात्म्यांची स्मृती जागृत ठेवण्यासाठी उभे करण्यात आले आहेत तसेच सत्ताधाऱ्यांना इशारा देण्यासाठीही उभे करण्यात आले आहेत !'

' This monument was erected for those who were killed, as an admonition to those in power. It embodies the right of human beings to their dignity, to order and to justice.'

ते एक विलक्षण दृश्य होतं. निळ्याभोर आकाशात काळोख शाईसारखा पसरू लागला होता. त्याच्या पार्श्वभूमीवर ते गगनचुंबी स्तंभ प्रखर विद्युत्‌दीपांच्या प्रकाशात उजळून निघाले होते. खाली जमलेले लक्षावधी लोक अनिमिष नेत्रांनी तो सोहळा पहात होते. पोलंडचंच काय पण साऱ्या जगाचं लक्ष या समारंभाकडं लागलं होतं. कारण या समारंभाचा संदेशच आजवरच्या संदेशांहून आगळा-वेगळा होता. ' कोणत्याही मतप्रणालीपेक्षा देशच श्रेष्ठ असतो.' पोलंडच्या इतिहासात राज्यसत्ता, धर्मसत्ता आणि कामगारसत्ता यांचे पुढारी एका व्यासपीठावर एकत्र येण्याचा हा पहिलाच प्रसंग होता ! आपले प्रश्न आपणच सोडवायचे ही त्यामागची भूमिका होती. कम्युनिझमचा केंद्रबिंदू असलेल्या क्रेमलिनला हा एक अप्रत्यक्ष इशाराच होता. म्हणूनच वालेसा आपल्या भाषणात शेवटी म्हणाला, ' अंतर्गत शांतता टिकवायची असेल तर आपल्यातली एकी अभंग राहिली पाहिजे ! एकी अभंग रहायची असेल तर सर्वच पक्षांनी अन् तत्त्वांनी एकमेकांशी तडजोड केली पाहिजे. म्हणूनच माझ्या कामगारमित्रांनो, हक्कांसाठी लढताना सावधान जरूर रहा; पण समजूतदारपणा सोडू नका! समर्थ रहा; पण अनाठायी शक्तीचे प्रदर्शन करू नका ! आपण सारे पहिल्यांदा पोलिश आहोत, पोलिश होतो आणि पोलिश राहणार आहोत, याचा कधीही विसर पडू देऊ नका !' धर्मतत्त्वं किंवा राजकीय तत्वं ही देशापेक्षा मोठी नाहीत हेच जणू त्याला त्यातून सुचवायचं होतं.

हिंसेची साथ घेऊ नका हे वालेसानं जसं कामगारांना सांगितलं तसंच राज्यकर्त्यांनादेखील सांगितलं. ' लेकी बोले सुने लागे ' अशातलाच हा काहीसा प्रकार होता. पोलिशसरहद्दीवर उभ्या ठाकलेल्या रशियन सेनेलाही ताकीद देण्याचा उद्देश त्यामागं होता. रशियाला पोलंडमध्ये हस्तक्षेप करण्यास निमित्त मिळू नये अशी वालेसाची मनापासून इच्छा होती. म्हणून तो पुन्हा पुन्हा देशातल्या एकीविषयी बोलत होता. उभय पक्षांनी समजूतदारपणा दाखवावा असं तो बजावून सांगत होता. कारण त्याला हे पक्कं ठाऊक होतं की, दोघांच्या

**कामगार चळवळदेखील अडचणींवर मात करून तेजस्वीपणे पेटती राहील....**

भांडणात तिसरा लाभ करून घेण्यासाठी टपून बसला आहे !

गडॅन्स्कचं हुतात्मास्मारकप्रकरण क्रेमलिनमध्ये भलतंच गाजलं. धूमकेतूसारखा एकाएकी पोलंडच्या राजकीय क्षितिजावर चमकू लागलेला हा लेक वालेसा आहे तरी कोण ? असा प्रश्न क्रेमलिनचे नेते एकमेकाला विचारू लागले. कालपरवापर्यंत ज्याचं नाव साऱ्या पोलंडलादेखील माहीत नव्हतं, त्याचं नाव आज आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रामुख्यानं चर्चिलं जाऊ लागलं होतं, या गोष्टीचा त्यांना अर्थच कळेना. पोलंडसारख्या एका छोट्याशा कम्युनिस्ट राष्ट्रातला एक सर्वसामान्य कामगार कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीलाच हादरा देण्याचा प्रयत्न करतोय एवढी एकच गोष्ट क्रेमलिनच्या नेत्यांना हादरवून सोडणारी होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर पोलंडला रशियाच्या दृष्टीनं अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालं होतं. पूर्वयुरोपीय राष्ट्रांचा एक मोठा संच रशियानं आपल्या पंखाखाली आणला होता. त्यात पोलंड हे सर्वांत मोठं राष्ट्र होतं. कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या आंतरराष्ट्रीय राजकारण संशोधन विभागाचे प्रमुख सेवरिन बायलर तर म्हणतात, 'पोलंड म्हणजे रशियन साम्राज्याचा हिंदुस्थान आहे !'

( Poland is by far the largest satellite, 'The India' of the Soviet empire. ) ब्रिटिश साम्राज्यात हिंदुस्थानला जे महत्त्व होतं तेच महत्त्व रशियन साम्राज्यात पोलंडला प्राप्त झालं होतं. साडेतीनकोटी लोकसंख्या असलेलं पोलंड पूर्वयुरोपीय राष्ट्रात सर्वांत मोठं राष्ट्र होतं. शिवाय ते पूर्वजर्मनी आणि रशिया यांच्यामध्ये असल्यामुळं त्याला वेगळंच लष्करी महत्त्व प्राप्त झालं होतं. पूर्वजर्मनीवरची आपली पकड पक्की ठेवण्यासाठी रशियाला पोलंडचा वापर करता येणार होता. तसंच पूर्वजर्मनीत रशियाच्या १९ डिव्हिजन सेना पश्चिमयुरोपवर नजर ठेवण्यासाठी सतत खड्या असतात. त्यांना होणारा अन्न, वस्त्र आणि शस्त्रांचा पुरवठा पोलंडमधूनच चालतो आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे नाटोला शह देणाऱ्या वार्सा राष्ट्रगटाचं केंद्रीय कार्यालय पोलंडच्या राजधानीत म्हणजे वार्सातच आहे. त्यामुळं पोलंड हा रशियन बादशहाच्या नाकातला बाल होऊन बसला आहे. त्याला थोडादेखील धक्का लागलेला रशियाला सहन होत नाही आणि इथं तर वालेसानं साक्षात कम्युनिस्ट सत्तेलाच आव्हान दिलं होतं ! नेमकी हीच गोष्ट रशियन नेत्यांच्या नाकाला मिरच्यांसारखी झोंबली होती. आजवर रशियन सत्ताधिशांना जी आव्हानं मिळाली होती ती मांडलिक राष्ट्रांच्या पुढाऱ्यांकडून. त्यामुळं त्यांना या आव्हानांची फिकीर करण्याचं कारण नव्हतं. कारण हे पुढारी रशियानंच त्या त्या राष्ट्रांवर लादले होते. अशी आव्हानं आली की, नको असलेलं ( ? ) नेतृत्व बदलण्याची खबरदारी रशिया वेळोवेळी घेत आला होता; पण पोलंडच्या बाबतीतला त्यांचा अनुभव नवीन अन् निराळा होता. हे आव्हान एका कामगारपुढाऱ्यानं दिलं होतं आणि हा पुढारी तेथील जनतेनं एकमतानं निवडला होता.

पूर्वी दोन वेळा नको असलेलं नेतृत्व बदलताना रशियाला रणगाडे पाठवावे लागले होते. कारण त्यांनी लादलेलं नेतृत्व नंतरच्या काळात लोकाभिमुख झालं अन् स्वदेशहिताचीच स्वार्थी ( ? ) जपणूक करू लागलं. आपोआपच ही नेतृत्वं तेथील जनतेला लोकप्रिय झाली. त्यामुळं असली नेतृत्वं बदलणं रशियालाच आवश्यक वाटलं; पण नेतृत्वात असा बदल करताना तेथील जनतेच्या विरोधाला तोंड देण्याची पाळी रशियावर आली. नाइलाजानं त्यांना आपले रणगाडे त्या त्या देशात म्हणजेच हंगेरी ( १९५६ ) व झेकोस्लोव्हाकिया ( १९६८ ) इथं घुसवावे लागले. या दोन्ही प्रकरणांत झालेल्या नाचक्कीला तोंड देता देता रशियाच्या नाकी नऊ आले. म्हणूनच या प्रकाराची पुनरावृत्ती पोलंडमध्ये होऊ नये अशी रशियाची मनापासून इच्छा असावी.

पोलंडमधले राज्यकर्ते बदलणं रशियाला फारसं अवघड नाही हे त्यांनी तेथील नेतृत्वात वारंवार घडवून आणलेल्या बदलांनी दाखवून दिलं आहे; पण वालेसाला हात लावणं तितकं सोपं नाही हे त्यांच्या लक्षात आलं असावं. एक तर हा कामगारनेता पोलंडच्या कामगारांनी जवळजवळ एकमतानं निवडला होता अन् दुसरं म्हणजे गडॅन्स्कच्या हुतात्मा-स्मारक-प्रकरणाच्या वेळी त्याची पोलिश जनतेतील अफाट लोकप्रियता वादातीत सिद्ध झाली होती. शिवाय दिवसेंदिवस वाढत जाणारी वालेसाची आंतरराष्ट्रीय कीर्ती रशियन नेत्यांना भलतंसलतं साहस करू देणार नव्हती.

( क्रमशः )


## NEW TITLES RECEIVED

१. **मी–पण माझे**–( कादंबरी )–सुरेंद्र बार्लिंगे.

२. **कसोटीचे क्षण**–( अनुभव )–श्रीधर प्रधान.

३. **अर्थानुभव**–वसंतराव पटवर्धन.

४. **प्रतिष्ठा**–( कथासंग्रह )–स्नेहलता दसनूरकर

५. **बसंती**–( कथासंग्रह )–वसुधा पाटील.

1. **Heir Apparent**–( An Autobiography )–Karan Singh.
2. **Remembrance**–( Novel )–Daniel Steel
3. **Before Bedtime**–( Mystery )–Edgor Box Alias Vidal Gore.
4. **Nella**–( Bestseller–Novel )–John Godey.
5. **Rita Hayworth**–(Biography)–John Kobal.

□ 'फिनिक्स' लायब्ररी लावणे म्हणजे एक सौंदर्यानुभव आहे...(प्र. पाध्ये, सॉरी राभाप्पा, सॉरी–JNP )

**The Phoenix Library**

**727, opp. Sadashiv Post, Pune–30.**

पुस्तके

# अप्पा हा अगदी वेगळा आहे !

'अखेरचे आत्मचरित्र' ही श्री. राजेंद्र बनहट्टी यांची कादंबरी. ही एक शंभर पानांची छोटी कादंबरी आहे. तिचा घाट आत्मचरित्राचा असला तरी तिला रूप लाभलेले आहे ते कादंबरीचेच. एका दीर्घायुषी परंतु ज्याच्या व्यक्तित्वाची पाळेमुळे कुठल्याही सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, राजकीय अथवा अध्यात्मिक स्तरात रुजलेली नाहीत अशा एका जवळजवळ आत्मकेंद्रित व्यक्तीचे जीवन आपल्या कलाकृतीसाठी श्री. बनहट्टी यांनी निवडलेले आहे आणि त्या व्यक्तीच्या तिसऱ्या आत्मचरित्राचा विषय तिच्यात अंतर्भूत झालेला आहे. वयाच्या पासष्टाव्या वर्षी त्यांनी (त्या व्यक्तीने म्हणजे कादंबरीचा नायक अप्पा याने) पहिले आत्मचरित्र लिहिले. दुसरे लिहिले वयाची ऐंशी उलटल्यावर आणि हे तिसरे लिहिले त्र्याण्णव संपून चौऱ्याण्णवावे वर्ष लागल्यावर ! कादंबरीच्या दृष्टीने ही कल्पना अभिनव आहे. विषयाच्या दृष्टीने जितकी ती अभिनव आहे तितकीच ती एका सामान्य माणसाची जीवन–विषय झालेली असल्यामुळे केवळ नवीन आहे.

शिवाय तशी ती व्यक्ती अगदीच सामान्य नाही, तर सर्वसामान्यातली आहे. अप्पा हा काही अगदी रस्त्यावरला माणूस नाही. तो सुविद्य नसला तरी सुशिक्षित आहे. तो इंग्रजी अमदानीतला इंजिनिअर आहे. रूढ अर्थाने समाजात बऱ्यापैकी स्थान असणारी ही व्यक्ती आहे. याचे आयुष्यही चारी अंगांनी फुललेले आहे. याला आई–वडील, (आई याच्या लहानपणीच निवर्तलेली असते) भाऊ, बहिणी, बायको, मुले, मुली, नातवंडे आहेत. लौकिकदृष्टीने त्याचे आयुष्य समृद्ध आहे. उत्तरआयुष्यात याने स्वतःची वास्तू बांधलेली आहे. याला इष्टमित्रही आहेत. इतके असूनही जीवनविषयक तत्त्वज्ञान अप्पाजवळ नाही आणि बनहट्टींच्या कादंबरीचे वैशिष्ट्य इथेच आहे. जीवनात चहूबाजूंनी मुरलेला हा मनुष्य जीवनाच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अगदी कोरडा ठणठणीत आहे !

तो कुठल्याही गोष्टीचा अगदी खोलवर जाऊन विचारच करू शकत नाही. ज्याच्या व्यक्तित्वात तशा विचारसरणीचा धागा आहे; पण तशा प्रकारचा विचारच ज्याला नको आहे अशी इथे गोष्ट नाही. त्याचे जीवनच असे घडलेले आहे (म्हणजे ते त्याने घडविलेले नाही.) की त्यामध्ये काही जड, काही रूक्ष, काही गूढ, काही अगम्य असे येऊच शकत नाही. सूर्यप्रकाश जिथे पडतो त्या सर्व गोष्टी कशा लख्ख असतात, स्पष्ट दिसतात. तसे अप्पाच्या जीवनात आलेले सारे काही अगदी लख्ख, स्वच्छ आणि स्पष्ट आहे. जीवनाची कुठलीही बाजू धूसर नाही. तिच्या कडा अंधारलेल्या नाहीत. एखादी वस्तू पूर्ण दिसावी–दिसू नये अशी गूढता जीवनात कुठेही नाही आणि हेच अप्पांच्या जीवनाचे वैशिष्ट्य आहे, सारही आहे. आपले अखेरचे आत्मचरित्र संपविताना ते म्हणतात : कोणाला वाटेल की, मी आपला जीवन–मरण यांसारख्या गहन विषयांची गंमत करीत बसलो आहे. खरे म्हणजे इतके पुरेपूर जगल्यानंतर जीवनमरणाबद्दल कसे छानपैकी गाढ चिंतन करायला हवे; पण आम्हाला तसे काही सुचतच नाही, त्याला काय करणार ? आमचे आपले रामायण तसेच चालू राहणार ! शेवटपर्यंत कळणार नाही रामाची सीता कोण ? कारण आम्ही असेच काही लिहीत राहणार ! निष्कर्ष काढण्याची, तात्पर्य मांडण्याची वेळ आमच्यावर येणारच नाही. कारण सांगितले ना, मुळात तात्त्विक बैठकच नाही. इथे सारे नडते. ती असती तर हे लिखाण केव्हाच आवरते ना ! मग आम्ही तरी कशाला राहतो ? आम्ही तरी केव्हाच संपतो ना ! या जगण्याचा अर्थ कळल्यावर कोणा गाढवाला मग जगायचे आहे ? एकदा तात्पर्य कळले की, सारा ग्रंथ आटोपला ! मग कशाला जगायचे ? जगण्याची इच्छा तरी राहील का ? गणिताचे उत्तर सापडले की सारे संपलेच. मग पुन्हा कोण शहाणा रीत मांडून गणित सोडवत बसणार ? पण उत्तर सापडत नाही म्हणून आम्ही आपले जगत राहिलो आहोत. म्हणून म्हटले ना, हे आत्मचरित्र अखेरचे असेलही किंवा नसेलही. कोणी सांगावे ?

असे हे अप्पांच्या स्वतःच्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. अर्थात अप्पांच्या स्वतःच्या या जीवनविषयक तत्त्वज्ञानात बऱ्याच गफलती असल्या तरी त्या ज्या प्रकारे जगावयाचे आहे त्यामध्ये या गफलती अडसर म्हणून राहात नाहीत. फार झाले तर याला आपण त्यांचे अज्ञान म्हणू इतकेच; परंतु त्यामुळे त्यांनी जगलेले त्यांचे चौऱ्याण्णव वर्षांचे (आणि अजूनही किती जगणार असतील ते) आयुष्य निरर्थक ठरत नाही. त्यांच्या जगण्यातून त्यांना हवे असलेले अर्थ त्यांना गवसतातच आणि त्या आधारावरच तर ते एवढे मोठे आयुष्य जगत आलेले आहेत. अगदी चौऱ्याण्णवाव्या वर्षानंतर त्यांना पॅरॅलिसिसचा अ‍ॅटॅक येतो. एक पाय, एक हात आणि तोंडाचा काही भाग जातो. तेव्हा डॉक्टर निदान करतात की, हा म्हातारा आता आठएक दिवसांत जाणार ! व्हाय टॉर्चर हिम् ? डॉक्टर आणि त्यांच्या मुलात झालेला सारा संवाद (कानाचे यंत्र लावून) अप्पाने ऐकलेला असतो. त्यावर अप्पा म्हणतात, 'माझ्या आयुष्याची याने डेड लाइनच ठरवून टाकली... अरे बच्चमजी, या म्हाताऱ्याला ओळखले नाहीत अजून तुम्ही... पहातोच मी आठ–दहा दिवसांत कसा लंपास होतो ते ! (लंपास वगैरेसारखे निघडे, ठकठकीत शब्द तर अप्पांच्या तोंडात खूपच आहेत. असे शब्दप्रयोग त्यांचा ठणठणीतपणा, निधडेपणा, हिरवटपणा आणि इरसालपणा, बहुधा इंजिनिअरिंगचा व्यवसाय

असल्यामुळे दाखवितात.) परंतु तरीही हे व्यक्तिमत्त्व खासच आहे हे लक्षात येते. कारण त्यांचा थोरला मुलगाही इंजिनिअरच आहे; पण तो नंबर एकचा भित्रा आहे, हे येथे लक्षात घ्यावयास हवे. त्यांचा हा मुलगा नाना आणि अप्पा यांच्यामध्ये झालेला संवाद मुळातूनच वाचून पाहण्यासारखा आहे. (पान ७८ ते ८१)

अप्पा कधी भावनाप्रधान होत नाहीत. काही प्रसंगावरून (खरे तर एक–दोनच) असे वाटते की, ते भावनेच्या आहारी थोडे का होईना जातात; पण ते खरे नाही. उदा. त्यांनी आपल्या अमदानीत माहुली-जवळील कृष्णानदीवर बांधलेला पूल. तो बांधल्याला पन्नास–साठ वर्षे होऊन गेलेली असतात. त्यांचा धाकटा मुलगा बंडू जेव्हा सातारला जाणार असतो तेव्हा ते त्याला तो पाहून यायला सांगतात. त्या पुलावर अप्पांच्या नावाची संगमवरची पाटी लावलेली असते. ही पाटी पाहून ये अशी त्यांच्या मुलाला त्यांनी सूचना केलेली असते, नव्हे तसे आग्रहाने सांगितलेले असते; परंतु मुलाला त्या गोष्टीत रस नसतो. तो जात नाही आणि गेलो होतो असे खोटेच सांगतो. हा सारा प्रकार वरवर भावनाप्रधान वाटतो; पण तो तसा नाही. ते म्हातारपणाचे एक खूळही असू शकते! तसेच बायकोच्या कानातील एका कुडीचा. अप्पांची बायको वारलेली आहे; परंतु ती जिवंत असताना तिच्या कानातील एक कुडी हरवलेली असते. अप्पा ती एकच कुडी करून आण म्हणून मुलाच्या मागे लागतात. हाही प्रसंग जसा भावनेचा म्हणता येईल तसाच तो म्हातारपणाचा प्रॉब्लेम म्हणूनही सोडून देता येईल. असे काही अगदी मोजकेच प्रसंग सोडले तर अप्पांचं चौऱ्याण्णव वर्षांचं जीवन अगदी कोरडं ठणठणीत आहे; पण त्यातही गंमत अशी की, ते कोरडं आहे; पण रुक्ष नाही. जीवनाची हाव जशी आहे तसाच त्या जीवनाला लौकिकाचा अर्थ कळलेला आहे. ते आपल्या सर्व मुलांचं शिक्षण उत्तम करतात. त्यांना चांगल्या नोकऱ्या लावून देतात. त्यांची लग्नं करतात. फक्त एका मुलीनं चाकोरी ओलांडून पारश्याशी लग्न केलेलं आहे तेही त्यांना खटकतं. म्हणजे जीवनाविषयीची एक निश्चित रूपरेषा त्यांच्या समोर आहे.

त्यांचं आपल्या बायकोवर प्रेम आहे; पण वयाच्या पंचाऐशीव्या वर्षी ती गेली त्याची मोठी खंतही त्यांना नाही. त्यांना मुलाविषयी आपुलकी आहे; पण भावनेत गुंतवून ठेवणारं प्रेम नाही. त्यांचं प्रेम आहे ते केवळ स्वतःवर. त्यांना चटकमटक खायला आवडतं. त्यांची सून नोकरी करणारी आहे. तिला स्वैंपाक नीट जमत नाही. ते बेचव जेवण त्यांना आवडत नाही. त्याबद्दल त्यांची कुरकूर असते; पण हेच जेवण मुलाला आणि सुनेलाही आवडत असेल का असा विचार त्यांच्या मनात येत नाही. ते मजूरणीकडून लोणच्याच्या बरण्या, पेढे, बर्फी, फरसाण आपल्या खोलीत आणून ठेवतात. अजूनही त्यांना रेडिओवरील बातम्या ऐकण्याची हौस आहे. पॅरॅलिसिसचा निर्जीव पाय ओढीत नेऊन ते एकदा बातम्यांसाठी रेडिओ लावतात.

जगात काय चाललेलं आहे हे त्यांना समजायला हवं आहे. आपल्या मित्रांपैकी कोण आहे, कोण मेले हे कळायला हवं आहे; पण त्यातही जगलेल्यांचा फारसा आनंद नाही आणि मेलेल्यांची फारशी खंत नाही. तो थोडासा अकाली गेला किंवा त्याचं वयच झालेलं होतं असं मानून तो विषय तिथंच संपविण्याची अलिप्तता त्यांच्याजवळ आहे. स्वतःच्या जीवनाविषयी मात्र या वयात देखील त्यांना विलक्षण जिद्द आहे. जन्म–मरणाची चेष्टा करण्याचाच त्यांचा स्वभाव आहे. (पान ९०–९१) मागे एकदा अल्सरने आजारी असतां पोटातच त्यांचा अल्सर फुटला. रक्ताच्या गुळण्या झाल्या. माणसाच्या शरीरात एवढं रक्त असतं? स्वतःच्या रक्तावर त्यांची ही प्रतिक्रिया. पुढे त्यांच्यावर शस्त्रक्रिया होते आणि ते बरे होतात. तेव्हा ते म्हणतात, 'तिकीट काढलेलं होतं; पण ते रिटर्न तिकीट निघालं!'

माणूस साधारण पन्नाशीच्या पुढे गेल्यावर त्याच्या मनात मरणाचे विचार येऊ लागतात. या विचारांचं सोडा; पण खऱ्या अर्थानं पाहिलं तर माणूस जीवनाचा विचार मरणाच्या कल्पनेशिवाय करूच शकत नाही.

बनहट्टींच्या अखेरच्या आत्मचरित्रातील अप्पा हे एक अगदी वेगळंच व्यक्तिमत्त्व आहे. चौऱ्याण्णवाव्या वर्षीचं त्यांचं जगणं पाहिलं तर आश्चर्य तर वाटतेच; पण त्याचबरोबर त्यांच्या पासष्टाव्या वर्षी लिहिलेल्या आत्मचरित्राकडे आणि ऐंशी पूर्ण झाल्यावर लिहिलेल्या दुसऱ्या आत्मचरित्रात काय असेल याचं कुतूहल वाटल्यावाचून राहात नाही. या माणसाचे संपूर्ण चरित्र न्याहाळायला मिळावं ही उत्कंठा लागून राहते. अशी ही कादंबरी.

—वि. शं. पारगावकर

अखेरचे आत्मचरित्र
लेखक : राजेंद्र बनहट्टी
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
मूल्य : बारा रुपये.

---

फिनिक्स निवड

# काही पुस्तके— काही लेखक

## The United States of America :

आपल्या निकटवर्तीयांपैकी, किंवा ओळखीच्यांपैकी बरेच लोक अस्मितेने सांगतात की, मी स्टेटस्‌ला ट्रिप मारली किंवा मारणार आहे! स्टेटस् हा जगातील स्वर्ग! 'स्टेटस्' म्हणजे एक स्ट्रीट ड्रीम! 'स्टेटस्' म्हणजे फँटसी! 'स्टेटस्' म्हणजे कार्यक्षमतेचे प्रतीक! 'स्टेटस्' म्हणजे ऋद्धी–सिद्धीचे गमक! स्टेटस्' म्हणजे फेरीलॅन्ड! यू. एस. ए. बद्दल अशी अनेक विशेषणे आपल्याला ऐकावयास मिळतात. आपली तिकडे जाण्याची सुतराम शक्यता नसते. हे सर्व ऐकून, आपल्याला जाऊन आलेल्या किंवा गेलेल्या व्यक्तीबद्दल किंचित हेवा व बराच आदर वाटू

लागतो. त्यालाही असे वाटायला लागते की, ' आपण काही कोणी सोम्या-गोम्या नाही. संधी मिळेल तेव्हा मग, ' स्टेटस् मध्ये हे असं छान असतं बघा...'

रसाळ वर्णन करणारे कोणी असेल तर मग आपल्याला अनेक रंगतदार किस्से ऐकायला मिळतात; परंतु तुमची जर स्टेटसमध्ये जाण्याची ऐपत अगर इच्छा नसेल तर घरी बसल्या बसल्या हे पुस्तक बघून टाका !

हे पुस्तक पाहिल्यावर पहिले विचार आपल्या मनात असे येतात, ' किती भव्य ! किती सुंदर ! अलीकडे फोटोग्राफीचे तंत्र इतके सुधारले आहे की, या पुस्तकातील रंगीत क्रिस्टल-क्लिअर फोटो बघून ( ठराविक ठसा माफ करा ) डोळ्यांचे पारणेच फिटते ! प्रचंड शहरातील स्कायस्क्रेपर्सचे फोटो तर येथे आहेतच; परंतु अनेक रंगांचे आकाश व पाणी, लॅन्डस्केप्स, बंदरे, कॅक्टस, बर्फाळ अलास्का, अक्षरशः इंद्रधनुष्याच्या रंगांनी भरलेले हवाई, ( Hawaii ) पर्ल हार्बरचे ऍरिझोना मेमोरियल, इल्वाकोंची सुंदर किनारपट्टी, ऑलिंपिक नॅशनल फॉरेस्ट, वायकीकी बीच, वॉशिंग्टन नॅशनल पार्क अशी यादी केली तर पान न पान भरेल !

आपण पाहतो की, धबधब्यात साधारणतः धावत जाणाऱ्या पाण्याखालची वाळू किंवा खडक काळे असतात; पण ओरॅगोन येथील मिस्टी फॉल्सच्या पाण्याच्या खालील दगड चक्क हिरवे असतात. शेजारची गडद झाडी, पाण्याखालचे हिरवे दगड, गोटे व पाण्याचे कोटचवधी तुषार यामुळे साऱ्या देखाव्याला एक प्रकारचा धूसरपणा दिसतो. चित्र बघूनच जर इतकं ट्रांक्विल वाटायला लागते तर खरोखर तिथे जाऊन काय वाटत असेल !

ओरॅगोनच्या समुद्रपट्टीचा किनारा अजून तरी खराब झालेला नाही. अर्थात हे पुस्तक कैकाडी समाजासाठी नसल्यामुळे त्यात स्टेटस्‌ची ' निगेटिव्ह ' साईड नाहीच निर्भेळ, निर्लस वगैरे आनंद लुटण्यासाठीच हे पुस्तक आहे. फार गंभीर वाचन झाले की, निर्माण होणारा हँगओव्हर दूर करण्यासाठी हे पुस्तक आहे.

आतापर्यंत मी स्टेटस्‌चे अनेक फोटो पाहिले आहेत. ' ग्रॅन्ड कॅन्योन'ची भव्यता वगैरे. ' स्टॅच्यू ऑफ लिबर्टी ' तर बघून बघून गुळगुळीत व गुडगुडी झाला आहे; पण सदरच्या पुस्तकातल्या तोडीचे फोटो मी आतापर्यंत ' नॅशनल जॉग्रफिक 'मध्ये सुद्धा पाहिले नाहीत !

अमेरिकेतील ' योसेमोइर ' नॅशनल पार्क म्हणजे बाराशे ( १२०० ) मैलांचा एक विविध लॅन्डस्केप. इथल्या डोंगर व पर्वतांचे माथे चित्र-विचित्र असतात.

चार्लसनदीजवळचे बॉस्टन शहर रात्री पाहिले की, या इथे नेहमीच दिवाळी असते की काय असे वाटते.

लेखकांच्या (प्रसिद्ध) घराविषयी आपल्याला नेहमीच कुतूहल व उत्सुकता असते; पण प्रसिद्ध ' हार्टफोर्ड मार्कट्वेन 'चे नुक फार्म पाहून थोडी निराशाच होते. कदाचित फोटो लहान आहे म्हणून. वेलीने आच्छादलेली प्रसिद्ध येल युनिव्हर्सिटी ' अतिशय पिक्चरेस्क वाटते. हे विद्यापीठ ' न्यू हेवन ' कनेक्टीकर येथे आहे.

आपण पावसाळचात महाबळेश्वर सहसा बघत नाही. तसेच स्टेटस्‌मध्ये ' नायगरा फॉल्स ' बघायला बहुतेक लोक उन्हाळचातच जातात; परंतु या पुस्तकात नायगराचा हिवाळचात घेतलेला मोठा फोटो आहे.

येथे ' मॅनहटनचे ' कॉंक्रीट जंगल तेवढंच काय ते थोडंसं बकाल वाटतं !

कोणतंही वाळवंट पाहिलं की ' लॉरेन्स ऑफ अरेबिया 'ची आठवण येते. ' ऍरिझोना डेझर्टची ' ब्यूटी स्टार्कच आहे !

' सॅन डिएगो कॉरोनॅडो बे ब्रिज ' म्हणजे एक प्रचंड फ्लाय ओव्हरच !

## विल्यम सिडने पोर्टर

अलीकडे जी नवीन इंग्रजी पुस्तके येतात त्यात विविधता पुष्कळ असते. पूर्वी जी पुस्तके यायची त्यात कथा-कादंबऱ्यांची संख्या फार मोठी असायची. आमचे इन्फॉर्मेशन एक्सप्लोझन बघून तर डोकेच चक्रावून जाते. मॅनेजमेंट टॅन्झॅक्शनल अनॅलिसिस, ट्रॅव्हलॉग्स, बायोग्राफीज, ऑटोबायोग्राफीज, कॉस्मॉलॉजी, सायकॉलॉजी, एकॉलॉजी, फिक्शनलाइज्ड बायोग्राफीज, सेक्सॉलॉजी, पिक्टोरियल्स, युफोलॉजी (UFO), मेडिकल, नॉव्हेल्स, वाइल्डलाइफ, फ्युचरॉलॉजी (' फ्यूचर शॉक ' टाइप ), बेस्टसेलर्स, क्राइम, मिस्ट्रीज, फिल्म टाय-इन्स, स्पोर्टस्, ऑकल्ट थ्रीलर्स (एक्सॉसिस्ट टाइप), सेल्फ इम्प्रुव्हमेंट बुक्स, सायन्स, फिक्शन, फायनान्शियल थ्रिलर्स, करंट पॉलिटिक्स, मेम्वार्स ( memoirs ) नोबल प्राईझविनर्स, बुकर प्राईझविनर्स, पुलित्झर प्राईझविनर्स वगैरे इंग्रजी पुस्तकांचा महापूर पाहिला की, या सर्वांत कथासंग्रह, शॉर्ट-स्टोरी हा प्रकार इतका कमी का हा विचार मनात आल्याशिवाय रहात नाही. कधीकधी इंग्रजी-साहित्यात कथा हा प्रकार परिपक्व झालाच नाही की काय असे वाटते. कुठे गेले इंग्रजी-मधले व्यंकटेश माडगूळकर, अरविंद गोखले, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, जी. ए. कुलकर्णी? अर्थात इंग्रजीमध्ये एडगर अलान, पॉ, ओ. हेन्री, जॉन शीवर (की चिवर ? Cheever), जॉन ओ हारा, जॉइस, कॅरोल ऑटंस, सॉमरसेटमॉम्स वगैरे नावे डोळचांसमोर येतात; परंतु इंग्रजी साहित्याचा आवाका लक्षात घेता ही नावे फारच कमी वाटतात.

मी हे लिहिताना केवळ माझ्या ग्रंथालयाच्या अनुभवावरून लिहीत आहे. मला इंग्रजी साहित्याची पदवी वा शिक्षण यापैकी काहीही नाही. म्हणून माझ्या हातून चुका होणे संभवनीय आहे; पण आमच्या फिनिक्समध्ये सारेच काही ' rules of the thumb ' प्रमाणे......

खरंच मला कोणी वाचकाने सांगितले की, ' मला इंग्रजी ' शॉर्ट स्टोरीचं ' पुस्तक द्या ! ' तर मी बुचकळचात पडतो व थोडा अधिक नॉनप्लस होतो आणि शेवटी ओ. हेन्री काढून देतो !

या ओ. हेन्रीची ' गिफ्ट ऑफ द मॅगी नावाची कथा मी फार फार वर्षांपूर्वी वाचली होती. ती वाचून मनात खोलवर कोठे तरी ढवळाढवळ झाली. या ओ. हेन्रीच्या कथात सारंच काही बिटर–स्विट गरीब जोडप्याचे निरागस प्रेम. मॅगी या कथेचा अंतच असा आहे की, तुम्ही ओ. हेन्रीच्या प्रेमात पडाल. (अर्थातच पॉसच्युमस ! ) मॅगीची ही कथा अशी आहे–ख्रिस्मस येतो ! ख्रिस्मस प्रेझेंट म्हणून नवऱ्याला घडचाळाची चेन देण्यासाठी बायको आपले केसच विकून टाकते ! पण नवरा काय कमी असतो का ? प्रेम गरिबी-

तच जास्त असते असे म्हणतात. त्या पठ्ठ्याने बायकोला छान छान कंगवे विकत घेण्यासाठी आपले घड्याळच विकून टाकलेले असते ! अगदी ironical climax आहे, नाही का ?

ओ. हेन्रीचे खरे नाव विल्यम सिडने पोर्टर असे होते हे मला कित्येक वर्षांनी कळले. शेक्सपिअर व गुलाबाचा वास व नाव हेन्री दिसायला एकदम हॅन्डसम!

कधीच कैदेत जाणार नाही इतका हॅन्डसम; परंतु त्याला दे कोलंबस पेनीटेनशिअरी मध्ये डांबले गेले ! त्याचं असं झालं की, बँकेतील रक्कम अपहरण केली असा त्याच्यावर १८९६ मध्ये आरोप लादला गेला. कित्येक मित्रांनी त्याला होंडूरास येथे पळ काढण्यास मदत केली. तिथे गेल्यावर थोड्याच अवधीत त्याला बातमी मिळाली की, त्याची बायको ऑस्टीन येथे आजारी आहे म्हणून त्याला परतावे लागले; पण तिथल्या अधिकाऱ्यांनी सहानुभूती दाखवून त्याच्या बायकोच्या मृत्यूपर्यंत केस चालवली नाही. खरं म्हणजे त्यांनी गुन्हा केलाच नव्हता असं काही लोकांचं म्हणणं आहे. त्याला फक्त बँकेचे काम नीट मॅनेज करता आले नाही.

ओ. हेन्रीची पात्रे तशी अंधुक व धूसरच; पण त्याची कथा म्हणजे त्या वेळच्या समाजाचा एक दस्तऐवजच ! विसाव्या शतकाच्या सुरुवातीस 'न्यूयॉर्क' कसे होते ? ओ. हेन्रीची कथा वाचली की त्या वेळचे सामान्य न्यूयॉर्कर डोळ्यांसमोर येतात. ओ. हेन्रीच्या कथाबीजात एक उपहासात्मक विनोदी झालर नेहमीच असते. कथेचं ओ. हेन्री एन्डिंग असं आपण कधीकधी म्हणतो त्या वेळेला ते 'surprise ending' असतं. पुष्कळ टीकाकारांना या कारणामुळेच हेन्रीच्या कथा उण्या वाटतात. विशेषत: त्या काळात हेन्रीचे फॅड निघून गेल्यावर अनेक टीकाकारांनी त्याला लघुकथेच्या वेगवेगळ्या स्तरांवर बसवलं खरंच तो द्रुतगतीने पैशासाठी भरपूर लिहायचा; पण या कारणासाठी त्याचे प्लस पॉइंटस् काही पुसले जाणार नाहीत.

एके काळी हेन्री 'फर्स्ट नॅशनल बँकेत' टेलर म्हणून काम करीत असे. त्यांनी एकदा 'ध रोलिंग स्टोन' नावाचे विनोदी वीकली चालवून पाहिले. पण त्याचे 'Rolling stone gathers no moss' असेच झाले !

तो कैदेत असताना त्याच्या मुलीच्या चांगल्या चरितार्थासाठी लिहीत असे. त्याच्या चांगल्या वर्तनामुळे त्याला तीन वर्षे तीन महिन्यांनंतर सोडून देण्यात आले व डब्लू. एस. पोर्टर ओ. हेन्री झाला !

ओ. हेन्रीचा शेवट पण हेमिंग्वेटाइपच झाला. अत्यंत लोकप्रिय असून सुद्धा त्याची आर्थिक स्थिती हलाखीची झाली. प्रकृती ढासळली. तो मद्यपीही झाला. मी आधी म्हटले आहे की हेन्रीचा शेवट हेमिंग्वेटाइप झाला; परंतु सॉमरसेट-मॉम-टाइप झाला असं म्हटलं तरी चालेल. इंग्रजी साहित्यातील दोन उत्कृष्ट कथाकारांचे असे अंत व्हावेत हे शोचनीय व खेदाचे आहे. मी गेरॉल्ड लँगफॉर्डनी लिहिलेल्या ओ. हेन्रीच्या चारित्र्याच्या शोधात आहे !

– जे. एन. पोंडा

---

परिचय

# लग्न करायचंय ? जरा इकडे वळून पहा !

'प्रॉवर्बस् रिफ्लेक्ट ॲटिट्यूडस् ऑफ ए कल्चर' अशा शीर्षकाखाली 'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं' ही म्हण स्त्रीमुक्ती चळवळीनं प्रसिद्ध केलेल्या कॅलेन्डरमध्ये वाचली. फक्त नकटीच काय, पण नकटा शिवाय नाकेली, नाकेला या सगळ्यांच्याच लग्नात विघ्नं येत असतात, हे तर आपल्या सगळ्यांना माहीतच आहे ! तेव्हा ही म्हण 'लग्नाला सतराशे विघ्नं' अशी लिहिली, तरी ती प्रवृत्ती आणि संस्कृती कशी छान दाखवेल !

ही विघ्नं असतात तरी कसली ? 'संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून सुरुवात' ही संन्यासी वगैरे लोकांची 'स्पेशलाईज्ड' बाब झाली; पण 'घर पहावं बांधून आणि लग्न पहावं करून' यामधला जो अकटोविकटो पसारा आणि गोंधळ आहे, त्याची सुरुवात अगदी पहिल्या पायरीपासूनच होते.

ही पहिली पायरी अर्थातच दाखवण्याची, बघण्याची. कमालीचे अवघडलेले क्षण ! हा आमचा मुलगा, हें हें हें, ही आमची मुलगी हें हें हें. घ्या नं घ्या, पोहे थंड होताहेत. हलवा पण हिनंच केलाय. कुठे नोकरीला असता आपण ? हो हो, जर्मनीला जाण्याचे चान्सेस आहेत. हाय सोसायटीत वावरायची सवय आहे का ? पु. ल. देशपांडे आवडतात का ? पडद्याआडून, खिडकीतून डोकावणारे डोळे. हजार डोळ्यांनी एकदम चालवलेली दोन जीवांच्या रूप–रंग–उंची–शिक्षण–पगार–आवडी–निवडी यांची चिकित्सा. सलज्ज, विनम्र दिसण्याचा खटाटोप, तर स्मार्ट, रुबाबदार आणि तडफदार, जाणकार इत्यादी दिसण्याची धडपड दुसऱ्या बाजूनं, ताकाला जाऊन भांडं लपवायचं तशातली गत. स्पष्ट शब्द टाळून, गुळमळीतपणे आडून केलेल्या चौकश्या आणि चातुर्याची पराकाष्ठा.

लग्नाच्या पहिल्या पायरीवरचा हा तमाशा इतका चमत्कारिक आणि मुलगा आणि मुलगी यांना 'केवल वस्तुमात्र' बनवणारा असतो की, संवेदनाक्षम मनाला इथेच उबग येतो.

या सगळ्या प्रकाराला काही पर्याय शोधायला हवा !

आणि तो शोधला आहे 'शुभं करोति'नं.

डॉ. वैद्यकुमार रायकर यांनी काही वर्षांपूर्वी स्थापन केलेली ही संस्था आज पुणे, मुंबई आणि कोल्हापूर इथे लग्न जमवण्याचं कार्य चालवते आहे. नुकताच त्यांच्या मुंबई शाखेनं विवाहेच्छु तरुण–तरुणींचा वार्षिक 'परिचय मेळावा' आयोजित केला होता. त्या निमित्तानं या संस्थेच्या कार्याचा परिचय करून घेता आला.

'परस्पर परिचय'–हाच या मेळाव्याचा मुख्य कार्यक्रम. 'परिचय विवाहा'ची कल्पना, 'शुभं करोति'ची एकमेकांची ओळख, मनमोकळी चर्चा, विचारांती देवाण–घेवाण आणि अशा दाट परिचयानंतर मनाजोगत्या जोडीदाराची निवड करायची संधी मिळावी, हा कार्यक्रमाचा उद्देश आहे, असं मेळाव्याचे संयोजक म्हणतात.

मुंबईतल्या या वार्षिक मेळाव्याला साडेचारशेच्यावर विवाहेच्छु तरुण–तरुणी आणि किती तरी पालक लोटले होते. हा एवढा

मोठा प्रतिसाद संयोजकांच्या एवढा अपेक्षे-पलीकडे होता की, मेळाव्याच्या बऱ्याच अगोदर आता प्रवेश बंद झाल्याची जाहिरात संयोजकांना द्यावी लागली. काही व्यवस्था ऐन वेळी करावी लागली आणि शिवाय किती तरी विवाहेच्छु तरुण–तरुणी, पालकां-साठीच प्रवेशमूल्य भरून पालकांसाठी झालेल्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

'शुभं करोति'ला मिळालेला हा प्रतिसाद म्हणजे ही काहीशी नाविन्यपूर्ण कल्पना लोकप्रिय होऊ लागली आहे याचं तर लक्षण आहेच; पण 'शुभं करोति'नं समाजाच्या केवढ्या अवघड दुखण्यावर बरोबर बोट ठेवलं आहे याचंही ते द्योतक आहे.

माणसाच्या आयुष्यातल्या केन्द्रभूत महत्त्वाच्या गोष्टींपैकी लग्न ही एक अतिशय महत्त्वाची गोष्ट. जखडून टाकणारी बेडी इथपासून ते रेशमी पाश इथपर्यंत! ऋणानुबंधाच्या गाठीपासून ते कपाळीच्या भोगवटयापर्यंत. तीन पायांच्या शर्यतीपासून ते दूध–साखरेसारखं एकमेकांत मिसळण्यापर्यंत. रोजच्या कटकटीपासून ते स्फूर्तिदायी सह-जीवनापर्यंत. हे सारं काही लग्नच!

कारण माणसामध्ये होतं ते फक्त शरीराचं मीलन नाही, तर मनाचंही मीलन!

म्हणूनच माणसाचं 'लग्न' नसतं, 'लग्न-संस्था' असते.

ती एक समज–गैरसमज, अपेक्षा यांची गुंतागुंत असते. बऱ्या-वाईट रूढी टांगायची खुंटी असते आणि या साऱ्यांचं दडपण लग्नातल्या वैयक्तिक पैलूवर, मुलानं/मुलीनं द्यायच्या होकार–नकारावर येत असतं.

कार्यक्रमात झालेल्या पालक–मेळाव्यामध्ये प्रा. प्र. ज. जोशी आणि स्नेहलता साठे यांनी या मुद्द्याचा छान परामर्ष घेतला.

बरेच विवाह प्रेमविवाहाच्या मार्गानं जुळतात खरे; पण प्रेमविवाह ही एक वैयक्तिक पातळीवरची घटना झाली. तिच्यातून अशी चाकोरी घडू शकणार नाही की, जिचा सर्वांना उपयोग होऊ शकेल. प्रेमविवाह 'ठरवता' येत नाहीत किंवा 'करता' येत नाहीत, ते 'घडतात!'

म्हणूनच मग 'परिचय विवाहा'ची कल्पना श्रेयस्कर ठरते. आपल्याकडे पाश्चात्य संस्कृतीतली 'डेटिंग'ची कल्पना रूढ नाही. एवढंच काय पण रीतसर दाखवायला/बघायला आणलेल्या मुला–मुलींनी एक-दोनदा स्वतंत्रपणे घराबाहेर भेटून एकमेकांची मतं जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तर तिकडेदेखील जरा अविश्वासानंच पाहिलं जातं आणि या विचारांती त्यांनी जर लग्न न करण्याचा निर्णय घेतला, तर त्यांच्या 'बायडेटा' मध्ये याचा अगदी अधोरेखित उल्लेख झालाच म्हणून समजा!

अशा वेळेला 'शुभं करोति' चं महत्त्व जाणवतं. या संस्थेमुळं असं एक अधिकृत ठिकाण मिळू शकतं की, तिथे बोलण्याचा-अर्थाचा अनर्थ होणार नाही. प्रेमविवाहा-सारख्या प्रकारात दुसऱ्याचं मन जाणून घ्यायला जी लपत–छपत चाचणी करावी लागते ती इथं असणार नाही. त्याचबरोबर रीतिरिवाजाबरोबर येणारा कठोर बांधलेपणाही त्यात असणार नाही. पालक आणि वडीलधाऱ्यांच्या अनुपस्थित मुला-मुलींना अधिकच मोकळेपणा वाटावा हे उघडच आहे.

## रोखठोक व्यवहार!

असं एक खुलं व्यासपीठ निर्माण व्हावं हा 'शुभं करोति' च्या निर्मितीमागचा हेतू आहे. त्याच्या कार्यपद्धतीबद्दलचे जे तपशील स्नेहलता साठेंनी आपल्या भाषणांतून आणि उमेदवारांना सूचना देतानाही दिले, ते अगदी रोख-ठोक आणि व्यवहारी वाटले. एकूणच उद्देश लग्न जमवणं हा आहे. तेव्हा त्यात रोमँटिक आदर्शांची गल्लत न करणं हा शहाणपणा ठरेल. तसं आदर्श म्हणून पहायला गेलं, तर लग्न हा मूलत: केवळ दोघांचा प्रश्न आहे. म्हणजे लग्न करून मिळवायची ती बायको; सून-जाऊ-वहिनी–काकू–मामी नव्हे वगैरे किंवा हुंडा, जातिभेद, पत्रिकेचे बडिवार माजवू नयेत हे सर्व खरं; पण प्रत्यक्षात या गोष्टींना तोंड देऊन आणि कधी तर त्यांना सामावून घेऊनही पुढं जावं लागतं. रूढी मग त्या कशाही असोत. त्यांना समूळ धक्का देणं हे परवडणारं नाही. कारण त्यामुळं लग्न ठरायला सध्या तरी मदत होईलच असं नाही. या गोष्टींची सूचना उमेदवारांनाही दिली जाते. अगदी प्राथमिक ओळखीत नोकरी, पगार, वय, उंची, जात असे तपशील येतात; पण नंतर अधिक परिचय वाढवायचा झाला तर पत्रिका, हुंडा आणि यावर केवळ स्वत:चेच नाहीत, तर घरच्यांचे विचार याबद्दल बोलणं आवश्यक असतं.

स्थळांच्या याद्या आणि जाती-पातीचे, घरच्यांचे तपशील देणाऱ्या वधूवरसूचकमंडळाहून आमची संस्था वेगळी आहे. हे संस्थेतले सर्वजण पुन: पुन्हा आवर्जून सांगत होते आणि प्रत्यक्ष परिचयाची संधी येथे मिळते या दृष्टीनं विचार करताना हा दावा बरोबरही वाटतो. 'स्थळांची माहिती' या सदराखाली दिल्या जाणाऱ्या माहितीत बाकीचे व्यावहारिक तपशील तर कळतात. कळत काय नसेल तर ते अतिशय महत्त्वाचं असं व्यक्तिमत्त्व. डॉ. रायकरांनी दिलेलं एक उदाहरण मोठं बोलकं होतं. मराठी चौथीपर्यंत शिकलेला एक मुलगा. घरचे फार पाश नाहीत. मालमत्ता नाही. आयुष्याची सुरुवात झाडूवाला म्हणून झालेली. अशा मुलाचा भाव लग्नाच्या बाजारात कितपत वरचा राहील?

'शुभं करोति'त आल्यावर लक्षात आलं, या मुलानं स्वत:ची लेथ टाकली आहे आणि तो हळूहळू यशस्वी होतो आहे. त्याला कुस्तीची आवड आहे आणि संगीतातही गती आहे! अशा हरहुन्नरी, कर्तबगार व्यक्तित्वानं त्याच्याशी एका एम. ए., बी. एस. सी., बी. एड. एवढं शिक्षण असलेल्या मुलीनं लग्न केलं आणि ते अगदी आजतागायत सुखानं नांदताहेत!

आणखीही एक मुद्दा आहे. कानाला तितका गोड लागणार नाही; पण आहे मात्र अगदी खरा. लग्न या मुद्द्याच्या नावे खूपशी गोड हुरहूर आणि अस्पष्ट, अंधुक कल्पना एवढीच पुंजी विवाहेच्छूंच्या मनात असते. निळ्या डोळ्यांचा राजपुत्र आणि सोनेरी केसांची राजकन्या कोणाला नको असते? आपल्या नवऱ्याची किंवा बायकोची अपेक्षाही बहुधा हिंदी चित्रपटांनी किंवा पूर्वीच्या फडके–खांडेकरांनी घालून दिलेली असते; पण अखेर लग्न हा एक रोखठोक व्यवहार देखील आहे. तेव्हा अखेरीस या बाजारपेठेत आपला भाव किती, आपली मागणी काय याचाही सुज्ञ विचार या अपेक्षांच्या बरोबरीनं होण्याची आवश्यकता असते. हा विचार बहुतेक वेळा तापदायक असतो आणि दु:स्वप्नासारखा तो टाळलाही जातो.

'खेरीज' रस्त्यात, गाडीत, ऑफिसमध्ये इतकी चांगली मुलं-मुली दिसतात सांगून

येणारीच – येणाऱ्याच का एवढी वाईट ?' अशी एक उभयपक्षी भावना असते.

मेळाव्याच्या निमित्तानं पुष्कळ मुलं-मुली पहायला मिळतात आणि ती रस्त्यातली आणि गाडीतली मुलंही त्यात बहुधा असतातच. ( किंवा निदान हे तरी लक्षात येतं की, लग्नाच्या दृष्टिकोनातून पाहिलं की कोणीच कसं बरं वाटत नाही ? ) एवढ्या माणसांच्या संदर्भात स्वतःची तुलना केली की, आपोआपच लक्षात येतं, आपण कुठे उभे आहोत. एक पर्स्पेक्टिव येतं परिस्थितीचं आणि कळतं, आपल्याला नेमकं काय हवं आहे आणि काय मिळण्यासारखं आहे. नकळत शहाणपणा, समजूतदारपणा येत जातो. कधी एखाद्या माणसाविषयी वाटलेल्या ओढीनं अपेक्षा आणि आवडी बदलतातदेखील !

तडजोड हा तर जगण्याचा मूलमंत्र; पण या तडजोडीमागची नाखुषी किंवा तिची सक्ती हा आयुष्य वाया घालवणारा प्रकार असतो. उघड्या डोळ्यांनी आणि गोडी-गुलाबीनं केलेली तडजोड म्हणजे हमखास मनःशांती.

'शुभं करोति' त्याची चांगली ओळख करून देते आणि तीही आयुष्यातल्या अगदी योग्य वेळेला !

– ललिता बर्वे

---

## रंगभूमी

# The Ramayana

## ब्रॉडवेला मिळालेली देणगी ? अरेरे !

रामनवमीची रात्र. साडेनऊचा सुमार. पुण्याच्या नू. म. वि. किंवा रेणुकास्वरूप प्रशालेचे पटांगण माणसांनी नुसते फुलून गेलेले. एवढे वर्णन सांगितले की, 'सुधीर फडक्यांचे गीतरामायण' असे कार्यक्रमाचे निदान तुम्ही अचूक करू शकाल. आता या कार्यक्रमाची गर्दी डोळ्यांपुढे आणा. पांघरलेल्या शालींपासून, माळलेल्या गजऱ्यांपासून बकोटीत धरलेल्या सतरंज्यांपर्यंतचे सर्व बारकावे तुम्ही अचूक ओळखू शकाल. रामाबद्दलच्या भक्तीने, गदिमांबद्दलच्या आदराने आणि सुधीर फडक्यांबद्दलच्या कौतुकाने ही सगळी गर्दी भारली गेलेली असते. मग फडक्यांच्या अतिनाटकीपणालासुद्धा 'काय ग बाई फडके तल्लीन होतात !' अशी गहिवरली दाद मिळते !

या गीतरामायणाच्या किंवा रामासंबंधीच्या दुसऱ्या कोणत्याही कार्यक्रमाला केसांची घरटी केलेल्या, कोटपाटलोणीतल्या आबालवृद्ध बायका त्याही विदेशी अथवा आंग्लहिंदवी संस्कृतीच्या आणि व्हिक्टोरिअन काळातील वाटावेत असे म्हातारे अन् त्यांच्या बरोबर सध्याच्या 'अँग्री यंग मॅन' पिढीतील जीन्स अथवा कॉड्रॉय असा जनसमुदाय लोटलेला आहे, अशी कल्पना तुम्ही करू शकता का ? मी तरी आतापर्यंत फक्त अशी कल्पनाच केली असती; पण अकरा आणि एकोणीस फेब्रुवारीला हा चमत्कार बालगंधर्व रंगमंदिरात प्रत्यक्ष घडला. या चमत्काराचे एकमेव कारण म्हणजे रामकथेचा कच्चा माल पाठवून इंग्रजीतून आयात केलेले प्रॉडक्ट 'द रामायणा !'

या 'द रामायणा'चे लेखक आहेत इंग्रजीतील वाल्मीकि श्री. गोपाल शर्मन. ( हे इंग्रजीतील वाल्मीकि वगैरे आपलं पद्धत म्हणून ) मूळ रामायणातील पात्रांना म्हणा किंवा घटनांना म्हणा, सध्याच्या सामाजाथिक संदर्भात एक नवीन मिती किंवा dimension दिल्याचा किंवा जे. कृष्णमूर्तीपरंपरेतील तत्त्वज्ञानाच्या उजेडाचा एक भला मोठा कवडसा रामाच्या व्यक्तिमत्त्वावर पाडून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे नवेच प्रतिबिंब अथवा पडछाया projection दाखवल्याचा किंवा अशा रीतीचेच काही तरी कृत्य केल्याचा या गोपाल वाल्मीकींचा दावा आहे. शिवाय 'हा त्यांचा दावा खरा आहे' असे दावेही बऱ्याच विशेषतः विदेशी वृत्तपत्रांनी केलेले आहेत. आदिकवी वाल्मीकीचे मूळ रामायण, जे. कृष्णमूर्तींचे तत्त्वज्ञान, गोपाल शर्मनचे 'द रामायणा' आणि विदेशी वृत्तपत्रे हे सर्व अेकेकटे वाचणारेही फार थोडे. मग सगळे एकदम ज्यांच्या नजरेसमोर आलेले आहेत अशांची जमात अल्पसंख्यांकांपेक्षाही कमी असल्याने गोपालजींच्या दाव्याला फारसे कुणी आव्हान दिलेले नाही. मला त्यांचे 'द रामायणा' आणि त्यांचा दावा ऐकल्यानंतर लक्षात आले ते एवढेच की, वाल्मीकीपासून जे. कृष्णमूर्तींपर्यंत लोकांनी काही फारसं वेगळं सांगितलेलं नाही.

रामायणातील काही तपशील वगळता ( उदाहरणार्थ– रामायणात धोब्याच्या निंदेमुळे राम सीतात्याग करतो; तर 'द रामायणा'त असा धोबी वगैरे काही निंदा करीत नाही. रामच सीतेला सांगतो की, 'आयुष्यातील कोणत्याही गोष्टीबद्दल मला आसक्ती किंवा लिप्तता उरलेली नाही. अगदी तुझ्याबद्दलसुद्धा मला प्रेम वगैरे वाटते का, याबद्दल मी सांशक आहे. खरं सांगायचं तर बहुतेक सगळ्या गोष्टी मी एक थंडे आवश्यक कर्तव्य cold duty म्हणून उरकतोय.' हे रामाकडून ऐकल्यावर सीताच separation चा decision रामाला ऐकवते आणि वनामध्ये exit घेते. ) फारसा बदल न करता रामकथेतील निवडक प्रसंग या 'द रामायणात' गोपाल शर्मननी समाविष्ट केलेले आहेत. मुळात नाटक म्हणून लिहिलेले हे रामायणा काही तांत्रिक अडचणींमुळे गोपाल शर्मननी स्वतःच दिग्दर्शित करून आपल्या पत्नी श्रीमती जलबाला वैद्य यांच्या मदतीने एकपात्री प्रयोगाच्या स्वरूपात रंगभूमीवर आणले.

प्रत्यक्षात मात्र धड ना कथाकथन, धड ना एकपात्री प्रयोग, धड ना नाटक असे अत्यंत विस्कळित आणि चमत्कारिक असे त्याचे स्वरूप बनले आहे. एकपात्री प्रयोगाच्या स्वरूपात रंगभूमीवरील प्रसंग चालू असताना मध्येच जलबालादेवी 'now enters Bharata' किंवा 'Ravana leaves' अशा स्वरूपाची कंसातील वाक्ये निवेदनात्मक स्वरूपात म्हणतात. साहजिकच त्या प्रसंगाचे अखंडित्व तुटून सगळाच प्रकार तुकड्यातुकड्यांनी जोडलेला बनतो. यापेक्षा किती तरी सफाईदार एकपात्री प्रयोग पु. ल. देशपांड्यांनी सादर केलेले आहेत. सध्या गाजत असलेले प्रा. लक्ष्मण देशपांड्यांचे 'वऱ्हाड चाललंय लंडनला' सुद्धा या 'द रामायणा' पेक्षा सरस ठरेल! एकपात्री प्रयोग या दृष्टीने जलबालादेवींचा यातील भाग अतिशय मह-

खाचा आहे; पण त्याचा उल्लेख नंतर ओघाने येईलच.

दिग्दर्शक म्हणून गोपाल शमन यांच्या कामगिरीवर सुद्धा विदेशी रंगभूमीची छाप जबरदस्त होती – विशेषत: 'बॅले'तील नृत्यनाटयात्मक हालचालींची. पात्रांचे बसणे, चालणे, एका प्रसंगी गरागरा तलवारीचे हात फिरवीत केलेले भाषण (या प्रसंगी निवडलेली तलवारसुद्धा विदेशी तलवारींसारखी दोन्ही पाती समांतर आणि सरळ जाणारी अशी होती) इत्यादी सगळ्या गोष्टींमधून ही विदेशीपणाची छाप जाणवत होती. मला तर सतत 'सोविएत देश' मधील 'व्लादिमीर लिचुन्स्कोय (राम) आणि तत्याना सर्गेयेव (सीता) रामायणातील एक प्रसंग सादर करताना' अशा मजकुरांची आणि त्यावरील चित्रांची आठवण येत होती. शेवटी जलबालादेवींनी रंगभूमीवरील रामप्रतिमेची आरती करून एक मोठा साष्टांग दंडवत ठोकल्यानंतर आता त्या उठून कपाळाला आणि छातीला हात टेकवून क्रॉसची खूण करणार असे मला सारखेच वाटत होते. या सगळ्या विदेशीपणावर वारंवार बोचणारा एक प्रकार म्हणजे रामायणातील नावांचा उच्चार.शीर्षक जसे 'रामायणा' असे आकारांत तशीच बाकीचीही नावे. 'राम'चा सतत कोकणी 'रामा'बालू बनत होता. हीच गोष्ट लक्ष्मणा, भरता, दशरथा, सुग्रीवा, बिभीषणा, रावणा या साऱ्यांचीच. हे कशासाठी ? हल्ली फॅशन म्हणून योगासने वगैरे करणारी मंडळी त्याचा उल्लेख कायम 'योगा' असा करतात, त्याची मला आठवण झाली. पाश्चात्य नाटकाचे भाषांतर वा रूपांतर सादर करताना जर कोणी 'हॅम्लेट' ऐवजी सतत 'हॅम्लेटू' किंवा 'किंग लियर' ऐवजी 'किंग लियरी' असा करू लागला तर ते चमत्कारिक आणि विनोदी वाटणार नाही का ? या सगळ्या विदेशीपणाचा उल्लेख एवढ्यासाठीच – या एकपात्री प्रयोगाचा उल्लेख 'न्यूयॉर्क टाइम्स'ने 'India's Gift to Broadway' अशा शब्दांमध्ये केलेला आहे. जर हा प्रयोग म्हणजे ब्रॉडवेला मिळालेली देणगी असेल तर ब्रॉडवेची रंगभूमी अतिशय मागासलेली असावी किंवा इंडियाकडून मिळालेली म्हणून ही देणगी मोठी वाटत असेल; तर हे भारतीय रंगभूमीचे फार मोठे अवमूल्यन आहे !

एकपात्री प्रयोग म्हटल्यानंतर त्याच्या यशापयशात त्या "एकपात्रा'चा वाटा सिंहाचा असतो. श्रीमती जलबाला वैद्यांनी दिग्दर्शन व लेखनातील दोष (तुटकपणा, मध्येच येणारे निवेदन) वगळता प्रत्येक प्रवेशातील पात्रे सुंदर उभी केली. एक जाड पुरुषी आवाज, एक पातळ पुरुषी आवाज, एक नाजूक स्त्रीचा आवाज; एक म्हाताऱ्या स्त्रीचा आवाज अशा चार-पाच वेगवेगळ्या छटा त्या आपल्या आवाजाच्या बदलातून सुंदर उभ्या करतात. साहजिकच प्रवेशाची रचना अशी वेगवेगळ्या छटा असलेली तीन-चार पात्रे घालूनच केली आहे. त्यामुळे काही मर्यादाही आल्या. सारख्या आवाजाचा वापर ज्या दोन पात्रांसाठी केला आहे, अशी दोन पात्रे कधीच एका प्रवेशात येत नाहीत. उदाहरणार्थ– राम आणि रावण एकत्र कधीच येत नाहीत. लक्ष्मण, बिभीषण आणि हनुमान ही पात्रे कधीच एका प्रवेशात बोलत नाहीत. नाजूक स्त्रीचा आवाज सीतेला बहाल केल्यानंतर मंदोदरीला साहजिकच म्हाताऱ्या स्त्रीचा थरथरता, रडका आवज मिळाला बाकी जलबालादेवींची कामगिरी समाधानकारक होती.

एकपात्री प्रयोगाला आवश्यक अशा रीतीने अतिशय मोजक्या वस्तूंची मांडामांड रंगमंचावर करून प्रवेशांची स्थळेही नीटस दाखवली गेली. फक्त सीताहरणानंतर तिला हाका मारीत विलाप करणाऱ्या रामाने एकदम आरडाओरडा करीत रंगमंचावरून उतरून प्रेक्षकांमध्ये यावे (त्या वेळी प्रेक्षागारातील दिवेही काही वेळ लागतात), हे चांगलेच खटकले. वाल्मीकीला ही ब्रेख्तची जोड देण्याची गरज होती का ?

अशा या 'द रामायणा'चे गोपाल शर्मन आणि जलबाला वैद्य यांनी जगभर चौदाशेहून अधिक प्रयोग घडवले आहेत, हे मात्र अभिनंदनीय आहे खास !

—डॉ. सदानंद बोरसे

# सखाराम बाइंडर

## लक्षात राहते 'लक्ष्मी'

'सखाराम बाइंडर, हे श्रेष्ठ नाटककार विजय तेंडुलकरांचं बहुचर्चित नाटक. सारंग दाम्पत्यांनी हे रंगभूमीवर आणलं तेव्हा ते अनेकविध कारणांनी गाजलं. त्यातली मध्यवर्ती भूमिका निळूभाऊंनी केली होती आणि चंपाच्या भूमिकेत स्वत: लालनबाई होत्या.

लालनबाईंनी, 'नव सखाराम' शोधून परत एकदा हे नाटक रंगभूमीवर आणलं. परंतु आता पहिल्यासारखे सेन्सेशन टेन्शन (लोकांच्या मनात) उरलं नाही. दुर्दैवानं आम्ही निळूभाऊंचा 'सखाराम' पाहिला नाही. म्हणून आमच्या कोऱ्या पाटीसह आम्ही ह्या बाइंडरला बघायला गेलो.

वास्तविक एक अफलातून जीवन जगणाऱ्या, बाइंडरचं हे नाटक; पण नाटक संपल्यावर आमच्या मनात घर करून उरली ती साध्या सरळ मनाची असहाय, देवभोळी लक्ष्मी ! बाइंडर कुठल्या कुठे हरवून गेला !

हे असे का व्हावे ?

सखाराम हा मध्यमवयीन, कुठलेही पाश नसलेला एकटा माणूस. लग्नबंधनावर त्याचा विश्वास नाही.

नाटकाच्या सुरुवातीस नवऱ्याने टाकून दिलेल्या लक्ष्मीला तो घेऊन येतो. 'हे सखाराम बाइंडरचं घर आहे. राजाचा महाल नाही.' इथपासून सुरुवात करून आणलेल्या स्त्रीने घरात कसे वागावे, इतरांशी कसे वागावे, काय काय कामे करावी इत्यादीबद्दलच्या सूचना तो लक्ष्मीला सांगतो आणि 'पटलं तर रहा नाही तर आत्ताच निघा !' असेही सांगतो.

लक्ष्मीचा कंटाळा आल्यावर व दोघांचे एकमेकांशी पटत नाही हे लक्षात आल्यावर तो लक्ष्मीला घराबाहेर काढतो आणि डिसमिस दारुड्या फौजदाराच्या बायकोला, चंपाला फितवून आणतो.

चंपाची व्यक्तिरेखा लक्ष्मीच्या एकदम विरुद्ध टोकाची. चालण्या–वागण्या–बोलण्यात

बिनधास्त ! लक्ष्मीला नवऱ्याने टाकून दिली तर चंपाच्या केसमध्ये तिचा फौजदार नवरा पावणेआठ दारुडा असल्याने– ( एक शंका येते चंपाच्या भाषेत पावणेआठ असलेला नवरा फौजदार कसा काय ? ) व त्याने खूप त्रास दिल्याने, मारहाण केल्याने तीच स्वत: त्याच्या कंबरेत लाथ घालून घर सोडते. लक्ष्मी देवपूजा करणारी. भोळ्या स्वभावाची आणि चंपा मात्र त्या विरुद्ध, दारू पिणारी वगैरे.

सखाराम लक्ष्मीच्या बाबतीत तिच्यावर सर्वार्थाने अधिकार गाजवितो; पण तिच्या चांगुलपणामुळे थोडासा सुधारतो. म्हणजे सकाळी कामावर जाताना (प्रेसमध्ये) पूजा वगैरे करणे, दारू पिण्याचे प्रमाण कमी करणे इत्यादी. पण तो तिच्याकडून पूर्ण शारीरिक सुख उपभोगण्याच्याबाबत हरतो. स्वतःच्या वासनांवर तो ताबा मिळवू शकत नाही.

१ वर्ष एक दिवस लक्ष्मीने काढल्यानंतर तिची जागा चंपा घेते. ही त्याची सातवी बाई ! चंपा मुळातच आक्रमक असल्याने तो तिला स्वतःच्या मुठीत ठेवू शकत नाही. चंपाला नवरा-बायकोच्या शारीरिक संबंधाबद्दल घृणा असते; पण कुठेही आसरा नसल्याने बाहेर चार जणांशी शय्यासोबत करण्यापेक्षा ( तिचा नवरा तिला धंद्याला लावू पहात होता –इति चंपा) ह्या एकट्याला संभाळले म्हणजे झालं या विचाराने दारूच्या अंमलाखाली ती त्याची शारीरिक गरज पूर्ण करते.

यातील आणखी एक दुय्यम व्यक्तिरेखा दाऊदची. हा सखारामचा मित्र. हे दोघे चिलमीचे (गांजाचे) पार्टनर. सखारामने नवं पाखरू आणलं की आस्थेने चौकशी करणारा–

लक्ष्मीला सखारामने हाकलून दिल्यानंतर ती पुतण्याकडे जाते. तेथील आसरा तुटल्यानंतर परत सखारामच्या दारात येते. सखाराम तिला घरात घेत नाही; पण चंपा–तू घरातलं स्वयंपाकपाणी–कामधाम बघ, मी त्याला संभाळते. ह्या अटीवर घरात ठेवून घेते.

तिसऱ्या अंकात लक्ष्मीचा सखारामाच्या घरात पुनःप्रवेश झाल्यानंतर चंपा आणि दाऊदचं लफडं आहे हे तिच्या लक्षात येतं. तिच्या दारुड्या डिसमिस झालेल्या फौजदार नवऱ्याची दोनदा एन्ट्री झाल्यावर–चंपा नवऱ्याला सोडून आलेली. ज्याने आश्रय दिला त्याला फसवून तिसऱ्यासंगेच लफडं करणारी पापी आहे, असं तिला वाटतं.

त्यांच रात्री चंपा–दाऊदच्या तुलनेत सखाराम कमी पडत असल्याने त्याला पावणेआठ ठरविते. लक्ष्मीच्या घरातील उपस्थितीचाही त्याच्यावर ताण असतो. रागाच्या भरात सखाराम लक्ष्मीला मारहाण करून घराबाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. जगात कुठलाच आधार नसल्याने सखारामाच्या मांडीवर डोके ठेवून मरण्याचे स्वप्न पहाणारी लक्ष्मी जाताना–चंपा चांगली नाही म्हणजे ती रोज दुपारी दाऊदकडे जाते हे सांगून मोकळी होते. चंपाच्या ह्या बदफैली वागण्याने विश्वासघाताने पेटून उठून तिरिमिरीत सखाराम तिचा गळा दाबून खून करतो. लक्ष्मी सगळी सूत्रे धैर्याने हातात घेते व तिचा मुडदा घरात पुरण्याची तयारी करते. इथंच नाटक संपतं.

आता पोस्टमार्टेम करू–यातील दुय्यम भूमिका दाऊदची. चंपा ही आक्रमक स्वभावाची, उफाड्याची स्त्री ! तिला पूर्वार्धात शारीरिक संबंधाबद्दल फारसं औत्सुक्य नसतानादेखील सखारामाला सोडून ती दाऊदकडे आकर्षित होते, याचा अर्थ दाऊदमध्ये सखारामापेक्षा निश्चित काही तरी जास्त असावे. ज्या दाऊदवरून चंपाचा खून होतो तो दाऊद या नाटकात अतिशय पोरकट वाटतो. संवाद नसले की, सायलेन्स होऊन जातो.

महत्त्वाची भूमिका सखारामाची (विजय जोशी); पण सर्वांत शेवटी लक्षात राहते ती–लक्ष्मी (इंदुमती पैंगणकर ऊर्फ कानन कौशल)–नवऱ्याला देव मानणारी, तो कसाही असला तरी त्याची पूजा करणारी. कावळा, मुंगळा, मुंगी इत्यादि किड्यांवरही प्रेम करणाऱ्या साध्या–भोळ्या लक्ष्मीच्या भूमिकेत इंदुमती पैंगणकरची निवड सर्वार्थाने योग्य वाटते.

सखारामची आव्हानात्मक भूमिका विजय जोशींनी केली. जिभेला हाड नसलेला, गांजेकस, दारुडा, रंडीबाज परंतु सच्चा सखाराम उभा करताना त्यांनी परिश्रम घेतले तरी त्यांचा सखाराम हा सखाराम वाटत नाही. रंगमंचावरही म्हणजे स्वतःच्या घरात हा सदोदित छाती पुढे काढून ताठ मानाने वावरत असतो. सतत हातात बिडी, तोंडात शिवी असं त्याचं व्यक्तिमत्त्व असताना सबंध नाटकात तो दोनदाच बिडी ओढतो. सखारामाच्या भूमिकेला न्याय देणारं रफ बोलणंही जाणवत नाही. तरी पण या भूमिकेचं टेन्शन त्याच्यावर आहे हे जाणवतं. नाटकाच्या सुरुवातीपासूनच त्याच्या चालण्यात, वागण्यात, हातवारे करण्याच्या पद्धतीवर निळूभाऊंची छाप आहे हे जाणवायला सुरुवात होते.

चंपाची भूमिका माया जाधव यांनी केली. बिनधास्त स्वभावाची, नवऱ्याला झोडपणारी, चिडणारी, तडफडणारी चंपाची भूमिका त्यांनी मन लावून केली.

चंपा आणि लक्ष्मी ह्या दोन्ही स्त्री भूमिका सखारामच्या भूमिकेला सरपास करून जातात आणि म्हणून तर सखाराम लक्षात रहात नाही !

सखारामच्या घराचा सेटही वास्तवपूर्ण असाच आहे; परंतु सखारामच्या घराचा दर्शनी दरवाजा उलटा लागला गेला होता. साधारण मध्यमवर्गीय माणसाच्या घराचे दरवाजे लक्षात घेतले तर आतून दरवाजा बंद करताना कडी मध्यभागी असते; पण इथे ती वरच्या बाजूस होती.

लालनबाईंच्या दिग्दर्शनाचा कुठलाही विशिष्ट पैलू इथं जाणवला नाही.

हे अपयश कुणाचं...?

– प्रतिनिधी

---


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

भारतीय हॉकी संघातल्या एका वादग्रस्त नामवंत खेळाडूनं सांगितलेलं आत्मचरित्र

# ' टू हेल विथ हॉकी '

त्यानं शिखराची उंचीही पाहिलीय आणि शिखरावरून घरंगळतानाचं दुःखही अनुभवलंय ?

द्वारकानाथ संझगिरी

आज मी २९ वर्षांचा आहे; पण गेल्या १३ वर्षांत माझ्या छोट्याशा दुनियेत बरंच काही घडलंय.

मी प्रचंड यश पाहिलंय...असं यश जे फार थोड्या हॉकीपटूंच्या भाग्यात असतं.

मी भरपूर मानहानी सहन केलीय. अशी मानहानी जी कुणाच्याही वाट्याला न येवो ! शिखरावरून घरंगळत येणाऱ्या दगडासारखी माझी बऱ्याच वेळा अवस्था झालीय. कृतकृत्यतेकडून निराशेकडे आणि पुन्हा निराशेतून कृतार्थतेकडे झोके घेण्याचा उपक्रम गेली तेरा वर्षं सतत जारी होता. ...

हॉकी तसं माझ्या रक्तातच होतं. माझे वडील अहमदशेरखान, उच्च दर्जाचे हॉकीपटू होते. १९३६ साली बर्लिन ऑलिंपिक्समध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या ध्यानचंदच्या संघात त्यांचा समावेश होता ... पुढे बऱ्याच वर्षांनी ध्यानचंदचा मुलगा अशोककुमार आणि मी भारतातर्फे एकत्र खेळण्याचा योग जुळून आला.

माझ्या वडलांनी त्यांचं आयुष्य हॉकीलाच वाहिलं होतं. माझे आजोबा मला नेहमी म्हणत, ' अरे, तुझ्या वडलांना अगदी तुझ्यासारखंच हॉकीचं वेड ! दिवस-रात्र त्याच विचारात दंग असायचे... तुझ्या आईकडूनही त्यांनी वचन घेतलं होतं की, जर मुलगा झाला तर त्याला हॉकीपटूच करायचं. '

माझ्या वयाच्या तेराव्या वर्षी माझे वडील अल्लाला प्यारे झाले; पण तोपर्यंत हॉकीचं बीज माझ्या मनात रुजवण्याचं कार्य त्यांनी पार पाडलं होतं...नुसतं बीच रुजवलं नव्हतं; त्याला खतपाणी घालण्याचंही काम चालू होतं. ते मला वेगवेगळ्या हॉकीच्या सामन्यांना घेऊन जायचे. महान हॉकीपटूंच्या खेळाचं कसं सूक्ष्म अवलोकन करायचं ते समजावून सांगायचे ... मी हॉकी खेळायला जातोय, म्हटल्यावर त्यांनी मला कधीही अडवलेलं आठवत नाही. हं, एक गोष्ट मात्र खरी की, त्यांनी मला कुठल्याही क्लबमध्ये पाठवलं नाही. क्लबचा, तिथल्या वातावरणाचा त्यांना भयंकर तिटकारा होता. तिथे मला वाईट सवयी लागतील आणि ' सेक्स 'च्या जाळ्यात मी गुरफटला जाईन अशी त्यांना कायम भीती वाटायची. ' खेळाडू सेक्सच्या पाठी लागला की, तो संपला ! ' हे तत्त्व त्यांनी अगदी लहानपणीच माझ्या मनावर बिंबवलं ...

आमच्या घराजवळच्या मशिदीतून पहाटे बांग ऐकू यायला लागली की, आमचा दिवस सुरू व्हायचा. मी आणि वडील ' जॉगिंग ' साठी बाहेर पडायचो ... संध्याकाळी सैदिया शाळेच्या मैदानावर प्रत्यक्ष हॉकीच्या किचकट कलेचे पाठ व्हायचे ... ड्रिबलिंग म्हणजे काय, डॉजिंग कसं करायचं, टॅपिंग, पुशिंग, ... हॉकीची अवघड कला मला इथंच वडलांनी सोपी करून सांगितली. गोल करण्यापेक्षा गोल वाचवणं केव्हढं महत्त्वाचं आहे, हे वडलांनी पटवून दिलं ... कदाचित त्यामुळंच मी पुढे ' फॉरवर्ड ' ऐवजी ' फुलबॅक ' म्हणून खेळायला लागलो.

ह्याच मैदानावर मी इनाम उर रेहमानला पाहिला. माझे वडील नेहमी म्हणत, ' त्या इनामचा खेळ बारकाईनं बघ ! एखाद्या मशिनसारखा खेळतो. काही वर्षांतच तो जगातला सर्वश्रेष्ठ ' लेफ्ट इन ' होईल ?...' पण माझे वडील चुकले ... साफ चुकले ! जगाने फक्त पाकिस्तानच्या शहनाझ शेखचं नाव ऐकलंय. इनाम जगाच्या खिजगणतीतही नाही ! हॉकीतल्या गलिच्छ राजकारणाने, माझ्या वडलांना द्रष्टा न ठरवण्याचा जणु चंगच बांधला होता ... दळभद्री राजकारणाने त्यांच्या असाधारण गुणवत्तेचं फार लवकर दफन करून टाकलं. ह्याच इनामने मला माझी पहिली ' हॉकीस्टिक दिली होती ... आज ती मोडलेल्या अवस्थेत आहे; पण तरीही मला प्राणाहून प्रिय वाटते !...

आजच्या भोपाळात पाऊस सुरू झाला की, हॉकी खेळणं अशक्य होतं ... मग माझे वडील मला ' फिशिंगला घेऊन जायचे ... दिवसभर आम्ही गळ टाकून बसत असू ... ह्या फिशिंगचा मला भयंकर कंटाळा यायचा. कधी एकदा पाऊस संपतो आणि पुन्हा हॉकी खेळायला मिळतं ह्याची मी वाट पहात असे ... मग वडील माझी समजूत घालायचे, ' हे बघ, फिशिंगची तुला चांगलं हॉकी खेळायला मदत होईल.' आजही मला त्यांचे शब्द ऐकू येतायत –" तो गळ पाण्यात वर–खाली होतोय बघ. तो हॉकीच्या चेंडूसारखाच आहे असं समज आणि त्याच्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित कर ... तुझी एकाग्रता वाढायला त्यामुळे मदत होईल ! '

## मी फॉरवर्ड झालो !

मला हॉकीपटू बनवण्यासाठी माझे वडील जिवापाड मेहनत घेत असले तरी आमच्या शाळेच्या संघासाठी त्यांनी माझी कधीच निवड केली नाही ... मी जेव्हा जेव्हा वडलांना त्याबद्दल विचारायचो तेव्हा तेव्हा एकच उत्तर द्यायचे, ' तुला अजून बरंच काही शिकायचंय. 'मी अक्षरशः वैतागायचो ... मला काहीच कळत नसे ... जी मुलं माझ्या अर्ध्या लायकीचीही नाहीत ती शाळेच्या संघातून मिरवायची आणि मी मात्र हताशपणे दुरून त्यांचा खेळ पहात बसायचो. आज मी जेव्हा त्या गोष्टीचा विचार करतो तेव्हा मला वडलांचं वागणं पटायला लागतं. माझे वडीलच आमच्या शाळेच्या संघाचे कोच असल्यामुळे ' वशिलेबाजीचा ' आरोप होईल म्हणून वडलांनी कधीही माझी निवड केली नाही !

त्याच काळात एक भयानक प्रसंग माझ्यावर गुदरला ... आजही

आठवण झाली की, अंगावर शहारे येतात. एके दिवशी संध्याकाळी हॉकी खेळताना अचानक माझ्या पायाचे सांधे दुखायला लागले ... क्षणभर काय होतंय हेच मला कळेना ... नीट उभं रहाणंही जमत नव्हतं. हवा गेलेल्या टायरसारखी माझी अवस्था झाली.

माझ्या छोटया शरीराचं वजनही माझ्या पायांना पेलवेनासं झालं. मी जमिनीवर कोसळलो. सुदैवाने माझे सादतचाचा जवळ होते. त्यांनी मला उचललं आणि घरी आणलं. त्यानंतर डॉक्टर आले आणि त्यांच्याबरोबरच कधीही संपणार नाही असं वाटणाऱ्या औषधांची मालिका. त्यात आमच्या घरात अठरा विश्व दारिद्रच ! माझे वडील एका साध्या शाळेतले हॉकीचे शिक्षक ! त्यांची आमदनी काय असणार ? जिकडे संसाराचा गाडा ओढणं कठीण झालं होतं तिकडे माझ्या आजारपणासाठी लागणारी महागडी औषधं ते आणणार तरी कुठून ? सुदैवाने माझ्या वडलांच्या एका हकीम मित्राने माझी अवस्था पाहिली आणि त्याने औषधोपचार सुरू केले. त्याच्या औषधाने मात्र हळूहळू गुण यायला लागला.

तो आजारपणाचा काळ मात्र मी उभ्या आयुष्यात विसरणार नाही ! गादीवर पडल्या पडल्या मी भावी आयुष्याची स्वप्नं पहायचो. ह्या स्वप्नात मी स्वतःला माझ्या वडलांसारखा मोठा हॉकीपटू झालेला पहात असे. कित्येक ऑलिंपिक–पदकांचा मानकरी झालेला पहात असे; पण संध्याकाळ झाली की हीच स्वप्नं मला खायला उठत ! माझे सवंगडी बाहेर खेळत असत आणि मी अंथरुणावर तळमळत असे. पुन्हा नीट उभं रहाता येणार नाही वगैरे अभद्र विचारही मनात येऊन जात. डोळ्यात पाणी आणून कित्येक वेळा मी देवाला करुणा भाकलीय. 'मला लौकर बरं कर. मला पुन्हा हॉकी खेळू दे !' माझ्या डोळयातले अश्रू पाहिले की माझ्या सादतचाचांनाही भडभडून येई. मग ते मला सायकलच्या दांडीवर बसवून मैदानावर फेरफटका मारायला घेऊन जात. हळूहळू त्यांच्याच सायकलच्या आधाराने मी उभं रहायला शिकलो आणि मला आजही आठवतंय, ज्या दिवशी मी पुन्हा हॉकी खेळायला लागलो, त्या दिवशी मैदानातून अक्षरशः धावत घरी येऊन देवाचे आभार मानले होते !

## छे ! मला खरंच वाटलं नाही

१९६६ साली माझे वडील आजारी पडले आणि त्यांना हमिदिया हॉस्पिटलात अॅडमिट केलं आणि बरोबर त्याच वेळी ऑल इंडिया स्कूल हॉकीच्या शिबिरासाठी मला बोलावणं आलं. ते शिबिर भोपाळलाच होतं; पण तरीही शिबिराला जायची माझी इच्छा नव्हती. वडलांच्या बिछान्याशेजारी बसून रहावं असं सतत वाटायचं; पण ज्या वेळी माझ्या वडलांना शिबिरासंबंधी कळलं तेव्हा त्यांनी मला स्पष्ट बजावलं, 'तू माझ्याजवळ बसून राहिलास म्हणजे तुला माझ्याबद्दल प्रेम आहे असं मी मानणार नाही. उलट तू शिबिराला गेलास, तर मला जास्त आनंद होईल. तुझं माझ्यावर प्रेम आहे असं समजेन !'

माझी 'फॉरवर्ड' म्हणून ऑल इंडिया हॉकी संघासाठी निवड झाली. एक जमाना गाजवलेले रूपसिंग आमचे कोच होते. त्यांनी वडलांची हॉस्पिटलमध्ये भेट घेतली आणि माझ्या परफॉर्मन्सचं कौतुक केलं. माझ्या वडलांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्यानंतर काही दिवसांनीच वडील आम्हाला सोडून गेले ! जणू काही माझी करिअर व्यवस्थित सुरू होण्याचीच वाट पहात होते आणि



मॅच जिंकणार की हरणार ?

मार्गाला लागलोय हे पाहिल्यावर त्यांनी डोळे मिटले !

त्यानंतर बरोबर तीन वर्षांनी विभागीय संघाची (State Team) निवड करण्यासाठी जे शिबिर भरवलं होतं, त्याचं मला बोलावणं आलं. त्या आमच्या संघाचा कोच आज जिवंत नाही; पण तोही आंतरराष्ट्रीय दर्जाचा होता आणि मुख्य म्हणजे माझ्या वडलांचा मित्र होता !

'खेळ संपल्यावर रोज संध्याकाळी मला इब्राहमपुरात भेटत जा !' असं शिबिराच्या पहिल्याच दिवशी त्याने मला बजावलं. आमच्याकडे कोचना 'उस्ताद' म्हणण्याची पद्धत आहे. आमच्या भोपाळात संध्याकाळी खेळ वगैरे संपला की, ह्या इब्राहमपुरात येऊन उस्तादना भेटायचं ही पद्धतच होती. तिथे चहाचे घोट घेता घेता रोजच्या खेळाच्या विश्लेषणापासून अगदी खेळात शिरलेल्या राजकारणापर्यंत सर्व विषयांची चर्चा होत असे. जो कुणी ह्या चर्चासदरात नसे त्याची निवड होणंही कठीण असे.

तसंच अशीही एक वदंता होती की, जो खेळाडू कोचबरोबर झोपत नाही त्याने कितीही चांगला परफॉर्मन्स दाखवला तरी निवड होणं कठीण होतं !

माझा खरंच ह्या गोष्टीवर विश्वास नव्हता. माझे वडीलही कोच होते. त्यांचा सर्वजण आदर करायचे आणि माझ्या वडलांचा मित्र माझ्याबद्दल अशी विकृत अपेक्षा बाळगेल असं मला स्वप्नातसुद्धा वाटणं शक्य नव्हतं !

अंतिम निवडीच्या आदल्या दिवशी त्या कोचने मला सांगितलं, 'उद्या माझ्या घरी ये आणि तुझा 'जर्सी' घेऊन जा !' ज्याची संघात निवड होते, त्याला प्रांताच्या नावाचा जर्सी मिळण्याची पद्धत आहे. मला आनंद झाला. निवड झाल्याबद्दल कुणाला आनंद होणार नाही ? पण हा आनंद लवकरच मावळला. कारण जवळजवळ प्रत्येकाने मला सांगितलं, 'ज्या अर्थी जर्सी घेण्यासाठी त्याने तुला घरी बोलावलंय, त्या अर्थी त्याच्या मनात काळंबेरं आहे. तो तुला खाटल्यावर घेतल्याशिवाय रहाणार नाही आणि लक्षात ठेव तू त्याला नकार दिलास, तर तुझी निवड होणं अशक्य आहे !'

त्या दिवशी रात्री मला झोप लागणं शक्यच नव्हतं. नुसता अंथरुणात तळमळत पडलो होतो. मला माझ्या वडलांचं वागणं आठ-



अम्मानं दिलेला 'तावीज'

वायला लागलं. वडील मला क्लबमध्ये खेळायला का पाठवत नव्हते त्याचा उलगडा व्हायला लागला.

आमचं भोपाळ तसं धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेलं शहर आहे. तिथे अजूनही स्त्रियांसाठी पडदा–पद्धत आहे. मोठ्या शहराप्रमाणे मुलं–मुली इथं मिसळत नाहीत...त्यामुळं तारुण्यसुलभ भावनांना असं विकृत स्वरूप येतं. चाणाक्ष आई–वडील आपल्या मुलांनाही त्यांच्यापेक्षा थोड्या मोठ्या वयाच्या मुलांत मिसळू देत नाहीत. समलिंगी संभोगाची वाईट सवय आपल्या चिरंजिवांना जडेल अशी त्यांना नेहमी भीती वाटत असते. जी मंडळी समलिंगी संभोगाला चटावली आहेत, त्यांनी त्यामुळं हॉकीक्लब काढायची शक्कल लढवली !

असो. तर मी काय सांगत होतो ? हं, त्या दिवशीची रात्र मी अक्षरशः गादीवर तळमळत काढली. बरं, माझी अशी पंचाईत झाली होती की, मी आईलाही काही सांगू शकत नव्हतो.

शेवटी पहाटेपर्यंत मी एक निर्णय घेतला! म्हटलं जायचं, बघू या तर काय होतं ! सायकलवर टांग मारली आणि त्या कोचच्या घरी जाऊन धडकलो. छातीत अर्थात धडधडत होतंच. त्याने मला जर्सी दिला. माझ्या गुणवत्तेचं कौतुक केलं आणि जवळ घेतलं..त्याचे जाड ओठ त्यानं माझ्या गालावर टेकवले...पण बस तेव्हढंच...पुढं दुसरं विकृत काही घडलं नाही...माझा आनंद गगनात मावेनासा झाला. माझी विभागीय संघासाठी निवड झाली होती. 'ऑलिंपिक्स' जे मी स्वप्न पहात होतो, त्या दिशेनं पहिलं पाऊल तर व्यवस्थित पडलं होतं.

काही दिवसांतच आम्ही एर्नाकुलमला राष्ट्रीय स्पर्धा खेळण्यासाठी गेलो. तिथे यशाचा वरदहस्त आमच्या डोक्यावर होताच ! पहिले दोन सामने आम्ही आरामात जिंकले आणि उपांत्य फेरीत येऊन पोहोचलो आणि तिथंच माझी साडेसाती सुरू झाली !

उपांत्य फेरीच्या सामन्याबद्दल विचार करत बसलो होतो, इतक्यात शहीदनूर मला म्हणाला, 'तुला कोचनं बोलावलंय.' (हा शहीदनूर पुढं भोपाळच्या संघाचा कर्णधार झाला. भारतातर्फेही तो नंतर खेळला.) खरं तर माझ्या गालाचं त्या कोचनं चुंबन घेतल्यापासून मी त्याच्यापासून दूरच रहात असे; पण आता बोलावलंय म्हटल्यावर जाणं भागच होतं.

मी त्याच्या रूमवर गेलो. त्यानं मला आपादमस्तक न्याहाळलं आणि अत्यंत शांतपणे म्हणाला, 'आज रात्री तुला माझ्याबरोबर झोपावं लागेल आणि त्यातच तुझं हीत आहे. तू नकार दिलास तर उद्याच्या सामन्यात तू खेळू शकत नाहीस आणि लक्षात ठेव फक्त उद्याच्याच नाही, तर जोपर्यंत मी भोपाळच्या संघाचा कोच आहे; तोपर्यंत तुला खेळता येणार नाही !'

रागानं माझं शरीर थरथरायला लागलं. कानशिलं तापली. तळपायाची आग मस्तकात गेली. ऑलिंपियन बनण्याच्या माझ्या स्वप्नाचे तुकडे तुकडे होताना दिसले. मी मोठा हॉकीपटू व्हावं म्हणून वडील गेल्यावर, दिवस–रात्र राबणाऱ्या माझ्या अम्माचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर आला. मी लहानपणी सांधेदुखीशी लढत दिली होती; पण त्या पंचावन्न वर्षांच्या टक्कल पडलेल्या, काळ्याकुट्ट कोचच्या वासना शमवायची ताकद माझ्याकडे नव्हती. मला त्या कोचची शिसारी आली आणि मी तडक रूममधून बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी संघात अर्थातच माझा समावेश नव्हता. ती मॅच संपल्यावर मी कोचला त्याच्या खोलीत गाठलं.

'तू माझ्या वडिलांचा मित्र होतास!' मी जवळजवळ त्याच्या अंगावर ओरडलोच !

'पण मी तुला किंमत देत नाही. यू आर ए बास्टर्ड ! मसणात गेलास तू आणि मसणात गेली हॉकी !'

मी माझी हॉकीस्टिक तोडली आणि त्याच्या अंगावर फेकून मारली.

आणि त्या दिवशी प्रतिज्ञा केली, 'पुन्हा त्या हॉकीस्टिकला कधी शिवणार नाही !'

राष्ट्रीय स्पर्धा संपल्यावर घराकडे परतायला मन होत नव्हतं. कुठल्या तोंडानं मी अम्मासमोर जाणार ? पण जाणं तर भागच होतं.

ग्रॅन्डट्रंक एक्सप्रेसच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात माझ्या छोट्याशा वळकटीवर मी शरीराचं मुटकुळं करून बसलो होतो. माझे इतर सायिदार तिथंच जुगाराचा अड्डा मांडून बसले होते. आरडाओरडी, हास्यविनोद जोरदार चालले होते. अधूनमधून मला टोमणे मारण्याचं कामही सुरू होतंच; पण मी त्यांच्याकडे लक्ष दिलं नाही. भोपाळला पोचल्यावर त्यांचा–माझा काय संबंध उरणार होता ? हॉकीशी काडीमोड घ्यायचा माझा विचार पक्का झाला होता. खिडकीबाहेर पहात मी माझा फक्त भूतकाळ आठवत होतो.

## तू फक्त खेळायचंस !

१९६६ ला वडील गेल्यानंतर मला माझ्या अम्मानेच वाढवलं. तिनंच स्वतःला संसाराच्या गाड्याला जुंपून घेतलं. दारिद्र्य वडील असतानाच होतं; पण ते गेल्यावर दारिद्र्याचे चटके जास्त तीव्रपणे जाणवायला लागले.

आमचं स्वतःचं छोटसं घर होतं; पण दारिद्र्याच्या खुणा त्या घरावर जागोजागी दिसायच्या. मातीच्या भिंती आणि तुटलेल्या कौलांचं छप्पर, हे आमच्या घराचं ऐश्वर्य ! पावसाळ्यात तर भयंकर हाल व्हायचे ! फुटलेल्या कौलांतून टपाटप पाणी पडायचं. माझ्या

अम्माला स्वयंपाक करणं कठीण होऊन जायचं. जळणासाठी जमवलेली सर्व लाकडं ओलीचिंब व्हायची. चूल पेटवताना धुरामुळे अक्षरशः तिच्या डोळ्यांत आसवं उभी रहायची !

पुन्हा झोपण्याचीही पंचाईतच ! सतत गाद्या इकडून तिकडे सरकवल्या जायच्या. कदाचित म्हणून असेल पाऊस पडायला लागला की आजही माझ्या अंगावर काटा उभा रहातो. पावसाची घृणा वाटते.

त्या काळात महागाईही भलतीच कडाडली होती ... एक मण गव्हासाठी २० रुपये मोजावे लागायचे ! एक रुपया टाकून एक शेर दूध घ्यावं लागायचं ... सुदैवाने गावाला आमची छोटीशी जमीन असल्यामुळं गहू तिथून यायचा ... पण दुधासाठी पैसे द्यावेच लागायचे ... त्या दुधाची उधारी कधीही संपलेली मला आठवत नाही ! ...

दिवसभर माझी अम्मा कष्ट उपसायची ... फक्त एकच ध्येय ठेवून. मुलाला ऑलिंपिक हॉकीपटू बनवायचं ! तशी ती भयंकर श्रद्धाळू ! देवावर पूर्ण विश्वास ! दिवसातून पाच वेळा नमाज पढायची ... रात्री माझ्या बहिणी आणि मी झोपलो की, तिचं शिवणकाम सुरू व्हायचं. तिला शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या कृपेने मिळणारं शिवणकाम हा आमच्या घरी चूल पेटत ठेवण्याचा एकमेव मार्ग होता. त्या वेळी आमच्या घरात विजेचे दिवे नव्हते. कंदिलाच्या मिणमिणत्या दिव्यात बिचारी शिवत बसायची. कधीकधी झोपेचं सोंग घेऊन मी तिच्या निर्विकार चेहऱ्याकडे पहात बसायचो ... मला वाईट वाटायचं; पण मी तिला काहीच मदत करू शकत नव्हतो ... आणि मी तिला मदत केलेली आवडतही नसे. एकदा ईदच्या सुमारास घराच्या भिंतींना चुना फासण्याचं काम तिने काढलं. त्या दिवशी मी ठरवलं आज खेळायला जायचं नाही. अम्माला मदत करायची. मी तिला तसं फक्त बोललो; पण ती एव्हढी तडकली की, झाडूसारखा ब्रश घेऊन तिनं मला बदडायला सुरू केलं !'

'तू इथे काम करणार नाहीस.' तिने आवाज चढवून सांगितलं.

'तू फक्त हॉकी खेळणार ... जोपर्यंत माझ्या हाडात जान आहे, तोपर्यंत तू फक्त हॉकी खेळणार आणि मी राबणार ... मला तुला महान हॉकीपटू झालेलं पहायचंय. तुझ्या वडलांपेक्षाही मोठा ! उद्या आपल्या कुटुंबातल्या कुणीही म्हणता कामा नये की, माझ्यामुळं तुला हॉकीपटू होता आलं नाही !'...

... भोपाळ स्टेशनच्या अलीकडच्या सिग्नलला आमची गाडी थांबली आणि माझी विचाराची तंद्री तुटली. गाडीने स्टेशन गाठायची मी वाट पाहिली नाही. माझी वळकटी उचलली आणि तडक खाली उतरलो ... गाडी पुन्हा सुरू व्हायच्या अगोदर मी टांगा पकडून घराच्या वाटेलाही लागलो होतो ...

टांगा आमच्या सैदिया शाळेच्या रस्त्यावर आला आणि मी पुन्हा एकदा बाळपणाच्या आठवणीत हरवलो ...

भोपाळच्या छोट्या, चिंचोळ्या गल्ल्या आणि सैदिया शाळेच्या मैदानात माझं बाळपण गेलं होतं. माझ्या वयाच्या मुलांना जमवून तासन्तास हॉकी खेळण्यात घालवले होते ... माझ्याकडे निदान चांगली हॉकीस्टिक तरी होती; पण अशी कित्येक पोरं आमच्यात होती, ज्यांनी झाडाच्या फांद्या कापून हॉकीस्टिक तयार केल्या होत्या ... चेंडूही दगड कापडात गुंडाळून बनवलेला ... खास 'भोपाळमेड !'

हॉकी आणि भोपाळ ह्यांचं गेले कित्येक वर्षांचं अतूट नातं आहे. भोपाळच्या चिंचोळ्या गल्लीत तुम्हाला कधीही लहान लहान मुलं हॉकी खेळताना दिसतील. ह्या गल्ल्या नुसत्या अरुंद नाहीत तर त्यांच्या बाजूला उघडी गटारंही आहेत ... ही गटारं चुकवत मुलं हॉकी खेळत असतात. जागा अरुंद असल्यामुळं दूरवर चेंडू फटकावता येत नाही. ड्रिबलिंग करत शॉर्ट पासिंग करावं लागतं ... ड्रिबलिंग आणि शॉर्टपासिंग हे भारतीय हॉकीचं शक्तिस्थान मानलं जात होतं ... मी अभिमानाने सांगतो की, भोपाळनं ही कला साऱ्या भारताला शिकवली ! ...

पण एव्हढं असूनही भारतीय हॉकीमध्ये भोपाळच्या खेळाडूंना कधी मानाचं स्थान मिळालंच नाही ... त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाकडे मान वर करून पाहण्याची फुरसदच हॉकीच्या सत्ताधाऱ्यांना मिळाली नाही ... बिचारी आई-बापांची पोरं, त्यांना दाद कोण देणार ? त्यातली कित्येक पोरं पोटाची खळगी भरण्यासाठी विड्या वळायची. काही स्टेशनवर सामोसे विकायची. काही पानाच्या गादीवर बसायची; पण संध्याकाळ झाली की, हातातलं काम टाकून हॉकी खेळायला धावायची ... हॉकी त्यांच्या रक्तातच होती, तशी ती माझ्याही रक्तात आहे; पण आता रक्तातल्या हॉकीच्या पेशी नामशेष करायची मी प्रतिज्ञा केलीय ! ...

माझा टांगा आमच्या घराजवळच्या मशिदीपाशी येऊन थांबला. 'अल्ला वगैरे सब झूठ है' असं वाटायला लागलं ... माझी गुणवत्ता, माझी अल्लावरची श्रद्धा काहीच माझ्या उपयोगी पडलं नव्हतं ...

मी टांगेवाल्याला पैसे दिले आणि घरात शिरलो ... बाहेरच्या अंगणात माझी आई नमाज पढत होती ... बहुधा ती अल्लाकडे माझ्या सुखाची, दैदीप्यमान करिअरची वगैरे याचना करत असावी; पण त्या क्षणी मला तिच्या श्रद्धेचही तिरस्कार वाटला! ... (क्रमशः)




# आसाम

पृष्ठ ६ वरून

नये. मुख्यनिवडणुक अधिकाऱ्याऐवजी निवडणूक आयुक्त प्रत्येक राज्यात नेमावा अशी शिफारस मुख्य निवडणूकआयुक्त त्रिवेदींनी पूर्वी केलेली आहे, ती अंमलात आणायला हवी; पण आसाम निवडणुकांबाबत त्रिवेदींची भूमिकासुद्धा योग्य नव्हती. निवडणूक-प्रकिया एकदा सुरू झाल्यावर ती थांबविता येत नाही. घटनेप्रमाणे निवडणुका घ्यायला हव्यात. त्या घेतल्या नाहीत तर घटनात्मक पोकळी निर्माण होईल. अशी पोकळी निर्माण करण्यात निवडणूक आयोग सहभागी होणार नाही. निवडणुका रद्द करायच्या असतील तर आता सरकारनेच त्यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले. शांत व खुल्या वातावरणात निवडणुका घेणे एवढेच निवडणूक-आयोगाचे काम. घटनात्मक पोकळीचा विचार त्यांनी करण्याचे कारण नाही. त्यातून मार्ग कसा काढायचा हे सरकारने पाहिले असते. निवडणुकांना योग्य वातावरण नसल्याने त्या रद्द करण्याचा निर्णय निवडणूक आयोगानेच घ्यावयास हवा होता. त्यात त्यांच्या स्वायत्ततेची कसोटी होती.

## केंद्राची भूमिका

सबंध निवडणुका रद्द करता येणार नाहीत. मतदानाचे दिवशी मतदानकेंद्रात हिंसाचार घडले, मतदारांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही तर तेवढ्या केंद्रांपुरत्या निवडणुका स्थगित करून तेथे फेरमतदान आयोग घेऊ शकते असा युक्तिवाद आयोगातर्फे करण्यात आला व या निवडणुकात आयोगाने तसे केलेलेही आहे; पण मतदानाचे दिवसापर्यंत वाट न पाहता निवडणुकांना योग्य वातावरण नाही असे आढळल्यास त्यापूर्वीसुद्धा निवडणूक आयोग निवडणुका रद्द करू शकते. निवडणूकप्रक्रियेस सुरुवात निवडणूक तारखा जाहीर झाल्यानंतर मतदारयाद्यांचे दुरुस्तीपासून होते. या सर्व प्रक्रिया योग्य पद्धतीने पार पडल्या नसतील तर त्या कारणासाठीही निवडणुका रद्द करायला हव्यात.

आसामच्या निवडणुकांत तर मतदारयाद्यांचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा होता. परकीय नागरिकांच्या प्रश्नावरील आंदोलन तर त्यासाठीच मुख्यत: झाले. मतदारयाद्यांतून परकीय नागरिकांची नावे काढून टाकली पाहिजेत ही आंदोलनाची मुख्य मागणी होती आणि ही मागणी काही आजच नव्याने केली होती असे नाही. १९८० च्या लोकसभा निवडणुकांचे वेळीच त्यांनी ही मागणी केली होती आणि त्यासाठी एवढे जबरदस्त आंदोलन उभारले होते की, लोकसभेच्या चौदा मतदारसंघांपैकी फक्त दोनच मतदारसंघांत निवडणुका झाल्या! बाकी मतदारसंघात उमेदवारच उभे नसल्याने निवडणुका घेताच आल्या नाहीत. आसामच्या या प्रभावी जनमताची दखल घेऊन सरकारने हा प्रश्न लौकर सोडवायला हवा होता. तीन वर्षांत वाटाघाटीच्या अनेक फेऱ्या झाल्या; पण या प्रश्नावर तोड काही निघू शकली नाही. सरकारने प्रथमपासूनच या प्रश्नावर योग्य भूमिका न घेतल्याने ही परिस्थिती निर्माण झाली.

## परकीय कोण ?

फाळणीनंतर पूर्वपाकिस्तानातून आसाममध्ये मोठ्या प्रमाणावर निर्वासित आले. बांगला देश युद्धानंतरही निर्वासितांचे लोंढे आले आणि तेथे आर्थिक परिस्थिती बिकट झाली. बेकारी वाढली की निर्वासित अजूनही मधूनमधून येत असतातच. या निर्वासितांना आसाममध्ये आसरा दिला गेला एवढेच नव्हे तर त्यांच्यापैकी अनेक जण तेथे स्थायिक झाले ! त्यांनी नागरिकत्वाचे हक्क मिळविले, मतदारयादीत त्यांची नावे समाविष्ट झाली. आसाममध्ये मूळचे आसामी अल्पसंख्य होऊन सरकार, उद्योगधंदे, व्यापार, समाजजीवन यावर बिगरआसमींचाच पगडा वाढण्याची भीती आसामींना वाटू लागली. यातूनच परकीय नागरिक विरोधी आंदोलन उभे राहिले. परकीय कोण हे निश्चित करणे, त्यांची नावे मतदारयादीतून काढून टाकणे आणि त्यांना आसामबाहेर पाठविणे, असे या प्रश्नाचे तीन टप्पे आहेत. यातल्या पहिल्या टप्प्यापाशीच वाटाघाटी अडल्या. परकीय कोण हे ठरविताना बिगरआसामी ते सारे परकीय असे आसामी नेते मानीत नाहीत हे प्रथम स्पष्ट केले पाहिजे. बंगाल-बिहारमधूनही आसाममध्ये लोक आले आहेत. ते परकीय नव्हेत. भारताबाहेरून आले ते परकीय. यात मुख्यत: पाकिस्तानी किंवा बांगला देशीयच आहेत.

परकीय कोण हे ठरविण्यासाठी आधारवर्ष कोणते मानावे हा वादाचा मुद्दा होता. १९५१ हे आधारवर्ष मानावे असा आसामी नेत्यांचा आग्रह, तर सरकार १९७१ च्या मागे येण्यास तयार नाही. १९६१ हे आधारवर्ष मानण्यास आसामी नेते तयार झाले; पण सरकार काही आपली भूमिका सोडण्यास तयार होईना ! आधारवर्षाबाबत तोड निघत नाही म्हणून संबंध प्रश्नच अनिर्णित ठेवणे योग्य नव्हते. १९७१ नंतर जे आसाममध्ये आले त्यांची नावे तरी सरकारने मतदारयादीतून का काढली नाहीत ? सरकारने तसे केले असते तर सरकार या प्रश्नाबाबत खरोखरच काही करू इच्छिते याबद्दल आसामी नेत्यांची खात्री पटली असती. १९८३ च्या विधानसभा–निवडणुका १९७९ चीच मतदारयादी प्रमाण मानून झाल्या. १९७१ नंतरच्या परकीयांची नावे त्यातून काढली असती तरी आसामी नेत्यांचे काही प्रमाणात समाधान झाले असते; पण सरकारने परकीय तर काढले नाहीतच; पण १९७९ नंतर जे जे मतदानाचे हक्कास पात्र झाले त्यांचीही नावे यादीत घालून याद्या अद्ययावत केल्या नाहीत. निवडणूक आयोगाने त्याबद्दल आग्रह धरायला हवा होता. परकीयांचा प्रश्न अनिर्णित म्हणून बाजूला ठेवला तरी नव्या मतदारांचा समावेश यादीत करणे आवश्यकच होते. अद्ययावत याद्या तयार झाल्याशिवाय निवडणुका घेता येणार नाहीत असे आयोगानेच सरकारला स्पष्ट सांगायला हवे होते. आयोगाने याबाबत आपली जबाबदारी पार पाडलेली नाही !

## शस्त्र आणि शक्ती

आम्हाला या निवडणुका नकोत, आम्ही त्या मानीत नाही असे आसामी जनतेने आपल्या प्रभावी बहिष्काराने या निवडणुकात निर्णायकपणे दाखवून दिले. एकूण मतदानाचे अधिकृत आकडे अजून उपलब्ध झालेले नाहीत; पण सरासरी मतदान २० ते २५ टक्क्यांपेक्षा अधिक झाले असेल असे वाटत

नाही. बिगरआसामींची वस्ती असलेल्या काचार जिल्ह्यातसुद्धा ४० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालेले नाही आणि काही मतदारसंघात तर ते एक टक्क्यापेक्षाही कमी होते. मतदानाची मतदारसंघवार टक्केवारी सरकारने प्रसिद्ध करावी म्हणजे बहिष्कार किती प्रभावी होता याचे बोलके चित्र त्यातून उभे राहील. केवळ कल्पना येण्यासाठी एका मतदारसंघातले आकडे येथे देतो. धेमजी मतदारसंघात मतदार ९०,४४१ आहेत. तेथे मतदान फक्त २८८ झाले आणि इंदिरा काँग्रेसचा उमेदवार २३७ मते मिळवून विजयी झाला! हे कसले लोकप्रतिनिधी? लोकप्रतिनिधी म्हणवून घेण्याची त्यांना लाज वाटायला हवी!

या अनुषंगाने आपल्या निवडणूकपद्धतीतील एका महत्त्वाच्या उणीवेकडे मला लक्ष वेधावयाचे आहे. बहुसंख्य मतदारांच्या पाठिंब्याने जो विजयी झाला तो खरा लोकप्रतिनिधी. त्यासाठी दोन निकष आपण लावायला हवेत. त्यांपैकी एक म्हणजे मतदान ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाले पाहिजे आणि दुसरा विजयी उमेदवाराला झालेल्या मतदानाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते पडलेली असली पाहिजेत. या दोन्ही निकषांना उतरेल तोच विजयी उमेदवार आणि जेथे या निकषांपेक्षा कमी मतदान असेल तेथील निवडणूक बाद ठरवायला हवी. हे निकष लावले तर आसामची ही सर्वच निवडणूक बाद ठरेल! आपल्याकडे बहुसंख्य मतदार निरक्षर असले तरीही मतदानहक्काबद्दलची त्यांची जागरूकता वाढलेली आहे. बहुसंख्य मतदारसंघात मतदान सर्वसाधारणपणे पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त होतेच; फार तर राखीव मतदारसंघाच्या बाबतीत किमान मतदानाची अट ५० टक्के न ठेवता अजून काही वर्षे ३० ते ३५ टक्के ठेवावी. आपल्या घटनेने सर्व प्रौढांना मताधिकार दिला जागरूकपणे त्यांनी तो बजावला पाहिजे. मतदान जास्तीत जास्त झाले पाहिजे हे जसे जिवंत लोकशाहीचे लक्षण तसेच एखादी निवडणूक अन्यायाने लादली गेली असेल तर त्याबद्दलचा आपला विरोध प्रभावीपणे नोंदविण्यासाठी बहिष्काराचा हक्कही जागरूक मतदारांनी तेवढ्याच जागरूकपणे बजावला पाहिजे. आसामच्या जनतेने तेच या वेळी केले. बहिष्कार हे केवढे प्रभावी शस्त्र आहे हे या निवडणुकीने दाखवून दिले. लोकशाहीत मतपेटी ही मोठी शक्ती आहे. लोकांच्या हातचं हे प्रभावी शस्त्र आहे. या शस्त्राने नको असलेली सरकारे शांततेच्या मार्गाने बदलता येतात. १९७७, १९८० आणि १९८३ च्या निवडणुकांनी हे सिद्ध केले आहे. मग मतपेटीवरील बहिष्काराचे समर्थन तुम्ही कसे करता असा प्रश्न या संदर्भात विचारला जाईल. मतपेटी ही मोठी शक्ती व शस्त्र आहे हे मान्य; पण केव्हा? मतदारयाद्या निर्दोष व अद्ययावत असतील तेव्हा. ज्यांची नावे मतदारयादीतून काढून टाकायला हवीत ती काढली गेली नाहीत आणि ज्यांची घालायला हवीत ती घातली गेली नाहीत अशा स्थितीत मतपेटीतून खरे लोकमत कसे व्यक्त होणार? मतपेटी हे निवडणुकीचे प्रतीक. आसामी जनतेला या निवडणुकाच मान्य नव्हत्या, ते दर्शविण्यासाठी तिने मतपेटीवर बहिष्कार टाकला आणि खरे लोकमत मतपेटीत नसून मतपेटीबाहेर आहे हे सिद्ध केले!

आसामी जनतेचा मतपेटीवर आणि व्यापक अर्थाने लोकशाहीवरच विश्वास राहिलेला नाही असा या बहिष्काराचा अर्थ लावणे चुकीचे होईल. आसामची जनता लोकशाहीवादी आहे. मतपेटीवर तिचा विश्वास आहे; पण केंद्रसरकारने लोकांच्या इच्छेविरुद्ध लादलेल्या या निवडणुका म्हणजे कसा फार्स आहे हे जनतेने या बहिष्काराने सिद्ध केले.

## सरकार काय करणार?

आसामी जनता सर्वसाधारणपणे शांतताप्रिय व कायद्याचे पालन करणारी आहे. इच्छेविरुद्ध निवडणुका लादल्याने ती केंद्र सरकारविरुद्ध पेटून उठली आणि तो क्षोभ हिंसाचाराचे मार्गाने व्यक्त झाला. कोणताही लोकशाहीवादी या हिंसाचाराचे समर्थन करणार नाही. शांततेच्या मार्गाने हा बहिष्कार व्यक्त झाला असता तर या लढ्याला अधिक उदात्त स्वरूप आले असते यात शंका नाही; पण फार मोठा अन्याय घडतो तेव्हा जनता बेभान होते. तिचा क्षोभ काबूत ठेवणे कठीण जाते. त्यातून हिंसाचार घडतात. जनतेला जबाबदार नेत्यांचे मार्गदर्शन मिळू शकले नाही. कारण दिल्लीतील वाटाघाटी संपवून ते गोहाटीला परतताच त्यांना विमानतळावरच अटक करण्यात आली. याच नेत्यांनी गेली दोन वर्षे आसामचे आंदोलन शांतपणे चालविले होते. त्यांना अटक केली नसती तर हा बहिष्कार शांततापूर्ण मार्गाने व्यक्त झाला असता. तेव्हा हिंसाचाराला सरकारी दडपशाहीही जबाबदार आहे. सरकारने वृत्तपत्रांवर निर्बंध घातले. निदर्शनासंबंधीच्या बातम्या प्रसिद्ध करण्यास बंदी करण्यात आली. वार्ताहरांना अटक करण्यात आली. छापखान्यांवर छापे घालण्यात आले. वृत्तपत्रांच्या छायाचित्रकारांवर हल्ले करण्यात आले. केंद्रीय राखीव पोलीसदलाच्या पोलिसांनी गोहाटीमधील यू. एन. आय. च्या कचेरीवर छापा घालून टेलीप्रिंटर यंत्रांची मोडतोड केली व ऑपरेटरवर हल्ला केला. अशा दडपशाहीच्या वातावरणात झालेल्या निवडणुका या खऱ्या निवडणुकाच नव्हेत! या निवडणुकांनी आसामी व बिगरआसामी जनता यांच्यात कटुता निर्माण झाली आहे. आसामी विरुद्ध बिगरआसामी असे उघड दोन तट तेथे पडले आहेत. आसामाविरुद्ध बंगाली, आसामी विरुद्ध वन्यजमाती, हिंदू विरुद्ध मुस्लिम अशा भाषिक व जातीय दंगली तेथे झाल्या. ही कटुता पुढे अशीच कायम राहणार का? आसामी जनतेच्या जखमा बुजविण्यासाठी सरकार काय करणार आहे? हा

---


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

—प्र. भा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये

खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. निवडणुकांविरुद्ध जनतेने दिलेला कौल केंद्र सरकारने खिलाडूपणाने मान्य करायला हवा आणि मंत्रिमंडळ न बनविता व विधानसभेचे अधिवेशनही न भरविता आसाममध्ये पुन: राष्ट्रपतिराजवट आणावी, आसामी नेत्यांशी बाटाघाटी त्वरित सुरू कराव्या. आसाम विधानसभेत नेहमी आसामींचीच बहुसंख्या राहील अशी कायद्यानेच तिची रचना करण्यात यावी. बहुसंख्य व अल्पसंख्य यांनी सहकार्याने व सलोख्याने नांदले पाहिजे. त्यासाठी दोघांच्याही न्याय्य हक्कांची जपणूक झाली पाहिजे आणि अवाजवी मागण्यांना ठाम विरोध केला पाहिजे ! सीमेवरचे हे राज्य अभंग राहिले पाहिजे. तेथे अस्थैर्य निर्माण झाले तर राष्ट्राच्या एकात्मतेलाच त्यात धोका आहे.

आसामच्या निवडणुकात डावी व लोकशाही आघाडी इंदिरा काँग्रेसशी चुरशीची लढत देईल असा दावा आघाडीचे नेते करीत होते. १०७ जागांचे निकालात इंदिरा काँग्रेसला ८९ व आघाडीला फक्त ५ जागा मिळाल्या. त्यापैकी २ काँग्रेस (एस) ला, २ मार्क्सवाद्यांना व १ कम्युनिस्टांना मिळाली आहे प्लेन्स ट्रायबल कौन्सिल या पक्षाने २ व अपक्ष उमेदवारांनी १० जागा मिळविल्या. १९७८ च्या निवडणुकात इंदिरा काँग्रेसला अवघ्या ८ जागा मिळाल्या होत्या व जनता पक्षाने सर्वात जास्त ५३ जागा जिंकल्या होत्या मार्क्सवाद्यांना त्या वेळी ११ जागा मिळाल्या होत्या. त्यांचे बळ वाढण्याऐवजी २ पर्यंत घटले. कम्युनिस्टांचेही बळ ५ वरून १ पर्यंत घटले. रेड्डी काँग्रेसने १९७८ मध्ये २३ जागा जिंकल्या होत्या; पण या वेळी काँग्रेस (एस) फक्त २ जागा जिंकू शकली. इंदिरा काँग्रेस विरोधी लोकमताचा निवडणुकांनाच विरोध होता. डाव्या आघाडीने निवडणुका लढविणेच त्यांना मान्य नव्हते म्हणून आघाडीस कमी मते मिळाली.

## मेघालयाचा कौल

आसाममध्ये निवडणुकीविरुद्ध जनआंदोलनाचे एवढे रामायण घडले पण शेजारच्याच मेघालयात निवडणुका शांतपणे पार पडल्या. इंदिरा काँग्रेस विरुद्ध प्रादेशिकपक्ष हाच तेथील मुख्य संघर्ष होता. सत्तारूढ संयुक्त मंत्रिमंडळातील तिन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या. प्रादेशिक पक्षांची मते आपसात विभागली जातील आणि त्याचा फायदा घेऊन आपण निर्णायक बहुमत मिळवू अशी आशा इंदिरा काँग्रेमच्या नेत्यांना वाटत होती. ती काही सफल झाली नाही; पण तीन निवडणुकात काँग्रेसचे बळ जागांचे दृष्टीने वाढत गेलेले आहे. १९७२ मध्ये ९, १९७८ मध्ये २० व १९८३ मध्ये २५ जागा काँग्रेसने मिळविल्या. आज प्रादेशिक पक्षांना विरोध करणाऱ्या काँग्रेसने १९७२ मध्ये सर्व पक्षीय पहाडी नेते परिषदेशी निवडणूक समझोता केला होता. या समझोत्यामुळेच नऊ जागा तरी ती मिळवू शकली. त्या निवडणुकीत पहाडी नेते परिषदेने ६० पैकी ३२ जागा जिंकून निर्णायक बहुमत मिळविले होते. मेघालयात आपले पाय रोवण्यासाठी काँग्रेसने पहाडी नेते परिषदेशी प्रथम समझोता केला; पण आणीबाणीत त्या पक्षात फोडाफोड करून आपले बळ वाढविले व १९७८ मध्ये २० जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून तो निवडून आला. प्रादेशिक पक्ष आपल्यात सामावून घ्यावयाचे या धोरणानुसार पहाडी नेतेपरिषदेतील एका गटाला काँग्रेसने आपल्या पक्षात घेतले. याशिवाय त्या पक्षात आणखी फूट पडून पहाडी राज्य संयुक्त लोकशाही पक्ष हा वेगळा पक्ष स्थापन झाला. १९७८ च्या निवडणुकीत पहाडी नेते परिषदेस १६ व पहाडी राज्य संयुक्त लोकशाही पक्षास १४ जागा मिळाल्या. या दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन सरकार स्थापले. पण त्यांच्यात फूट पडली आणि काँग्रेसने या दोन्ही पक्षांतील गटांच्या सहकार्यानेच आपले सरकार स्थापले.

१९८३ च्या निवडणुकीत काँग्रेसला ५ जागा अधिक मिळाल्या असल्या तरी १९७८ सारखीच परिस्थिती आहे. प्रादेशिक पक्षांचे बळ घटलेले नाही. पहाडी नेते परिषदेस १५ म्हणजे १९७८ पेक्षा फक्त एक जागा कमी मिळाली तर पहाडी राज्य संयुक्त लोकशाही पक्ष या दुसऱ्या पक्षास एक जागा अधिक म्हणजे १६ जागा मिळाल्या. दोन्ही पक्ष एकत्र आल्यास त्यांचे निर्णायक बहुमत होऊ शकते. पब्लिक डिमांडस् इम्प्लिमेंटेशन कमिटी या तिसऱ्या पक्षास २ जागा मिळाल्या व तीन अपक्ष निवडून आले. १९७८ चे निवडणुकीत दहा अपक्ष उमेदवार निवडून आले होते. काँग्रेसला प्रादेशिक पक्षांचा प्रभाव कमी करण्यात यश आलेले नाही. तिने आपले बळ वाढविले ते अपक्ष उमेदवारांच्या जागा जिंकून कोणत्याही पक्षास निर्णायक बहुमत न मिळाल्याने संधिसाधु पक्षांतरास भरपूर वाव असून मेघालयात स्थिर सरकार फार काळ स्थापन होणे कठीण आहे. नागालँडमध्ये आठ अपक्ष सभासदांना आपल्या पक्षात सामील करून एवढेच नव्हे तर त्यातल्या सात जणांना मंत्रिपदे देऊन इंदिरा काँग्रेसने तेथे आपले सरकार बनविले. मेघालयामध्येही अपक्ष सभासदांचा पाठिंबा मिळवून आणि प्रादेशिक पक्षात फोडाफोड करून काँग्रेस आपले सरकार बनविण्याची शक्यता आहे; पण त्यापेक्षा प्रादेशिक पक्षांशी सहकार्य करून बनविलेल्या सरकारला अधिक स्थैर्य येईल. गारो टेकड्या आणि पूर्व खासी टेकड्यांचा काही भाग एवढ्यापुरताच काँग्रेसचा प्रभाव मर्यादित असून बहुसंख्य जागा या भागातच तिला मिळाल्या आहेत. काँग्रेसला ५ जागा अधिक मिळाल्या यावरून तिचे बळ वाढले असे बाह्यत: वाटले तरी मतदानाचे आकडे उपलब्ध झाल्यावरच तिला पाठिंबा खरोखरच वाढला आहे की नाही याची कल्पना येईल. दोन प्रादेशिक पक्षातील आपसातील लढतीचा फायदा मिळाल्यानेच ती अधिक जागा जिंकू शकली. मेघालय निर्णायकपणे इंदिरा काँग्रेसच्या बाजूला झुकले असे या निकालावरून म्हणता येणार नाही. मेघालयात इंदिरा काँग्रेसशिवाय दुसऱ्या कोणत्याही अखिल भारतीय पातळीवरील पक्षाला अजून शिरकावही करता आलेला नाही.

दोन राज्यांच्या या निवडणुकांत मेघालयाच्या निवडणुकात वेगळे वैशिष्ट्य काही नव्हते; पण आसामच्या निवडणुका आपल्या निवडणुकीच्या इतिहासातच अभूतपूर्व होत्या. एवढे अल्पमतदान यापूर्वी कोणत्याही निवडणुकीत झाले नव्हते आणि बहिष्कार एवढ्या मोठ्या प्रमाणावर पूर्वी कधीही यशस्वी झालेला नव्हता ! □